# माणूस

मुंबई निवडणूक विशेषांक

शनिवार । ६ मार्च १९७१

एक रुपया



शनिवार ६ मार्च १९७१

# माणूस


| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सदुसष्टावा - अडुसष्टावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| शंभर पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

▫ दि. २० फेब्रुवारी नि २४ फेब्रुवारीचे माणूसचे दोन्ही अंक वाचले. या निवडणुकीच्या काळात माझं 'माणूस'विषयीचं आकर्षण फारच वाढलं आहे.

'माणूस' शनिवार दि. २० फेब्रुवारीच्या अंकातील श्री. ग. मां.चा स्थिरसरकारवाद हा लेख फारच चांगला वाटला. अभिनंदन. दिल्ली वार्ता वाचून मन प्रसन्न झालं. खास मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र पृष्ठं दिलीत हे बरं झालं. आजवर हा भाग 'माणूस'कडून दुर्लक्षिला गेला होता. २४-२-७१ च्या अंकातील 'जाहीरनामे काय सांगतात, काय दडवतात ?' हा लेख आवडला.

२५ फेब्रुवारी, १९७१ — नेमीचंद कानोटे, हिंपळनरी

हा जोडअंक असल्यामुळें यापुढील बुधवार दिनांक १० मार्च १९७१ चा 'माणूस' अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, विक्रेते यांनी कृपया नोंद घ्यावी. —व्यवस्थापक, माणूस.

द्विसाप्ताहिक माणूस · १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# श्री. संपादक ‘माणूस’ यांसी
# सप्रेम नमस्कार

‘माणूस’च्या दिनांक २७ फेब्रुवारीच्या अंकातील श्री. जॉर्ज फर्नांडीस यांची तुमच्याच प्रतिनिधीने घेतलेली मुलाखत वाचून फार निराशा झाली. श्री. फर्नांडीस यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी श्री. नवल टाटा यांच्यावर त्यांनी अनेक प्रकारे टीका केली आहे. त्या टीकेला दुसरी बाजू काही आहे का याचा विचार ‘माणूस’सारख्या गंभीर प्रकृतीच्या, लोकमत घडवू पहाणाऱ्या व स्वतंत्रवृत्तीच्या पत्राने तरी करायला हवा होता टाटांच्या उद्योगसमूहाबद्दलही अनेकप्रकारची अगदीच चुकीची (absurd) अशी ‘माहिती’ जॉर्जसाहेबांनी सांगितली. तिचा पडताळा तरी ती तशीच्या तशी छापण्यापूर्वी तुम्ही घ्यायला हवा होता. निदान नवल टाटांचीही मुलाखत घेऊन तीही त्याच अंकात शेजारी छापण्याची कृपा तरी तुम्ही करायला हवी होतीत. मग तुमच्या संपादकीयात तुम्ही काहीही मते स्वतः मांडली असतीत तरी त्याबद्दल दुःख नव्हतं. तो तुमचा अधिकारच होता.

आणि खरंच हे सांगा की टाटांच्या उद्योगसमूहावर ही आग का पाखडता? त्यांनी तुमचं, माझं काय वाईट केलं आहे? लोकमान्यांच्या ‘स्वदेशी’च्या मंत्रानुसार पहिला खराखुरा स्वदेशी उद्योगसमूह सुरू केला, हे? की, त्यांच्या प्रयत्नाचं त्यावेळी हसू करणाऱ्या पाश्चिमात्य लोकांच्या नाकावर टिच्चून ६० वर्षांपूर्वी पोलादाचा पहिला कारखाना काढला; त्याहीपूर्वी नागपूरसारख्या त्यावेळच्या मागासलेल्या भागात कापडाची गिरणी काढली; नंतर सौराष्ट्र-कच्छच्या वाळवंटात रसायनाचा कारखाना काढला; मुंबईला वीज दिली आणि हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाची नांदी केली, हे? आत्ता आत्तापर्यंत टाटांच्या उद्योग समुहाबद्दल सर्वत्र स्तुतिसुमने उधळली जात होती; नेहरुंच्यापासून सर्व पक्षांच्या सर्व पुढाऱ्यांनी ह्या उद्योसमूहाबद्दल अभिमान दाखवला; त्यांच्या पुढारलेल्या कामगारविषयक धोरणांचा गौरव केला; त्यांच्या देशहिताच्या जाणीवेचं कौतुक केलं; आणि आज जॉर्जसाहेब ज्या मतदारसंघातुन उभे राहिले त्याच मतदारसंघातून नवल टाटाही उभे रहाताक्षणीच हा उद्योगसमूह एकदम बदनाम ठरला, हे कसं? आमचा सर्वांत मोठा, प्रचंड उद्योगसमूह म्हणून गेलं अर्धशतक त्यांचा उदो उदो केलात; त्यांच्यापुढे वाहुल्या वाटतील असे नवीन नवीन कारखानदार पुढे आले आणि त्यांची झपाट्याने वाढ झाली. टाटांनी त्याला अडथळा आणल्याचं एकही उदाहरण नाही; उलट सर्वतोपरी प्रोत्साहन दिलं. तर त्याबद्दल त्यांची स्तुति न करता, अजून टाटाच पहिले आहेत याबद्दल एवढा उद्वेग वाटण्याचं काय कारण?

तसं पाहिलं तर सर्व मोठया उद्योगसमूहांना एकाच घावात बदनाम करण्याची, तेच जनतेचे शत्रू आहेत अशी वावटळ उठवून स्वतःच्या निष्प्रभ व कृतिशून्य नेतृत्वाची लाज त्यामागे लपविण्याची नवीन तऱ्हा भारतीय राजकारणात गेल्या २॥-३ वर्षांपासून दिसू लागली आहे. नवल टाटा लोकसभेत जाऊ इच्छीतात ते उद्योगपतींची नव्हे तर औद्योगीकरणाची बाजू मांडायला. ह्या लाज लपविण्याच्या प्रयत्नात औद्योगीकरणाला खीळ बसू पहात आहे. जगात कुठेही प्रवास करून येणारा माणूस सांगतो की त्या देशांची प्रगती विलक्षण आहे; डोळ्यात भरते आणि आपण इतके मागे का याची खंत वाटते. आपल्या देशात सर्व काही उत्तम आहे. हेवा वाटावा अशी खनिज संपत्ती आहे. कधी नव्हे ते चार वर्षे लागोपाठ उत्तम धान्य पिकलं आहे. हवा, पाणी, संपत्ती आहे. शिकलेले, घडवणारे, प्रामाणिक लोक लाखोंनी आहेत. देशाच्या आर्थिक परिस्थितीची गाडी मात्र प्रगतीचा चढ चढता चढता एकदम थांबून आता पुन्हा मागे घसरण्याच्या मार्गावर आहे. तरी राजकारणी पुढारी आणि पक्ष सत्तास्पर्धेत गर्क आहेत. त्यांना मधूनमधून तरी त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणारे, देशाची आर्थिक प्रगती कशात आहे, याची जाणीव ज्यांच्या विचारात आणि आचारात जन्मापासून दिसली आहे, असे दोन चार जरी नवल टाटांच्यासारखे पुरुष लोकसभेत येऊ शकले तर ते सर्वांच्याच हिताचं आहे. चळवळ आणि भाषणं करणाऱ्या 'पुढाऱ्यां'ची भाऊगर्दी त्यापायी जरी दहा पंधरांनी कमी झाली तरी त्यात नुकसान काहीच नाही. प्रगति 'बंद' करणाऱ्यांच्यापेक्षा ती सुरू करणारे, उघडणारे, वेगाने वाढविणारे पुरुष हवे आहेत.

जॉर्जसाहेबांनी मुलाखतीत मांडलेले आणखी दोन चार मुद्दे पाहू—

(१) श्री. फर्नांडीस यांच्या मते टाटांचा निवडून येण्याचा अट्टाहास त्यांचे स्वतःचे 'संस्थान' वाढविण्यासाठी आहे. जॉर्जसाहेब हुशार चतुर, आहेत. संस्थान वाढवायला निवडून यावं लागतं असं नाही हे त्यांना माहीत आहे. निवडून न येता टाटांचं संस्थान (!) त्यांच्या मते वाढलंच की इतकी वर्षं! आणि निवडून येऊन अगदी पंतप्रधान झाले तरी कै. लालबहादूर शास्त्री मृत्यूसमयी, आपल्या साध्या मोटारसाठी घेतलेलं कर्ज फेडू शकले नव्हते, हेही त्यांना माहीत आहे.

(२) आणि हे टाटांचं 'साम्राज्य'! मिठापूरचा खतांचा कारखाना धरून म्हणे '७०० कोटी रुपयांचं! 'खतांचे कारखाने काढा' म्हणून सरकार उद्योगपतींच्या मागे लागले. टाटांनी प्रचंड परीश्रमपूर्वक २०० कोटी रुपयांच्या कारखान्याची योजना तयार केली. तेवढ्यात आली ही 'मोठे उद्योगपति हे देशाचे शत्रू'ची लाट आणि ती योजना अजून तशीच सरकार दरबारी धूळ खात पडली आहे. इकडून तिकडे फेकण्यात ती सुजून सुजून ५५ कोटींची झाली. पण अजून योजनेला मान्यता नाही. तो कारखाना सुरू होण्यासाठी प्रत्येक दिवसाची दिरंगाई होते त्यांत देशाचं २५ लाख रुपये रोज नुकसान होत आहे, आणि तेही परकीय चलनात, हे सरकारला काय माहीत नाही? माहीत आहे खास; पण तरीही योजना अजून

सरकारी फायलीत आहे; नव्या नव्या अटी, नव्या नव्या हरकती घेतल्या जात आहेत. पण टाटांच्या 'साम्राज्या'च्या धनमोजणीत मात्र ती आत्ताच जॉर्जसाहेबांनी मिळवून टाकली.

मिठापूर शिवाय सुद्धा जे 'साम्राज्य' आहे त्यांत तरी मोठे हिस्से कुणाचे? पहिला सरकारी संस्थांचा. L. I. C., युनिट ट्रस्ट, राष्ट्रीयकरण झालेल्या बँका इत्यादींचा. कारण शेअर्स घ्यायला ह्या संस्था बाहेर पडल्या की टाटांच्याच कंपन्यांचे शेअर्स त्यांना सर्वात पसंत जास्त! त्यानंतर हिस्सा दुसऱ्या उद्योग समूहांचा. टाटांचा जमशेटपूरचा पोलादकारखाना हा सर्वात मोठा. त्यांच्या 'साम्राज्या'तल एक तृतीयांश हिस्सा या एका कंपनीचा. तिचेच उदाहरण पहा. या कंपनीचे जेवढे शेअर्स टाटांच्याकडे, म्हणजेच टाटांच्या निरनिराळ्या कंपन्यांच्याकडे आहेत तेवढेच बिर्लांच्या Pilani Investments कडे. आणि त्याच्या आठपट ह्या सरकारी संस्थांच्या मालकीचे. पण जॉर्जसाहेब म्हणतात हे टाटांचं 'साम्राज्य'!

तसंच टाटांची मूळ कंपनी 'टाटा सन्स' तिचे प्रचंड बहुमताचे शेअर्स निरनिराळ्या ट्रस्टच्या मालकीचे. कॅन्सर हॉस्पीटल, Institute of Social Sciences, Institute of Fundamental Research अशा अनेकविध जगन्मान्य संस्था त्यांच्याच जोरावर चालल्या. अनेक विद्वानांना, हुषार तरुणांना त्यांच्यातूनच स्कॉलरशिप्स् मिळाल्या. अशी सगळी वस्तुस्थिती असताना 'साम्राज्य' कसलं? हे 'टाटा घराणं' म्हणून जॉर्जसाहेब म्हणतात ते सध्या आहे तरी काय याचा त्यांनी खुलासा करायला हवा होता. त्यांना त्याची माहिती नसेल तर ती करून घ्यायला हवी होती.

(३) दक्षिण मुंबईतल्या दारिद्र्याचं मोठं विदारक चित्र जॉर्जसाहेबांनी मुलाखतीत व्यक्त केलं आहे. त्यातले काही आंकडे अगदी बरोबर नसले तरी चित्र खरं आहे. लोकांना घर नाहीत; फूटपाथवर लोक लाखोंनी झोपतात; पाणी नाही; बेकारी बेसुमार आहे. सर्व खरं आहे. पण नवल टाटा निवडून आल्यामुळे हे चित्र जास्त भेसूर होईल, आणि जॉर्जसाहेब आल्याने कमी भेसूर होईल, हे कसं? हे चित्र कसं बदलता येईल याची माहिती, आणि हे चित्र साफ बदलून टाकण्याचा अनुभव टाटांना जास्त आहे की जॉर्जसाहेबांना, हा प्रश्न आहे.

असो, पत्र फार लांबलं. जॉर्जसाहेबांच्या कार्याबद्दल, त्यांच्या व्यक्तीमत्वाबद्दलही आदर असलेली अनेक माणसं आहेत. मीही त्याला अपवाद नाही. नवल टाटा आणि जॉर्ज फर्नांडीस यांच्यासारखी दोन कर्तबगार माणसं एकाच मतदार संघातून उभी आहेत हे एकप्रकारे देशाचेही अनहित आहे. कारण यांतल्या कुणा तरी एकाच्या कार्याला लोकसभा मुकणार आणि देशांतल्या कित्येक इतर मतदारसंघातून केवळ 'दुसरं कुणी नाही' म्हणून कितीतरी कमी श्रेष्ठ उमेदवार निवडून येणार! त्याला नाइलाज आहे. तुमच्याच प्रतिनिधीने कबूली दिली आहे की, "नवल टाटांच्याबद्दल

जॉर्ज इतकं बोलतो पण टाटांनी मात्र अगदी पहिल्या पत्रकार परिषदेपासून ते आता-पर्यंत जॉर्जच्या किंवा कोठल्याही उमेदवाराविरुद्ध अवाक्षरही काढलेलं नाही. उलट आपल्या प्रतिस्पर्ध्यांची ते मुक्त कंठाने प्रशंसाच करतात.' यांतच नवल टाटांच्या रक्तांत भिनलेली आचार-सभ्यता आहे; खूप केल्याचं समाधान व याही वयात आणखी करण्याची जिद्द आहे. दुसरे करतात त्यांच्याबद्दल आदर, त्यांचं कौतुक आहे. त्यांची टिंगल करण्याची, त्यांना पाडून पाडून बोलण्याची विनाशी भूक नाही.

श्री. नवल टाटा यांच्याबद्दलहीं, त्यांच्याही व्यक्तीमत्वाबद्दल मला आदर आहे. मी त्यांचा प्रतिनिधी नाही; पण त्यांच्या असंख्य हितचिंतकांच्यापैकी एक खास आहे. नवल टाटांच्या कार्याचीही मला थोडोफार माहिती आहे. म्हणूनच त्यांच्या-बद्दल जॉर्जसाहेबांनी काढलेले अनुदार उद्गार खटकले. 'माणूस 'सारख्या पत्रांत ते तसेच्या तसे छापले जावे; त्याची दुसरी बाजू सुविज्ञ वाचकांच्यासमोर ठेवण्याचा प्रयत्नही 'माणूस 'ने करू नये याचे वाईट वाटलें. म्हणूनच हे प्रदीर्घ पत्र. 'माणूस '-मध्ये ते संपूर्णपणे आणि त्वरीत प्रसिद्ध करावे एवढीच आग्रहाची व नम्रतापूर्वक विनंती. कळावे.

२८ फेब्रुवारी १९७१ — व. रा पेंडसे, मुंबई

## सप्रेम नमस्कार

---

जॉर्जसाहेबांसारख्या नामवंत खासदाराने दिलेली टाटांच्या उद्योगसमूहाबद्दलची, आपल्या मते चुकीची असलेली, माहिती पडताळा पाहून 'माणूस 'ने प्रसिद्ध करायला हवी होती 'माणूस 'ने आपली स्वतंत्र वृत्ती सार्थ करण्यासाठी, दुसरी बाजू मांडणारी श्री. नवल टाटा यांची मुलाखत 'त्याच' अंकात, शेजारी' छापण्याची तरी निदान कृपा करायला हवी होती ही आपली अपेक्षा अगदीच अवास्तव आहे. वृत्तपत्रीय कामकाज या पद्धतीमुळे जवळजवळ अशक्य होऊन बसेल. जॉर्जसाहेबांचे सांगणे शक्यतो त्यांच्याच शब्दात व शक्यतो जसेच्या तसे उद्धृत करणे, एवढी दक्षता सर्वसाधारणपणे 'माणूस 'ला पुरेशी वाटते. एक प्रभावी प्रतिस्पर्धी म्हणून या संदर्भात टाटांची मुलाखतही 'माणूस 'ने योजली होती, पण जॉर्जसाहेबांबरोबरच ती प्रसिद्ध करण्याचे बंधन 'माणूस 'ने कधीही पत्करले नसते. हा अंतर्गत प्रश्न असतो. पृष्ठसंख्येच्या मर्यादेशमुळे मुलाखतीच्या वेळा जमण्यापर्यंत अनेक अडचणी मध्ये येत राहतात. शिवाय या न्यायाने आणखीही खूप पुढे जात रहावे लागेल, नाही का? टाटांच्या मुलाखतीवर पुन्हा जॉर्ज यांचे काही आक्षेप. तेही, कुणी जॉर्जपक्षीय म्हणणार 'त्याच अंकात, शेजारी छापायला हवेत.' टाटा

आणि जॉर्ज या दोघांनीही सरकारवर टीका केलेली. या टीकेची शहानिशा करून घेण्यासाठी डॉ. कैलास यांना 'माणूस'ने का भेटू नये, असा प्रश्न कुणी नव-कॉंग्रेसवालाही फेकू शकतो. ही माळका पुरी होईपर्यंत निवडणुका संपायच्या, विषयही अडगळीत पडून बाद ठरायचा. म्हणून हे 'हेजारी' प्रकरण 'माणूस'ला मान्य होण्यासारखे नाही. क्वचित् हा योग जमूही शकतो. पण नेहमी अपेक्षा बाळगणे चुकीचे. पाऊस पडत असताना सूर्यकिरणांमुळे कधीकधी इंद्रधनुष्याची शोभा आकाशात दिसू शकते. पण 'इंद्रधनुष्य नाही म्हणजे पाऊसच नाही' असे कोणी म्हणू लागले तर? 'इंद्रधनुष्यासह पाऊस आलाच पाहिजे' ही मागणी आपण आता तरी करणार नाही अशी आशा आहे.

या अंकी टाटांची मुलाखत प्रसिद्ध होत आहे. आपल्या माहितीसाठी एवढेच कळवितो, की माणूस प्रतिनिधीला यासाठी फार प्रयास पडलेले आहेत. मुलाखती-सोबत पाठविलेल्या पत्रात माणूस प्रतिनिधीने संपादकांना लिहिले आहे: 'नवल टाटांची मुलाखत येथल्या कोणत्याही दैनिकाला (अद्याप) मिळू शकली नाही. सर्वांनी त्यांना लेखी प्रश्न पाठविले. त्याची लेखी उत्तरे टाटांनी पाठविली. फर्नांडिस यांच्या काही आरोपांना त्यांनी उत्तरे दिली आहेत...मुलाखत कन्फर्म करण्याची गरज नाही. टाटा पॅलेसमध्ये जवळजवळ एक तास मी टाटांशी बोललो. त्यांनी जवळजवळ डिक्टेशन दिले. त्यामळे मुलाखतीतला शब्दन् शब्द खरा आहे.'

पेंडसेसाहेब, एवढे प्रदीर्घ पत्र लिहूनही आपण जॉर्जने दिलेली नेमकी कोणती माहिती चुकीची आहे, टाटांचे साम्राज्य ७०० कोटींचे नसल्यास नक्की किती कोटींचे आहे, याचा स्पष्ट उलगडा करण्याचे अतिसावधगिरीपायी कौशल्याने टाळ-लेले आहे, हे चतुर वाचकांच्या ध्यानात आल्याखेरीज राहणार नाही, बरं का! अर्थात यामुळे जॉर्जच्या प्रतिपादनात फारसा फरक पडू शकत नाही हेही निश्चित. टाटांचे साम्राज्य ७०० कोटींचे असो की त्यात पाच-पन्नास कोटी कमीजास्त होवोत, टाटा घराणे प्रमुख औद्योगिक घराणे आहे, या घराण्याच्या हाती स्वातंत्र्य-पूर्व काळापेक्षाही अधिक आर्थिक सत्ता आज केंद्रित झालेली आहे, ही वस्तुस्थिती आकडेमोडीमुळे बदलत नाही. जॉर्जचा आक्षेप या वस्तुस्थितीवर आहे, टाटा घराण्यातील कुणा एका व्यक्तीवर नाही. हसा गैरसमज पेंडसेसाहेब, आपण विना-कारण करून घेतला आहे.

पारतंत्र्य काळातही स्वदेशी कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली म्हणून टाटा घराण्याकडे कुणीही आदरानेच पाहील. प्रश्न असा आहे, की ही प्रारंभिक अवस्था ओलांडून कारखानदारी जेव्हा मक्तेदारीत रूपांतरीत होते, समाजात या रूपांतरा-मुळे विषमतेची दरी रुंदावत जाते तेव्हाही पूर्वीच्याच दृष्टिकोनातून तिच्याकडे

पाहिले जावे हा आग्रह का? मराठेशाहीत शिंदे–होळकरांनी, पटवर्धन–गायकवाडांनी उदंड पराक्रम केले. त्यामुळे स्वदेश व स्वधर्म यांचे रक्षणही झाले. म्हणून संस्थाने विलीन करायला नको होती, वल्लभभाईंनी केलेले संस्थानांचे विलीनीकरण चूक होते, असेही मग म्हणावे लागेल.

टाटा लोकसभेत औद्योगिकरणाची बाजू मांडायला जाऊ इच्छितात म्हणे! पारतंत्र्यकाळात देशी कारखानदारीचा प्रचंड वटवृक्ष ज्यांनी वाढविला त्या टाटा-पूर्वजांनी या न्यायाने मग ब्रिटिश पार्लमेंटमध्ये किंवा व्हॉइसरॉय कौन्सिलमध्ये धरणेच धरून बसायला हवे होते. अपवाद वगळता टाटांचे पूर्वज या मार्गाकडे फारसे वळलेले दिसत नाहीत. व्यापारी–कारखानदार–भांडवलदार प्रत्यक्ष राजकारणात सहसा कुठल्याही देशात भाग घेत नाहीत, तिथे या वर्गाने प्रत्यक्ष भाग घेतला तिथे तो अपयशीच ठरलेला आहे. या घटनेची मीमांसा Schumpeter साहेबाने आपल्या सुप्रसिद्ध Capitalism, Socialism and Democracy ग्रंथात विस्ताराने केलेली आहे. साहेबाचा निष्कर्ष असा–‘ Without protection by some non-bourgeois group, the bourgeoisie is politically helpless and unable not only to lead its nation but even to take care or its particular class interest. Which amounts to saying that it needs a master. (P. 138) मालक म्हणून चांगला असलेला माणूस नेता म्हणून मान्यता पावतोच असे नाही; बहुधा नाहीच. हा विचार टाटांच्या राजकारण प्रवेशाचे स्वागत करणाऱ्यांनी अवश्य ध्यानात घ्यायला हवा.

टाटांचं औद्योगिक साम्राज्य ‘झिजून’ चाललं आहे, झिजता झिजता जे काही शिल्लक आहे तेही बरचस धर्मादाय व सरकारजमा झाल्यासारखंच आहे असा एक पेंडसे यांच्या पत्रातील आणखी एक मुद्दा. बिर्लाही कोटयावधी रुपये दानधर्मात खर्च करतात. पिलानी येथील बिर्लांची शैक्षणिक संस्था केवढी तरी प्रचंड आहे. पण यामुळे बहुसंख्य जनतेच्या जीवनावर प्रभुत्व गाजविणाऱ्या बिर्ला-टाटांच्या अर्थसत्तेवर काही अंकुश बसू शकतो काय, हा खरा प्रश्न आहे. सरकारीसंस्थांच्या मालकीचे शेअर्स झाले म्हणजे टाटांचे साम्राज्य संपुष्टातच येत असेल तर मिठांपूरसारखे ‘प्रचंड परिश्रमा’चे प्रकल्प उभे करण्यासाठी टाटा अधिकाधिक का पुढे सरसावत आहेत? वास्तविक रुग्णसेवेसाठी, शिक्षणासाठी, दानधर्मासाठी, सरकारसाठी टाटांचे वैभव वाहिलेच असेल तर लोकसभेसाठी उभे राहण्याच्या उरस्फोडी खटाटोपापेक्षा ‘गोष्टी सांगेन युक्तिच्या चार’ अशी निर्लेप उपदेशकाची भूमिकाच टाटांना अधिक शोभून दिसली असती. पण परवाच वाचले, की टाटांच्या टेल्कोचे आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे ‘मर्जर’ झाले. ‘मर्जर’ म्हणजे कायदेशीर गिळंकृतीकरण. मोठ्या माशाने लहान माशाला गिळणे. टाटा


उद्योग समूह इतका परोपकारी, भूतदयावादी असताना हे गिळंकृतीकरण का बरं चालू राहावे !

शेवटचा विषय : भेसूर मुंबईचे चित्र बदलून टाकण्याचे सामर्थ्य टाटा वा जॉर्ज यापैकी कुणाजवळही आहे, असे मानण्याइतकी जनता आज दूधखुळी नाही. पण टाटा लोकसभेत न जाताही, काय त्यांना औद्योगिकरणाची बाजू मांडायची आहे ती कुठूनही मांडू शकण्याइतके बडे व वजनदार आहेत. भेसूर मुंबईला तूर्त फक्त किंचाळत राहणें एवढेंच शक्य आहे आणि यासाठी तळमळीने आक्रोशणारा, किंचाळणारा जॉर्ज तिला अधिक जवळचा आहे. जॉर्जचे या भेसूर मुंबईशी आंतरीक नाते आहे, टाटांचे ते नाही. औद्योगिकरणाची बाजू मांडण्यासाठी उद्योगपतींनीच लोकसभेत गेले पाहिजे असे टाटांचे मत आहे. तर झोपडपट्टीची, फुटपाथवाल्यांची बाजू मांडण्यासाठी जॉर्जसारखा एखादा फूटपाथवालाच लोकसभेत जायला हवा, हेही टाटांना वा त्यांच्या हितचिंतकांना वास्तविक मान्य व्हायला हवे.

तरीही टाटा का उभे आहेत ? जॉर्जला हुसकून लावण्यासाठी स. का. पाटलांनी रचलेल्या घाणेरड्या आणि दुष्ट राजकारणाचे नवल टाटा हे एक बळी आहेत. किंवा म्हातारपणी राजकारण खेळण्याची नवीनच हुक्की त्यांना आलेली आहे. यापलीकडे टाटांच्या उमेदवारीला कसलाही तात्त्विक अर्थ, राष्ट्रीय महत्त्व तूर्त तरी देता येणे शक्य दिसत नाही.

आणि समजा टाटा निवडून आले व त्यांनी अपक्ष न राहता इंडिकेट-सिंडिकेट किंवा अन्य एखाद्या पक्षाशी सूत जमवले तर पेंडसेसाहेब, तेवढी ' सत्तास्पर्धेत गर्क असणारे राजकीय पक्ष ' ' स्वतःच्या निष्प्रभ व कृतीशून्य नेतृत्वाची लाज लपवू पाहणारे पुढारी यांच्यावर आपण केलेली कडक टीका परत घेणार का ?

—संपादक



# दक्षिण मुंबई




**अशोक कुलेंकर**

## टाटांनी विरोधी पक्षालाही पैसे दिले म्हणून नेहरू चिडले....

' आम्ही काँग्रेसपक्षाला पैसे दिले आहेत पण त्याचबरोबर हेल्दी विरोधी पक्षही तयार व्हावा म्हणून स्वतंत्र पक्षालाही पैसे दिले. पण त्यामुळे पंडित नेहरू आमच्यावर चिडले होते ' नवल टाटा तावातावाने सांगत होते.

काँग्रेस पक्षाला तुम्हीच पैसा देऊन वाढवलंत आणि आता गेल्या २३ वर्षात या पक्षानं देशाची काय दशा करून टाकली पहा ! असं तुम्हीच म्हणता हे कसं ? हा जॉर्ज फर्नांडिसचा आरोप त्यांना सांगितला असता ते बोलत होते.

ते म्हणाले, ' राजकीय पक्षांना आम्ही दिलेली मदत अगदी उघड आहे. चेकने पैसे दिलेले आहेत आणि आमच्या कंपन्यांचे बॅलन्स शीट पाहिलेत तर त्यांचा हिशेब तुम्हाला सापडेल. '

फर्नांडिसना म्हणावं टाटांच्या काही ग्रँडफादरचा हा पैसा नाही ! तो आहे शेअरहोल्डर्सचा असे ठामपणे सांगून टाटा म्हणाले, ' काँग्रेसला पैसे देताना आम्ही ब्रिटिश संसदीय पक्ष पद्धतीवर विश्वास टाकला. सत्तारूढ पक्षाला अर्थसाह्य करीत असतानाच या देशात चांगला विरोधी पक्ष निर्माण व्हावा म्हणून आम्ही स्वतंत्र पक्षालाही देणग्या दिल्या. काँग्रेसला जेवढे पैसे द्यायचे त्याच्या निम्मे स्वतंत्रांना म्हणजे २ रुपये काँग्रेस पक्षाला दिले तर १ रुपया स्वतंत्र पक्षाला असे प्रमाण आम्ही ठरविले ?'



नवल टाटा
सोज्वळ
व्यक्तिमत्व

'पण हे सर्व आम्ही ओपनली केलं आहे. खुल्लमखुल्ला कारभार आहे. फारच कमी कंपन्यांचा असा स्पष्ट, उघड व्यवहार आहे. आम्ही कधी सरकारकडे बंडल्स (नोटांची) घेऊन गेलेलो नाही.'

नवल टाटा हे सारं तावातावाने सांगत असतात पण टाटा तसे शांत स्वभावाचे, धीम्या प्रकृतीचे, फार सोज्वळ, सच्चा दिलाचे. मुरब्बी राजकारणी माणसातला बेरकीपणा त्यांच्यापाशी नाही. टाटा अगदी भडभडून बोलतात, मनापासून बोलतात, विरोधकांचा एखादा आक्षेप सांगितला तर रोखठोक उत्तर देऊन 'नाऊ दे वॉन्ट टु हिट मी बिलो द बेल्ट' असं म्हणतात. आपलं म्हणणं निर्धाराने मांडतात. आपल्या भूमिकेचा आग्रह धरतात. 'नवल सेज...' असं तुम्ही ठणकावून लिहा असं सांगतात.

यशवंतराव चव्हाणांनी टाटांनी निवडणूकीस उभं कशाला रहावं? असं विधान

केलं होतं याबद्दल आपल्याला दुःख झालं असं नवल टाटा यांनी सांगितलं. 'महाराष्ट्राचा शिल्पकार म्हणून मी त्यांना (चव्हाणांना) मानतो. ते एक माझे चांगले स्नेही आहेत. आय हॅव ग्रेट रिस्पेक्ट फॉर हिम. असे सांगून टाटा म्हणाले, 'मी पक्का महाराष्ट्रीय आहे. आणि सच्चा महाराष्ट्रीय महाराष्ट्रासाठी जेवढं करील तेवढं टाटा घराण्याने केलंय. टाटा उद्योगसमूहाचे हेडक्वार्टर महाराष्ट्रात आहे. टेल्को कारखाना आम्ही पुण्याला काढलाय्. जमलं तर बिहारहून सारा प्लॅन्टच पुण्याला शिफ्ट केला असता पण हे सरकार...पण ते जाऊ द्या ! मला महाराष्ट्राविषयी फार अभिमान आहे. मी मराठीत भाषणं करीत नाही. म्हणून का मी निवडणूकीला उभं राहयचं नाही ? निवडणूकात चव्हाण यांच्या कॉंग्रेसनं मेननना वेळोवेळी उभं केलं होतं. त्यांना एकही शब्द मराठीत बोलता येत नव्हता नां ? सोमाणी, दामाणी, मोरारका, संस्थानिक, बेगमा या कॉंग्रेस पक्षाच्या सभासद आहेतच ना ? जर उद्योगपती दामाणी तुम्हाला चालू शकतात तर मग मी असा काय त्यांच्यापेक्षा वेगळा आहे ?'

चव्हाणांच्या त्या 'अनफाईड' (हा शब्द त्यांचा) शेऱ्याबद्दल टाटांना खरोखरच विषाद वाटतो.

मग टाटा आपल्या घराण्याची महति वर्णन करतात. या वर्णनाला शब्दच पुरत नाहीत. कारण एकही क्षेत्र असं नाही की जेथे टाटांचा संबंध नाही. साबणापासून ते अणुपर्यंत टाटांनी हातभार लावलेला. त्यामुळे किती सांगू आणि किती नाही असं होतं. टाटा घराणं भारताशी एकनिष्ठ राहलं आहे. असे सांगून ते म्हणाले, गुलाम मोहमद हे आमचे डायरेक्टर होते. पुढे ते पाकिस्तानचे अध्यक्ष झाले. तुम्ही पाकिस्तानात या, तुम्हाला सर्व आर्थिक सहाय्य आणि संरक्षण देऊ असे आश्वासन दिले. त्यावर जे. आर. डी. टाटांनी उत्तर दिले की आमचा एक पाय भारतात व एक पाकिस्तानात कधी असणार नाही. पाकिस्तानविरुद्ध मनात काही किल्मिष नसलं तरी आम्ही भारतात एकनिष्ठ आहोत. जे. आर. डी. चे हे उत्तर नवल टाटा अभिमानानं सांगतात. आपल्या निवडणूक प्रचार सभातून या घटनेचा उल्लेख नेहेमी करतात.

'मुंबई शहराचं वेगळं राज्य असावं असा आग्रह धरणारे, संयुक्त महाराष्ट्रविरोधी टाटा आहेत,' असं फर्नांडिस म्हणतात याबद्दल तुम्हाला काय म्हणायचं आहे असे विचारता टाटा म्हणाले, ही अगदी खोटी गोष्ट आहे. मी त्यावर्षी इंडियन मर्चंट चेंबरचा अध्यक्ष होतो. चेंबरच्या बहुतेक सभासदांनी मुंबई 'वायलिबल' ठेवावी असे मत प्रदर्शित केले. मी पडलो अध्यक्ष, तेव्हा सभासदांचे जे बहुमत असेल तेच मांडण्याचे काम मी केले. ते काही माझे वैयक्तिक मत नव्हते. पुढे इंडियन मर्चंट चेंबरचे प्रतिनिधी पंडित नेहरूंना भेटले व आपले मत त्यांना सांगितले. त्यावेळी मी त्या मंडळावरोबर गेलो नव्हतो. हवं तर याची शहानिशा फर्नांडिस यांनी

करावी.

कोयनेचा भकंप असो, गुजरातमधील महापूर असो किंवा बिहारमधील दुष्काळ असो टाटा नेहमीच मदतीसाठी धावून गेले आहेत. अंध शेतकऱ्यांसाठी त्यांनी एक उत्तम संस्था चालवली आहे. भारताचे अणुशक्तीच्या क्षेत्रात पदार्पण झाले टाटांमुळेच. असे सांगून ते पुन्हा महाराष्ट्राकडे वळतात. ते म्हणतात, 'सर रतन टाटा आणि गोखले हे स्नेही होते. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी स्थापण्यात या दोघांनी पुढाकार घेतला. टाटा उद्योग समहाचे मुख्य हेडक्वार्टर येथे आहे हे तुम्हाला मी यापूर्वी सांगितलेच. अनेक राज्यांनी आमचे हेडक्वार्टर्स त्यांच्या राज्यात असावेत म्हणून प्रयत्न केले परंतु आम्ही महाराष्ट्र राज्य सोडले नाही!'

काँग्रेस नेत्यांना समाजवादाचा अर्थ कळायच्या फार पूर्वीच टाटा घराण्याने समाजवाद अमलात आणला आहे असे ते सांगत असता मी विचारले "लोकशाही समाजवादाची तुमची व्याख्या काय?" तेव्हा ते म्हणाले, "लोकसेवा इन एनी फॉर्म म्हणजे लोकशाही समाजवाद, मानवी सुख-समाधान ज्यामुळे निर्माण होईल अशी लोकसेवा करणं हे मी माझं ध्येय समजतो. मी काही राजकारणी नाही आणि अशी लोकसेवा करताना मी त्यात कधी सिद्धान्त आणित नाही. इट्स नॉट नीडेड!"

पोपल डू नॉट नो अस्. वुई आर द लास्ट मोनॉपलिस्ट असं सांगून ते म्हणाले, "टाटांनी कधी भांडवलशाहीची जोपासना केलेली नाही. आम्ही सरंजामदार नाही. जे. आर. डी. व मी सोडलो तर आमचा अन्य संचालकात एस. मुळगांवकर, बखले (पूर्वी), वद्दरखान, दरबारीसेठ, आगरवाल अशा विविध जमातीच्या प्रदेशातल्या व्यक्तींचा समावेश आहे. महिना ५०० रुपये पगारावर नोकरीस लागलेल्या व्यक्ती संचालक बनल्या आहेत. धिस इज अ डिफरन्ट इंडस्ट्रियल हाऊस. आमच्या उत्पन्नाचा ८५ टक्के भाग धर्मादाय संस्थांच्या मदतीसाठी खर्च केला जातो. ताजमहल हॉटेलचे उत्पन्न कॅन्सर रुग्णालयासाठी वापरले जाते."

टाटा भयंकर बिझी आहेत. सकाळी ७ पासून ते रात्री १ वाजेपर्यंत त्यांचे कार्यक्रम ठरलेले असतात. राष्ट्रपतींचा कार्यक्रम जसा व्यवस्थित आखलेला असतो त्याचप्रमाणे टाटांचा कार्यक्रम नीट आयोजिलेला असतो. फोन सतत घणघणत असतो, कार्यकर्त्यांची ये-जा चालू असते. कोणीतरी येऊन त्यांना पुढच्या कार्यक्रमाची आठवण करून देते. मी तुम्हाला मुलाखतीसाठी पुरेसा मसाला दिला आहे असे सांगून टाटा बाहेर पडतात.

जॉर्ज फर्नांडिस यांचे निवडणूक कार्यालय आणि टाटा यांचे निवडणूक कार्यालय या दोन ठिकाणांना भेटी दिल्या तरी भारताचे जणू प्रतिनिधीक चित्रच डोळ्यासमार उभे राहते. एक गरिबांचा नेता तर दुसरा श्रीमंत. एकाची कचेरी सामान्य तर दुसऱ्याची शानदार. एकाला प्रचारासाठी पैसा मिळवायची मारामार तर दुसऱ्याला आहे तो गडगंज पैसा खर्च कसा करावा याची विवंचना. म्हणजे दक्षिण

मुंबईत खरी लढाई आहे ती गरीबी आणि श्रीमंती यांची. नवल टाटा हे विख्यात टाटा घराण्यातले. या घराण्याची प्रतिष्ठा, पुण्याई त्यांना या निवडणूकीत उपयोगी पडणार आहे. काहीना वाटतं की टाटा हे उद्योगमंत्री झाले तर आपल्या आर्थिक, औद्योगिक धोरणात फरक पडेल. म्हणून त्यांचा कल टाटांकडे आहे. मुस्लीमांची मते काँग्रेसलाच आहेत असे जरी सांगितले जात असले तरी पारशी या अल्पसंख्यांक जमातीतीलच आपण असल्याने मुस्लीम या दुसऱ्या अल्पसंख्यांकांचा आपल्याला पाठिंबा मिळेल असा आत्मविश्वास टाटांना वाटतो.

जॉर्ज फर्नांडिसचा प्रभाव जरी कमी झाला असला तरी तो जनतेला आपला नेता वाटतो. टाटा काहीसे परके वाटतात. जॉर्ज फर्नांडिसला तरुणातली लोकप्रियता, त्याचे मोहून टाकणारे वक्तृत्व कामी येणार आहे. मुस्लीम जमातीत जॉर्जला विरोध होतो आहे, त्याच्या सभा उधळल्या जात आहेत, पण तरीही आपले लोक त्या जमातीत आहेत असं जॉर्ज म्हणतो. गिरगाव भागातली मराठी माणसं आपल्यालाच मतं देणार असा त्याचा आत्मविश्वास आहे. चांगल्या मार्जिननं आपण निवडून येऊ अशी त्याची खात्री आहे.

डॉ. एन. एम. कैलास हे सत्तरी उलटलेले काँग्रेस उमेदवार. अगदी शांतपणे आपली प्रचार मोहीम चालवीत आहेत. इंदिरा गांधी आणि नवकाँग्रेस यांची लोकप्रियता ही त्यांना फार मोठ्या प्रमाणात उपयोगी पडणार. विशेषत: फर्नांडिस व टाटा या दोघा तुल्यबळ उमेदवारांना फारसे अनुकूल नाही असे समजले जाणारे मुस्लीम व्होट (मतदार १ लाखाहून अधिक) डॉ. कैलास यांना मिळेल असे बोलले जाते. कैलास कधी पत्रकार परिषद घेत नाहीत किंवा गाजावाजा करीत नाहीत. टाटा–फर्नांडिस लढतीत मध्येच कैलास बाजी मारतील असंही कित्येकजण बोलून दाखवतात.

बाकी १०–१२ उमेदवारांचा काही विचार करायलाच नको. कोणाचाच धड प्रचार नाही. त्यातल्या एका उमेदवाराला (के. टी. मिरचंदानी) सध्या खासदार आणि पुढे पंतप्रधान व्हायची इच्छा आहे म्हणे !

दक्षिण मुंबई हा चार–साडेचार लाख मतदारांचा निवडणूक विभाग. कुलाब्यापासून ते चौपाटीपर्यंत पसरलेला. यात गिरगावची घनदाट व मध्यमवर्गीय वस्ती आहे. तसेच मरीन ड्राईव्हची श्रीमंती वस्तीही आहे. लढत तिरंगी आहे. 'बंद'चा जनक फर्नांडिस, टाटा उद्योग समूहाचे नवल टाटा आणि नवकाँग्रेसचे डॉ. कैलास अशी चुरशीची लढत आहे. गरिबी श्रीमंतीला चीतपट करणार की श्रीमंती गरिबीला चाट मारुन उताणे पाडणार ते आता दिसेलच.

# झपाटलेला जॉर्ज
# एक प्रकट चिंतन

अगदी नकळत साऱ्यांचेच मुखवटे उतरलेले असतात. मुखवट्या शिवायची माणसे किती सुंदर दिसतात.

—बंदचा अनभिषिक्त सम्राट, घेराव, बळकाव, हरताळ या आघाडयावरचा झुंजार सेनानी जॉर्ज— पण आज जॉर्ज वेगळा आहे. आज जॉर्ज बनला आहे तिशीतला एक भाव व्याकुळ कार्यकर्ता, जॉर्जसमोर सरमिसळ असलेला एक जनसमुदाय आहे. त्यातील काही सेनापतींचा आदेश मानणारे कडवे 'सैनिक' आहेत. काही जण राष्ट्ररक्षणाचा टिळा लावलेले 'दक्ष' कार्यकर्ते आहेत. काही आहेत अँग्री यंग मेन. काही जण उगाचच आमच्यासारखे टिवल्याबावल्या करणारे. पण आज साऱ्यांनाच कुठला तरी सूर सापडतो आहे. अगदी नकळत एक प्रसन्न मनमोकळी मैफील जमली आहे.

खड्या सुरात जॉर्ज एक प्रश्न विचारतो. "तुमचे माझे भवीतव्य ठरवणारी एक निर्णायक निवडणूक उद्यापरवावर आली. तुमच्या समोर उभ्या असलेल्या साऱ्या उमेदवारांचे चरित्र तुम्ही समजावून घेतले आहे. त्यांचे जाहिरनामे अभ्यासले आहेत असे सांगणारा एकतरी माणूस मला या सभेतून पाहिजे आहे." —का कोण जाणे. साऱ्या सभेवर एक विलक्षण दडपण येते. पण ते दडपण फार वेळ टिकत नाही. मिस्कील डोळ्याने जॉर्ज सांगत असतो "तुमची गोष्ट विसरा. आज उभे असलल्या उमेदवारांनीच नव्हे, तर लोकसभेतल्या माझ्या अनेक सहकाऱ्यांनीही स्वतःचे जाहिरनामे कधी वाचलेले नव्हते! केवळ विनोद करण्यासाठी मी हे विधान करित नाही. ही वस्तुस्थिती आहे. साऱ्याच गोष्टींचा आपण जरा खुल्लमखुल्ला विचार करू या. उद्याची निवडणूक तुमचे भवितव्य ठरविणार या विधानाला तरी काही अर्थ उरलेला आहे का? जास्तीतजास्त येवढेच म्हणता येईल की आम्हा उभे असलेल्या उमेदवारांचे पुढील पाच वर्षाचे भवितव्य ही निवडणूक ठरविणार आहे! हे असे का घडते आहे?— आपण कोणत्या मार्गाने कुठे चाललो आहोत?



जायंट किलर...पण आज सूर काही वेगळाच होता
...फार फार आतला होता...

केशव गोरे यांच्या तेराव्या स्मृतिदिनाच्या वेळीं जॉर्ज बोलत होता. आज तो जणू झपाटला होता. एका तंद्रीत स्वतःला हरवून तो काही स्वगत, प्रगट चिंतनाच्या स्वरूपात बोलत होता. आजचा जॉर्ज किती वेगळा होता. हे त्याचे स्वगत म्हणजे स्वतःच्या व इतरांच्या समर्पणाचे समर्थन नव्हते. तर पायात भिंगरी बांधलेला पण

चकव्यात सापडलेला, थकलेला एक माणूस स्वतःच्या पावलांच्या जुन्या खाणाखुणा शोधत होता......

जॉर्ज सांगत होता, ' स्वच्छ प्रामाणिक कारभाराची प्रतिज्ञा करून आम्ही लोकसभेत जातो. या देशाच्या कारभाराला खोटेपणा व लाचलुचपत याचा त्रास होऊ नये म्हणून, रखवालदार म्हणून आम्ही उभे राहणार. आता एका साध्या गोष्टीचा विचार करा. लोकसभेची निवडणूक लढवताना पस्तीस हजारांहून अधिक रुपये खर्च करणार नाही म्हणून आम्ही वचनबद्ध आहोत. लोकसभेचा मतदार संघ केवढा मोठा असतो. आपल्या साऱ्या मतदारांना पाठवण्यासाठी कार्ड छापून घ्यावयाची तरी किमान पंधरा हजार रुपये खर्च येतो. ही नुसती खर्चाची सुरुवात असते. आणि तरीही निवडून येणारे आम्ही सारे पस्तीस हजार रुपयांहून कमी खर्च करून निवडून येतो ! निवडून येणारे आम्ही सारे प्रामाणिक असतो ! प्रामाणिक कारभाराचे रखवालदार असतो !

या साऱ्या भोंगळ, परस्परविरोधी, गुंतागुंतीच्या गोष्टी कशातून निर्माण होतात. शब्दात आशय ओतताना आपण कोठे काही गफलत करतो का ? हा देश माझा आहे असे मी म्हणतो. आपणही म्हणता. पण हा देश म्हणजे या देशाच्या सीमा नव्हेत. या देशातील डोंगर आणि नद्यानाले नव्हेत. हा देश म्हणजे या देशात राहणारे लोक असे मी मानत आलो आहे. आपण कशासाठी भांडतो आहोत, कोणासाठी भांडतो आहोत, कोणाविरुद्ध उभे आहोत हा प्रश्न यानंतर निर्माण होतो. तुमच्यापैकी अनेकांच्या मनात जॉर्ज ही एक डागाळलेली प्रतिमा आहे. एक आक्रस्ताळी, स्टंटबाजी करणारा माणूस म्हणून तुम्ही मला ओळखता. दोन महिन्यापूर्वी मुंबईतील एक नवी कोरी इमारत मी चोवीस तास बळकावून बसलो होतो. जॉर्जचा नवा स्टंट म्हणून मुंबईतल्या साऱ्या वृत्तपत्रांनी याची संभावना केली. या मार्गांनी जागेचा प्रश्न सुटणार नाही म्हणून साऱ्यांनी सांगितले. या मार्गांनी जागेचा प्रश्न सुटणार नाही इतपत तर मलाही कळते ! पण प्रस्थापिताविरुद्धची—establishment च्या विरुद्धची लढाई अखेर कोणीतरी कोठेतरी सुरू करावयासच हवी. पहिली तोफ कोणीतरी कोठेतरी डागली पाहिजे. त्यासाठी कारावास भोगला पाहिजे. हेही आज लोक मान्य का करीत नाहीत हा खरा प्रश्न आहे. प्रस्थापिताविरुद्धची लढाई ही केवळ विषम शक्तीतील लढाई नाही. अनेक मार्गांनी ही लढाईच घडवून आणली जात नाही. दडपले जाणारे सारे लोक प्रस्थापिताविरुद्धची लढाई देतात, त्याऐवजी दडपले जाणारे आपापसात लढतात अशी जादू आज प्रस्थापिताला करता येते. सचिवालयातील कारकुनांचा संप हा ग्रामीण जनतेविरुद्ध आहे हे ग्रामीण जनतेला पटते. टॅक्सीड्रायव्हर आपणाविरुद्ध आहेत असे मुंबईच्या

जनतेला वाटते. बेस्टचे कामगार आपला काही खास वर्ग निर्माण करताहेत असे मुंबईचे इतर कामगार मानतात. या लढाया आपापसातल्या नव्हेत. आपणा सर्वांची प्रस्थापिताविरुद्धची जी मोठी लढाई आहे त्यातील या छोटचा लढाया. त्या अंतिम लढयासाठी आवश्यक असलेल्या या प्राथमिक लढाया. हे समजावून घेण्यात व देण्यात आपण आज असमर्थ ठरलो आहोत.

आपले अपयश इथेच संपत नाही. प्रस्थापित अगदी सहजपणे आपणाविरुद्ध नवे सापळे उभे करते. आपली शोकांतिका ही की आपण सहजपणे त्या सापळ्यात सापडतो. कर्णाला पडलेला प्रश्न तर अजूनही कायम उरतो. मी कोणत्या धर्मात जन्मलो. मी कोणत्या प्रांतात जन्मलो. माझी जात कोणती. माझी भाषा कोणती. या साऱ्या गोष्टींशी माझा काही संबंध नव्हता. या साऱ्या गोष्टी माझ्या आई-वडिलांनी ठरविल्या. माझे आई-वडील काही मी ठरवू शकत नव्हतो. त्यांनी दिलेल्या या साऱ्या गोष्टी मात्र मला जन्मताच स्वीकाराव्या लागल्या. आणि या देशात आपण कोठेही गेलो तरी माझी किंमत ठरविताना या गोष्टी प्रथम विचारात घेतल्या जातात.

या अशा परिस्थितीत ' प्रत्येक माणसाला एक मत '' असा आवाज देऊन आपण निवडणूकीच्या मैदानात उतरतो. पण प्रत्यक्ष व्यवहारात या आकर्षक घोषणेची खरी किंमत काय असते ?—आपण मनमोकळेपणाने बोलणार आहोत. थोडा वेळ व्यक्ति विसरा. आज विदिषाच्या मतदारसंघात रामनाथ गोएंका उभे आहेत. निवडणूकीच्या रणांगणात वृत्तपत्र हे सर्वांत प्रभावी हत्यार. देशातल्या प्रमुख वृत्त-पत्रांचे गोएंका हे मालक. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल कोणीच वाद घालणार नाही. त्यांनी राज्यसभेत वा लोकसभेत जावू नये असेही मी म्हणणार नाही. पण विदिषा-तील बहुसंख्य अशा आदिवासी जनतेचा आणि गोएंकाचा कधीतरी संबंध आलेला आहे का ? त्या लोकांचे प्रश्न व त्यावरची उत्तरे त्यांना माहीत आहेत का ? विदिषाच्या आदिवासी विभागात स्वतःची हयात घालवलेला एखादा कर्तृत्ववान कार्यकर्ता गोएंकाच्याविरुद्ध उभा राहिला तर निवडून येईल का ? प्रत्येक माणसाला एक मत या घोषणेला या निवडणुकीत काय अर्थ उरेल ?—स्थानिक प्रश्नांची जाण असलेला उमेदवार हवा. त्या पक्षाचे व त्या उमेदवाराचे त्या विभागात कार्य हवे. पण याबाबतही आपण एक मजेशीर गोंधळ घालतो. दक्षिण मुंबई या माझ्या मत-दारसंघात पुढील पाच वर्षांत दहा हजार घरे पाडावीच लागतील. पण ही आवश्यक घरे पाडत असतानाच त्या लोकांच्या पर्यायी निवासाची सोय व्हावयास हवी. त्या विभागात समुद्र हटवून बांधलेल्या जमिनी अफाट भावाने श्रीमंतांना विकल्या-या ऐवजी लोकांची घरे बांधण्यासाठी या जमिनी वापरल्या पाहिजेत. माझ्या विभागाची ही एक प्रमुख गरज आहे. त्यासाठी अनेक पातळ्यावरून मला भांडावे लागेल. मी तसा भांडेनही. पण मी लोकसभेत जाण्याचा आणि या घरांचा काही

संबंध नाही. पण उद्या माझ्या मतदारसंघात गेल्यावर मीं लोकसभेत जाऊन हा प्रश्न सोडवणार आहे असे जर मी सांगितले नाही तर त्या घरातून राहणाऱ्या माझ्या मतदारांना बरे वाटणार नाही. मलाही बरे वाटणार नाही. यातही मजेची गोष्ट अशी की माझ्या लोकसभेतील कामाचा आणि या घरांचा काही अर्थाअर्थी संबंध नाही हे माझे मतदार मनोमन जाणत आहेत !

मी सांगतो आहे ते किस्से मजेशीर नाहीत. आणि अस्वस्थ व्हावेत असे आहेत. निवडणूकीचे अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मी मोंगीरला होतो. मधु लिमये तिथे उभे आहेत. त्यांच्याविरुद्ध जिद्दोरचे महाराजे उभे आहेत. निवडणुकीचा अर्ज भरण्यासाठी मोठ्या मिरवणूकीने महाराज आले. जिद्दोर ते मोंघीर हे वीस मैलांचे अंतर ! अनेक ट्रक्स, पुष्कळ जिप्स व मध्ये महाराजांची गाडी असा एक प्रचंड तांडा हे वीस मैलाचे अंतर तोडून आला ! प्रत्येक गाडीवर ' इंदिरा गांधी की जय ' असे फलक होते ! गाडीतील लोक इंदिरेचा जयजयकार करीत होते ! वाटेतील लोक महाराजांना हार घालीत. इंदिरेचा जयजयकार होई. हे वीस मैलाचे अंतर तोडावयास या मिरवणूकीला चार तास लागले ! महाराज अर्ज भरण्यासाठी लिमयेंच्या बरोबरच कचेरीत गेले. येवढयात दिल्लीहून तार आली. कॉंग्रेसने दुसऱ्याच उमेदवाराला तिकिट दिले आहे. जिद्दोरच्या महाराजांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून अर्ज भरला. साऱ्या गाड्यांच्यावर ' जिद्दोर महाराज की जय ' म्हणून नवे फलक लागले ! जिद्दोर महाराजांच्या जयजयकारात ही मिरवणूक मोंघीरहून जिद्दोरला परत गेली ! वाटेत लोकांनी पुन्हा महाराजांना हार घातले ! जिद्दोर महाराजांचा जयजयकार केला ! परतीचा प्रवास करावयास या मिरवणूकीला चार तासच लागले !—आणि मधू लिमयेंच्या विरुद्ध निवडून आले तर जिद्दोरचे महाराजच निवडून येतील ! कारण ते राजपूत असल्याने तीस टक्के राजपूत मते त्यांची आहेत. जिद्दोरमधली मते तर त्यांची बांधलेली मते आहेत.

आपणा सर्वांच्याच समोरचा खरा प्रश्न वेगळा आहे. तेवीस वर्षांच्या अविश्रांत वाटचालीनंतर आपण दोन पावले पुढे आलो आहोत का दोन पावले मागे गेलो आहोत हे आपण प्रत्येकाने प्रामाणिकपणे शोधले पाहिजे. कारण आपण सारेच जण सहजपणे इतरांना फसवू शकतो. पण स्वतःला फसवणे मात्र कठीण नव्हे तर अशक्य असते—प्रस्थापिता विरुद्धच्या लढाईत आपला आजचा मार्गच चुकला आहे असे म्हणत कडवे नक्षलवादी तरुण आज पुढे येताहेत. काल मी कलकत्त्यात होतो. वाहतूक नियंत्रण करणाऱ्या प्रत्येक पोलिसाचे संरक्षण करण्यासाठी दोन पिस्तुलधारी पोलिस आज कलकत्त्यात ठेवावे लागतात ! आणि या कलकत्त्यात बिर्लासारखा मोठा उद्योगपती म्हणाला, ' मी जर तरुण असतो तर आज नक्षलवादी बनलो असतो ! '-बिर्लांना नक्की काय म्हणायचे आहे हे मला समजले नाही. माझे मत, नक्षलवादी तरुण हे कडवे त्यागी पण वाट चुकलेले आहेत असे आहे. काही

खून व थोडी गुंडगीरी करून प्रस्थापितांविरुद्धची लढाई आपण जिंकणार नाही. यामुळे खरा फायदा प्रस्थापितांचा होईल. आपला नव्हे. बिर्लांनी या मार्गाचे अप्रत्यक्षपणे कौतुक करण्यामागचे कारण कदाचित हे असेल. बिर्लांना आपला घटनात्मक संघर्षांचा विरोध सहन होत नाही. नक्षलवाद्यांचा विरोध परवडला असे त्यांना म्हणावयाचे असेल. कदाचित आपण घेतलेल्या असिधारा व्रताच्या प्राथमिक यशाची ही पहिली पावती असेल.

जॉर्जचे भाषण संपले त्यावेळी रात्रीचे बारा वाजून गेले होते. जॉर्ज असे खूप काही विस्कळीत पण सुसूत्र बोलून गेला होता. जॉर्जच्या भाषणात पुन्हा पुन्हा एक अगतीक प्रश्न येत होता. आपण दोन पावले पुढे आलो का मागे गेलो हे तो तपासत होता. जॉर्जचे भाषण संपले त्यावेळी सभास्थानी बसलेल्या अनेक पक्षांच्या व्रतधारी कार्यकर्त्यांसमोर तेच प्रश्नचिन्ह त्यांना अस्वस्थ करत उभे होते. त्या सर्वांच्या समोर केशव गोरेंची राकट पण प्रसन्न हसरी तसवीर होती. त्या तसबीरी खाली ओळी होत्या—

—या कुजबुजीच्या अंधुक ताना
शतकातून का रिघतील काना
डोलवाल का अपुल्या माना
—का स्मराल मन जे धडपडले...?

■ ■ ■

---

हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका
सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये
राजहंस प्रकाशन

---

# लोकमत किमान न्याय देईलच!

वि. ग. कानिटकर

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची ही पाचवी निवडणूक मी पहातो आहे. निवडणुकीचा मुख्य फायदा म्हणजे मोठमोठ्या जाहीर सभा होतात व ज्यांना राजकारणात निरनिराळ्या कारणाने महत्त्व प्राप्त झाले आहे, अशी माणसे सामान्य लोकांपुढे जास्तीतजास्त प्रामाणिक होऊन भाषण करतात. मी सर्वांच्या सभांना वेळ असला तर जातो. कारण सभेत जे काही सांगितले जाते, त्याचा माझ्या मताशी काहीही संबंध नसतो. मग मी जातो का? तर ही माणसे सभेत आपआपले बुरखे थोडेफार दूर करतात. लोकांची मते त्यांना हवी असल्यामुळे थोडीशी जनलज्जा यावेळी त्यांच्यावर परिणाम करतेच करते.

असंख्य सभा आणि चार निवडणुकांच्या निकालांचा अनुभव पाहिल्यानंतर, काही गोष्टी लक्षांत आल्या आहेत. त्या अशा–

१. लोकमत हे मतपेटीतून कितीही चमत्कारिक पद्धतीने व्यक्त झाले, तरी त्याच्यात किमान न्यायबुद्धी नेहमी आढळते.

२. जी गोष्ट नैतिकदृष्ट्या चूक असते, त्याचे राजकीय समर्थन लोकांना फसवू शकत नाही.

३. ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे काहीही नसते, त्यांना गुंडांचा आणि अर्वाच्य शिव्यांचा साठा सतत जवळ लागतो.

मला दोन मते आहेत. एक प्रत्यक्ष मत आणि दुसरे अप्रत्यक्ष मत. मला जे घडावेसे वाटते परंतु जे घडवणे अल्पांशानेही माझे हाती नाही ते माझे अप्रत्यक्ष मत. एखाद्याचे प्रत्यक्ष मत माझ्यासारखे नसले, तरी ते समजू शकते परंतु अप्रत्यक्ष मते जरी जुळली तरी मला समाधान वाटते. कारण देशाचे आयुष्य अनंत आहे– निवडणुका सारख्या होणार आहेत.

भारताची फाळणी झाली. मुसलमान धर्माच्या आधारावर ही फाळणी झाली.

मुसलमानांच्या संबंधीची काँग्रेस व समाजवादी या दोघांची 'समज' पूर्णपणे चुकीची व भ्रांत ठरली. याबद्दल सुप्रसिद्ध समाजवादी विचारवंत अच्युतराव पटवर्धन काय म्हणतात पहा—

"आमची मुख्य चूक मानवी मनाचा चिवट परंपरावाद आणि त्याचे तितकेच बळकट स्वरूप ओळखण्यात झाली आहे. मुस्लिम समाज, परंपरावाद उफाळून संघटित होईल, असे आम्हास वाटत नव्हते. परिणामी भांडणे लावणारी तिसरी सत्ता गेली म्हणजे हा प्रश्न आपोआप सुटेल असे आम्हास वाटे. आमची भूमिका कितीही प्रामाणिक असो, इतिहासाने ती खोटी ठरवली म्हणून सगळा विचार नव्याने केला पाहिजे."

हा नवा विचार काय असावा?

विचार असा आहे.

भारतातील मुसलमानांना आता या देशात रहावयाचे असेल, तर कसलाही सामुदायिक माजोरीपणा त्यांना करता येणार नाही. इथे 'मुस्लिम लीग'चे पुनर्जीवन करता येणार नाही. पाकिस्तान मुसलमानांनी कसलाही पराक्रम करून मिळवलेले नाही! दंगेधोपे करून, बायका-मुलांची निर्घृण हत्या करून, बलात्कार करून, निरपराधांच्या कत्तली करून त्यांनी हे मिळवले आहे. हा सौदा मुसलमान समाजाला कधीच परवडला नसता, परंतु हिंदूंनी आपले नेतृत्व ज्यांच्या हाती दिले होते, त्यांच्या चांगुलपणाचा, उदारतेचा मुसलमानांनी गैरफायदा उठवला व हे पाप त्यांना पचल्यासारखे झाले आहे. पुन: अशी चूक हिंदू करण्याची शक्यता कमी आहे. मुसलमान समाजातील काही विचारवंतांना ही गोष्ट उमगलेली आहे, परंतु दुर्दैवाने त्यांचे यश अतिअल्प आहे. हा जगन्नाथाचा रथ अडवण्याचा प्रयत्न, जर मुसलमानांचे जात्यंध नेतृत्व करू पाहील, तर त्यांना व त्यांच्यामतासाठी त्यांना जवळ करणाऱ्यांना चिरडून हा रथ आता पुढे जाईल, हा नवा विचार आहे.

भारताच्या आणि जगाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने हे मत या निवडणुकीत स्पष्टपणे व्यक्त होणे अगत्याचे आहे. न्यायाचे आहे. तसे ते व्यक्त होईल.

हा विचार प्रबळपणे व्यक्त होईल असे मात्र नाही. या विचाराला प्रबळ यश का लाभत नाही? असा संभ्रम अनेकांना पडतो, याचे उत्तर सोपे आहे. हा विचार पचवण्यासाठी शिक्षणाचा प्रसार होऊन देशातील निरक्षरता नाहीशी होणे अवश्य आहे. देशापुढचे धोके समजण्याची बहुसंख्य प्रजेची कुवतच आज कमी आहे. दुसरी गोष्ट देशातील दारिद्र्य अमाप आहे. माणूस जगू शकला—दोन वेळची भाकरी, वस्त्र व निवारा या गोष्टी लाभल्या, तर स्वाभिमानाने जगण्याचे महत्त्व त्याला पटेल. तेव्हा हा विचार प्रबळपणे प्रगट झाला नाही, तरी त्यातून चुकीचे निष्कर्ष काढले जाऊ नयेत.

देशात गरिबी असताना शेकडो एकर जमिनी करणे, तनवे खाणे या गोष्टी

नैतिकदृष्टया चूक आहेत. त्याचे राजकीय समर्थन लोकांना फसवू शकणार नाही. जनता वेचून वेचून अशी माणसे पराभूत करील. मग त्यांचे तिकिट कुठल्याही पक्षाचे असो.

काही प्रामाणिक-निस्वार्थी माणसे निवडणुकीला उभी रहातात. सगळयाच पक्षांच्या तिकिटांवर अशी थोडीफार माणसे उभी रहातात. यांना जनता निवडून देते काय ? निवडून द्यावे काय ? सर्वसामान्य नागरिकाला यातनाशून्य आयुष्य जगण्यासाठी हे दोन गुण पुरेसे आहेत, परंतु केवळ या दोन गुणावर देशाचे राजकारण करणारी माणसे देशाच्या यातना वाढवणार नाहीतच, असा विश्वास मला वाटत नाही.

राजकीय पक्षाच्या नेत्यांजवळ काही प्रतिभा असली पाहिजे—कारण सांगण्यासारखे काही जवळ असणे हा मुळी प्रतिभेचाच भाग आहे. कुणाच्या प्रतिभाशून्यतेचा देशाला कमीतकमी त्रास होईल हे जनता शोधून काढील. हा शोध लोकांनी घेणे न्यायाचे होईल. तेव्हा मनुष्य निस्वार्थी आहे—प्रामाणिक आहे—याचे महत्त्व कमी न करता, लोकशाही राजकारणात, असा मनुष्य कोणत्या पक्षाच्या तिकिटावर उभा आहे आणि त्या पक्षाच्या नेतृत्वाचा वकूब काय आहे, हे देखील लोक पहातात. यामुळे अशा माणसाच्या निवडणुकीतील पडझडीबद्दल चुकीचे निष्कर्ष काढले जाऊ नयेत.

माझे प्रत्यक्ष मत हे 'गुप्त' आहे ! ते सांगणे योग्य नाही, कारण मी एक मतदार आहे.

या निवडणुकीत नवकाँग्रेसला २६० जागा व 'जनसंघ' आणि 'संयुक्त समाजवादी पक्षाला' प्रत्येकी ५० जागा मिळाल्या तर लोकमत उचित न्याय नेहमी देते या माझ्या विश्वासाला आधार मिळेल.



# मुंबई मिसळ

काही खरं, काही गॉसिप, (तेव्हा माणूसच्या कानी सात काळच्या!)
निवडणुकीत नाना घटना घडतात, नाना अफवा उठतात.
त्यांचीच ही खास माणूसची मुंबई मिसळ!

ही 'इलेक्शन' म्हणजे विलक्षण मामला. केव्हा कोठे काय घडेल हे सांगणं कठिण, या निवडणूकीपायी एवढे दिवस स्वतःला प्यार असलेला पक्ष प्राण गेला तरी सोडणार नाही. असे सांगणारे तो सोडतात. (प्राण नव्हे, पक्ष!) मुंबईत नाना चूडासामा (याचं नाव नाना असलं तरी हा नेता समजतो विद्यार्थ्यांचा आणि तेही एकटधा मुंबईतल्या नव्हे तर अलम दुनियेतल्या) यांनी आपला स्वतंत्र पक्ष सोडून त्याला स्वतंत्र केलं. डॉ. दत्ता सामंत यांनी संयुक्त समाजवादी पक्षाला रामराम ठोकला. पुढं नानांनी टाटांसाठी इलेक्शनला टाटा केला. सामंत मात्र जनरल करिअप्पा, आगासकर यांच्याविरुद्ध उभे राहिले आहेत. निवडणूकीत मति ही अशी फिरते तेव्हा काहीही घडण्याची शक्यता असते.

आता हेच पहा ना. श्री. नवल टाटा यांनी आपली उमेदवारी जाहीर करताच पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांना दोनदा फोन केला म्हणे! अहमदाबादच्या एका गुजराती पत्राने ही बातमी ठळकपणे छापली. पंतप्रधानांनी टाटांचं अभिनंदन केलं असं त्या वृत्तपत्रानं म्हटलं. परंतु अंदरकी बात कुछ और आहे असं म्हणतात. बाईंनी आमचे उमेदवार डॉ. एन. एम. कैलास यांना तुमच्यासाठी निवडणुकीतून रिटायर व्हायला सांगू काय असं टाटांना विचारलं अशी बोलवा आहे. (खुद्द टाटांनाच याबाबत विचारलं असता ते म्हणाले 'इट्स अनफाऊंडेड'). एवढंच काय पण अगदी परवापर्यंत डॉ. कैलास निवडणूकीतून निवृत्त होणार अशी अफवा आहे. याच्या पुष्टचर्थ एक उदाहरणही एकानं सांगितलं. आठवडाभरापूर्वीची

गोष्ट. मुस्लीम भागातील एक प्रमुख कार्यकर्ता डॉ. कैलास यांना भेटायला गेला. आमच्या भागात तुमचा काहीच प्रचार नाही. पोस्टर्स, हँडबिले द्या अशी मागणी त्याने डॉ. कैलास यांच्यापाशी केली. डॉ. कैलास यांनी त्याला दुसऱ्यादिवशी बोलावले. तो ठरल्याप्रमाणे आला तेव्हा डॉ. कैलास म्हणाले 'जरा दोन-तीन दिवस थांबा पंतप्रधान दिल्लीहून काही घोषणा करण्याची शक्यता आहे. त्यानंतर आपण आपल्या प्रचाराचे ठरवू' तो कार्यकर्ता हिरमुसला अन निघून गेला. ही घोषणा म्हणजे मुदतपूर्व निवडणूक महिन्याने पुढे ढकलणार किंवा कैलास यांना निवडणूकीतून निवृत्त व्हायला सांगणार अशी होती म्हणे. पुढे या घोषणेचं काय झालं ते पंतप्रधान जाणे !

टाटांचा विषय निघाला म्हणून सांगतो, टाटांनी प्रचाराचा धूमधडाका लावलाय. व्ही. टी. समोर कॅपिटाल सिनेमापासून ते टाटांचे निवडणूक कार्यालय असलेल्या धीरज चेंबरपर्यंत टाटांच्या पोस्टर्सच्या माळा आहेत. दक्षिण मुंबईत जागोजाग त्यांची पोस्टर्स आहेत. मोटारींच्या काचावर छोट्या स्लिप्स डकवलेल्या आहेत. थिएटरमध्ये स्लाईड्स आहेत. स्टर्लिंग थिएटरच्या डोअर-कीपर्सनी तर व्होट फॉर टाटाचे बिल्ले लावले आहेत. टाटांची निशाणी रेल्वे इंजिन. त्याची एक प्रचंड प्रतिकृती असलेलं आणि धूर सोडणारे इंजिन बनवण्यात आलं आहे. हिंदी, उर्दू, गुजराती, मराठी भाषात विपुल साहित्य प्रसिद्ध केलेलं आहे. गरीबांना खरेदी करायला परवडणार नाही असे चांगले कापड बॅनर्स साठी वापरलेले आहे. (काही कापडवाल्यांनी हे बॅनर्स टाटांनी भेट दिले म्हणे! जरा चांगलं कापड वापरा असं टाटांनी त्यांना सुचवलं म्हणे!) टाटांची धीरज चेंबरमधील कचेरी पाहण्यासारखी आहे. तळमजल्यावर कार्यकर्त्यांचा मोठा घोळका. ८–१० टायपिस्ट्स, क्लार्क्स, पोस्टर्स, हँडबिले यांचे गठ्ठेच्या गठ्ठे पडलेले. फोन, इंटरकॉमची सोय असलेलाही फोन. कोणाला बोलवायचं असलं तर तेथे लाऊडस्पीकर ठेवलेला दुसऱ्या मजल्यावर बडी मंडळी. टाटांचे काम करणारे नाना चुडासामा प्रभृती तेथे बसतात. दक्षिण मुंबईतील वॉर्डांचे व्यवस्थित नकाशे केलेले. (घरांचा प्लॅन ज्या निळसर कागदावर असतात तसल्या कागदावर हे नकाशे) या नकाशांवरील विविध भागावर हिरव्या पिना लावलेल्या. ऑफिसबाहेर मोटारींच्या रांगा. असा टाटांचा सारा थाट. त्यांनी मनात आणलं तर सबंध दक्षिण मुंबईत रेल्वे लाईन टाकून ते आपलं निडवणूक चिन्ह म्हणून खरंखुरं रेल्वे इंजिन फिरवू शकतील. पण टाटांना बलून सोडणं कॉस्टली वाटतं असं त्यांच्याच एका माणसानं सांगितलं. प्रचाराची काही नवी आघाडी आहे की नाही? असं मी टाटांच्या प्रसिद्धी अधिकाऱ्याला विचारलं तेव्हा तो म्हणाला, 'बलून आकाशात सोडायची कल्पना होती. मग आम्ही कोटेशन्स मागविली. निदान चार हजार रुपये तरी एका बलूनला पडतील असं दिसून आलं तेव्हा तो विचार सोडून दिला.' ◻ ◻


संघटना कांग्रेस कार्यकर्ते टाटांसाठी राजरोस काम करीत आहेत. तिकडे निजलिंगप्पांनी दिल्लीहून आदेश पाठवला फर्नांडिससाठी काम करा. श्रीमान हाफिझका साहेबांना बऱ्याच वर्षांनी सद्सद्विवेक बुद्धिची जाणींव झाली. कार्यकर्त्यांनी आपापल्या कॉन्शसनुसार कोणाला पाठिंबा द्यावं हे ठरवावं असे त्यांनी सांगितले. जुन्या बी. पी. सी. सी. चे पितामह स. का. पाटील यांच्या कॉन्शसची तर काय बातच विचारायला नको. त्यांचे परम स्नेही (?) व राजकारणातले साथीदार निजलिंगप्पा हे टाटांना पाठिंबा द्यायचा नाही असे सांगत असतानादेखील खुद्द स. का. पाटील टाटांच्या धीरज चेंबर मधील कचेरीत गेले. त्यांनी कचेरीची पाहणी केली आणि कार्यकर्त्यांपुढे एक भाषणही ठोकलं. आपण फर्नांडिसला पराभूत करू शकत नसलो तरी दुसरा कोणीतरी करील या कल्पनेचा आनंद त्यांना झाला असावा.

हे पाटील आरोळ्या ठोकण्यात पटाईत. दक्षिण मुंबईतून पाटील की फर्नांडीस असा वाद आरंभी उद्भवला होता तेव्हाची गोष्ट. एका सभेत पाटलांनी सांगून टाकले की मीच दक्षिण मुंबईतून उभा राहणार, यात काही शंकाच नको ! मी त्या सभेला नव्हतो. पाटील खरोखरच असं म्हणाले की काय याची शहानिशा करून घ्यावी म्हणून मी त्यांना घरी फोन केला. 'आपण द. मुंबईतूनच निवडणूक लढवणार म्हणे ?' मी त्यांना विचारलं. त्यावर त्यांनी निक्षून, वारंवार मी या मतदारसंघातून उभं राहणार असं सांगितलं. रात्री एका सिनियर वार्ताहराला ही गोष्ट मी सांगितली. तो गुजरात प्रदेश कॉंग्रेसच्या अहमदाबादेतील बैठकीला हजर राहून त्याच दिवशी परतला होता. 'छचा, तेथे बनासकाठाचे लोक पाटलांना आपल्याकडेच उभे करावे म्हणून अक्षरशः विनवणी करीत होते. त्यांची ही विनंती मान्य झाली. पाटील येथे उभे राहत नाहीत.' आणि तसंच घडलं. एक दिवशी पाटील मुकाट बनासकाठ्याला निघून गेले.

याच पाटलांनी परवा पत्रकार नाहीत असं पाहून कार्यकर्त्यांपुढे सणसणीत भाषण केलं म्हणे. डॉ. शांती पटेलांवरही त्यांनी टिका केली असं सांगतात. त्यानंतर पत्रकारांना मी 'बॉम्बशेल' टाकणार आहे असे ते म्हणाले पण अजून तरी त्यांनी 'बॉम्बशेल' टाकलेली नाही. पत्रकार त्यांची औत्सुक्यानं वाट पाहताहेत.

ब्रह्मानंद रेड्डी, सुखाडीया व यशवतराव चव्हान यांचा श्रीमती इंदिरा गांधींना पुन्हा पंतप्रधान बनू न देण्याचा डाव आहे असेही म्हणतात. प्रजा समाजवादी पक्षाचे सरचिटणीस प्रेम भसीन यांनी यशवंतराव चव्हाण आणि जगजीवनराम यांना आपापल्या खासदारांचे प्रबळ गट प्रस्थापित करावयाचे आहेत असे सांगितले. ◻ ◻

टाटांनी उमेदवारीचा अर्ज अगदी शेवटच्या दिवशी भरला आणि तोही अर्ज भरायची मुदत संपायच्या थोडा वेळ आधी. त्यापूर्वी शिवसेनाप्रमुख श्री. बाळ




LIC/Z-70A MR

**तुम्ही भरीत असलेले विमाहप्ते आयुर्विमा कॉर्पोरेशन देशभर प्रचंड प्रमाणावर चाललेल्या आर्थिक कार्यक्रमांत गुंतवीत असते. मळे हा त्या कार्यक्रमांपैकीच एक.**

आयुर्विमा कॉर्पोरेशनने २ कोटी ८२ लाख रुपयांहून अधिक रक्कम त्यामध्ये गुंतविली आहे. तुम्ही भरीत असलेल्या विमा हप्त्यांमुळे अवजड उद्योगधंदे, लघु उद्योगधंदे, ग्राहकांसाठी तयार केला जाणारा माल, बँक व्यवहार, वाहतूक यासारख्या देशाच्या विकास कार्यात आयुर्विमा कॉर्पोरेशनला गुंतवणूक करण्यास साहाय्य होत असते. ३१ मार्च १९७० पर्यंत १५२८ कोटी ६६ लाख रुपयांहून अधिक रक्कम या कार्यात तिने गुंतवली आहे. दरवर्षी हा आंकडा सतत वाढतच चालला आहे.

केवळ सुरक्षितताच नव्हे तर त्याहूनही अधिक असे आयुर्विमा कॉर्पोरेशन काही देत असते. तुमच्या आणि देशाच्या कल्याणासाठी ती आपला वाटा उचलीत असते. ती एक सर्वात अधिक गुंतवणूक करणारी भारतातील एकमेव संस्था आहे.

**काही गुंतवणूकींवर एक दृष्टिक्षेप**

| | कोटी रु. |
|---|---|
| घरबांधणी योजना | २८५.६७ |
| वीज | २१५.७३ |
| पाणी पुरवठा व गटारबांधणी | २८.४९ |
| इंजिनियरिंग | ४३.२५ |
| कापड गिरण्या व ज्यूट | ३०.७४ |
| लोखंड आणि पोलाद | १७.३५ |

**आयुर्विमा कार्पोरेशन**
**—प्रगतीतील तुमची सहकारी**

ठाकरे यांनी त्यांची भेट घेतली होती असे म्हणतात. ही भेट झाली की नाही कोणास ठाऊक परंतु निवडणूकीस उभे राहण्यापूर्वी शिवसेनेचा आपल्याला पाठिंबा मिळेल की नाही याची चाचपणी आपल्या एका मित्रामार्फत टाटांनी केली होती अशी मात्र खात्रीलायक बातमी आहे. □ □

मतदाराचे परिचय कार्ड लिहिण्यासाठी टाटांच्या निवडणूक कचेरीबाहेर खूप मोठा मंडप टाकण्यात आला होता. आठ दिवस ही ५ लाख कार्डे लिहिण्याचे काम चालू होते. शंभर मुली हे काम करीत होत्या, प्रत्येक कार्डात तीन रकाने होते. ते लिहिले की दर कार्डांमागे प्रत्येक मुलीस एक पैसा अशी मजुरी ठरली होती म्हणजे १०० कार्डांस एक रुपया दर झाला. □ □

संयुक्त समाजवादी पक्षात राजनारायण यांचा एक गट व जॉर्ज फर्नांडिस यांचा एक गट असे दोन गट बनले असून त्यांच्यातले मतभेद वाढत आहेत असे बोलले जाते.. ते काहीही असो राजनारायण यांनी फर्नांडिसच्या प्रचारासाठी आपण एक दिवस द. मुंबई घालवण्याची ऑफर दिली होती व त्याबदल्यात रायबरेली येथे आपल्या प्रचारासाठी फर्नांडिस यांनी यावे असे सुचविले होते. म्हणे ! परंतु फर्नांडिसनी हे टाळले. हीच गोष्ट मोठी सूचक नाही काय ? □ □

वैतागलेला माणूस कसा चिडीला येतो याची ही एक गोष्ट. फर्नांडिसचीच. उमेदवारीचा अर्ज मागे घेण्याचा शेवटला दिवस होता शनवार. त्यादिवशी मफलर वगैरे गुंडाळून फर्नांडिस ऑफिसात गेले. टेबलावरची वृत्तपत्रे चाळू लागले. मग त्यांनी एका कार्यकर्त्याला पुकारले. त्याचा पत्ता नव्हता. मग दुसऱ्याचा शोध घेतला तोही नव्हता. फोनवरून चौकशी केल्यावर सारेच महत्त्वाचे कार्यकर्ते मिळेनात तेव्हा फर्नांडिस चिडून म्हणाले म्हणे, "असंच जर घडायला लागलं तर मी माझा उमेदवारीचा अर्ज मागे घेईन !" □ □

निवडणुकीत सरकारी प्रचारयंत्रणा राबवू नये म्हणून सांगतात. पण मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या महाराष्ट्र प्रचार दौऱ्यावर एक-दोन ठिकाणी पत्रकारांना सरकारी प्रसिद्धी खात्याच्या जीपने नेण्यात आले होते म्हणे ! एक वरिष्ठ प्रसिद्धी अधिकारीही दिमतीला दिला होता. अर्थात् सरकार मोठे चलाख. मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यानिमित्तानं थोडी दुष्काळी परिस्थितीची चर्चा करण्यासाठी अधिकाऱ्यांची बैठक, तर कोठे आणखी कसली तरी बैठक, अशा नाममात्र बैठका ठरविलेल्या होत्या. म्हणजे उद्या विधानसभेत कोणी निवडणूकीसाठी प्रचारयंत्रणा वापरली असा आरोप केला तर सरकारी बैठकीसाठी पत्रकारांना नेलं होतं असं

सांगून मोकळं व्हायला बरं असा धूर्त विचार सरकारने केला असावा. जय समाजवाद !

□ □


नवकाँग्रेसच्या एका नामवंत उमेदवारानं उर्दू वृत्तपत्रांच्या संपादकांची एक बैठक बोलाविली. या बैठकीत तुम्ही सर्वांनी माझाच प्रचार केला पाहिजे, माझ्याच बाजूनं लिहिलं पाहिजे असं त्यांनी सांगितलं. बहुतेक सर्वांनी त्यांच्या या आदेशावर मान डोलावली. पण एका संपादकाला राहवलं नाही. तो म्हणाला, या देशात मतस्वातंत्र्य आहे. तेव्हा माझाच प्रचार करा अशी सक्ती तुम्हाला आमच्यावर कशी करता येईल ?" त्यावर तो काँग्रेस नेता उर्मटपणे म्हणाला, " ठीक आहे. तुम्ही तुमचं मतस्वातंत्र्य अंमलात आणा, पण तुम्हाला सर्व सरकारी जाहिराती देणं व त्या थांबवणं हे माझ्या पक्षाच्या हातात आहे हे विसरू नका !" या उघड उघड दमबाजीपुढं तो बिचारा संपादक काय म्हणाला हे मात्र समजू शकलं नाही. मूलभूत हक्क रक्षणाचा विजय असो !

□ □

लक्षात आलेल्या तीन फुटकळ गोष्टी—मुंबईतले अर्ध्याहून अधिक नवकाँग्रेसवाले इंदिरा गांधी असे सुस्पष्ट न म्हणता इंदिरा, किंवा इंद्रा गांधी म्हणतात. शि-व-से-ना असं क्वचितच म्हटलं जातं. सारे जण 'शिवशेणा' म्हणतात. (काहींनी शीव स्टेशनच्या नामफलकावर 'शीव' अक्षरापुढं 'सेना' शब्दांची फौज उभारली आहे.) बाळ ठाकरे यांचा उजवा हात असलेल्या आणि त्यांच्या भरसभेत त्यांना लोटांगण घालणाऱ्या एका नेत्यास लोटांगण महाराज म्हणतात म्हणे ! असो. जय शिवशेणा !

□ □

यंदाच्या निवडणुकीचं मुंबईतलं वैशिष्ट्य म्हणजे जागोजाग लिहिण्यात आलेले उदंड उखाणे. ही जर उखाणेवाली 'शिवसेनेची' मंडळी लोकसभेत निवडून गेली तर जगाच्या इतिहासात प्रथमच लोकसभेचा वृत्तांत पद्यात लिहिला जाईल. 'ट' ला 'ट' आणि 'ढ' ला 'ढ' जुळविण्यातच शिवसेनेचे सारे राजकारण खर्ची पडले आहे. 'राणीच्या बागेत नाचतोय गेंडा, शिवसेनेचा दिल्लीवर झेंडा', 'एक गाव बारा भानगडी, शिवसेनेची दिल्लीवर उडी' असल्या निरर्थक घोषणा आहेत.



# भूकंप, पूर आणि निवडणूक

## रमेश मंत्री

भूकंप, पूर आणि निवडणूक या तिन्हीच्या आगमन प्रसंगी कसे वागायचे हे मी सर्व साधारणपणे ठरवलेले असते. या तिन्ही वेळी भिऊन वागावे हे सर्वसामान्य जनतेप्रमाणेच माझेहि तत्त्व असते. भूकंप झाल्यावर उगीच भलते साहस करण्यापेक्षा हाती लागेल ती चीजवस्तू घेऊन—अर्थात स्वतःच्या मालकीची—धावत सुटणे हे शहाणपणाचे असते. पूर आल्यावर पाणी जिकडून येते त्याच्याविरुद्ध दिशेला जीव मुठीत धरून जो पळत सुटतो तो बचावतो. त्याप्रमाणेच निवडणुकीत मिरवणुका, पक्ष प्रचारांच्या सभा, दंगली वगैरे ज्या बाजूला असतात, त्याच्याविरुद्ध बाजूला मी छत्री आणि कचेरीत जाण्याची बॅग घेऊन पळतो.

मात्र भूकंप आणि पूर यांच्यापासून बचावणे जेवढे सोपे असते तेवढे निवडणुकीच्या प्रचारसभेपासून बचावणे सोपे नसते असे मला आढळून आले. कारण एका उमेदवाराच्या आक्रमक प्रचारापासून पळत सुटावे तो दुसऱ्या बाजूने दुसरा उमेदवार पत्रके उधळीत येतो. ती बाजू टाळून तिसऱ्या बाजूला धावावे तर आणखी एक उमेदवार किंवा त्याचे कार्यकर्ते ' दीन दीन ' म्हणत तुटून पडतात. चौथ्या बाजूला वळावे तर तिकडून आणखी एका उमेदवाराच्या प्रचाराचा लोंढा येतो आणि आमच्यासारख्या सामान्यांना दीन आणि लीन करून सोडतो. आटयापाटयांच्या खेळाप्रमाणे. मी एका रात्री घरी परत येत असताना एक प्रचार-सभा चुकवून एका गल्ली बोळातून निघालो, तो तिथेही एक सभा चाललेली दिसली. माझ्या मागून प्रचंड गर्दी येत होती, त्यामुळे मला मागेही जाता येईना.

' कुणाची सभा असावी, हे मी टाचा उंच करून पाहू लागलो, तो हिरेजडित मुकुट घातलेला, अंगावर दागिन्यांची रेलचेल असलेला एक तेजःपुंज माणूस ध्वनिवर्धकाजवळ उभा राहून बोलत होता. मी जरा पुढे सरकणार, तोच एक कार्यकर्त्याने माझ्या खमीसाला खेचून विचारले, ' साहेब, आपण या सभेला आला

आहात काय ?'

मला नकारार्थी उत्तर देणे अशक्यच होते म्हणून मी ' हां, हुं ' असे काही गुळमुळीत बोलू लागलो. तेव्हा तो कार्यकर्ता दबलेल्या आवाजात म्हणाला, ' साहेब या भाषणाचा दर आहे प्रौढांना दहा रुपये, बारा वर्षाखालील मुलांना पाच रुपये. '

हे एकून मी थक्कच झालो. मी त्याला सांगितले, ' अरे बाबा, नाटकालासुद्धा आम्ही पाच रुपयांचे तिकीट काढीत नाही आणि या प्रचारसभेला दहा रुपये ? छे ! मी परत जातो कसा. '

' छे: छे: आपला काहीतरी गैरसमज होतो आहे साहेब. या सभेला हजर राहणाऱ्या प्रत्येकाला आम्ही दहा रुपये देतो. ' त्या कार्यकर्त्याने नम्रपणे सांगितले.

त्या प्रचंड गर्दीचे कारण आता माझ्या लक्षात आले. पण ' निवडणुकीत लाच घेऊ नका ' हा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचा आदेश आठवून आणि विशेषत: जवळच पोलिस अधिकारी उभा असल्याचे पाहून मी स्वाभिमानाने त्या दहा रुपयांच्या लाचेला नकार दिला आणि गर्दीत घुसलो. ' कुणाची ही सभा ?' मी शेजाऱ्याला विचारले. माझ्या अज्ञानाची कीव करीत तो म्हणाला, ' वा: राव ! हेसुद्धा माहीत नाही वाटतं ? दहाची नोट कनवटीला लावताना निदान एवढी तरी चौकशी करीत जा. अहो ही प्रत्यक्ष कुबेर महाराजांची निवडणूक सभा आहे.'

मी चकीतच झालो. सर्व देवांचा भांडारी आणि तिन्ही लोकातला सर्वात श्रीमंत असा हा कुबेर. त्याने या पृथ्वीतलावर येऊन निवडणूक लढवावी ? त्याचे म्हणणे तरी काय आहे ते समजावे म्हणून मी लक्ष देऊन ऐकू लागलो. कुबेरदेव सांगत होते, ' तुमची गरीबी नाहीशी करण्यासाठी मी उभा आहे. पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसाला मी एक प्रासाद, तीन रथ, सहा सारथी आणि तिन्ही त्रिकाळ पिण्यासाठी भरपूर अमृत देईन. समाजवाद आणणे आणि बेकारी नाहीशी करणे ही माझी दुसरी दोन उद्दिष्टे आहेत. मी निवडून आलो तर एकही बेकार इसम दिसणार नाही, असं मी आश्वासन देतो. '

त्याचं भाषण तडफदार होतं. ते तावातावाने सांगत होते, ' माझे प्रतिस्पर्धी उमेदवार नरकासुर हे पैशांच्या जोरावर निवडणूक लढवीत आहेत. दानवांनी पुरवलेल्या काळ्या पैशाचा पूर त्यांच्याकडे वहात आहे. पण माझा लढा गरीब माणसांचा आहे. तुम्ही सामान्यमाणसाबरोबर रहाणार की भांडवलवाल्या नरकासुराबरोबर रहाणार हे तुम्ही ठरवायचं आहे. '

मध्येच एक बैरागी उभा राहून म्हणाला, ' मला एक प्रश्न विचारायचा आहे. '

कुबेरांनी परवानगी दिल्यावर त्या बैराग्याने विचारले, ' तुमच्या राज्यात वीस वर्ष राहूनही मी अजून भिकारी आहे. माझ्या नशिबातली ही झोळी कधी चुकणार आहे ?'

कुबेरांनी उत्तर दिले, ' महाराज, आपण तर विरक्त आहात. मी तुम्हाला सबंध राज्य जरी दिलं, तरी ते आपण मला परत करून पुन: ऱ्हाती झोळी घ्याल. मग तेच जर तुमचं ध्येय आहे, तर ते तुम्ही आताच साध्य केलं आहे !'

त्यांचे हे उद्गार ऐकून त्या बिनतोड युक्तिवादाबद्दल मी आणि तो बैरागी सोडून सर्वांनी टाळ्या वाजवून कौतुक केले. सभेला हजर राहण्याचे दहा रुपये मी घेतले नव्हते. तेव्हा टाळ्या वाजवण्याचे मला काहीच कारण नव्हते. मी त्या सभेतून हळूच निसटलो आणि लगेच दुसऱ्या सभेच्या सापळ्यात अडकलो. हे उमेदवार म्हणजे अ. ग. घायकुते हे होते. त्यांचे खरे नाव जरी अनंत गणेश घायकुते असे असले, तरी त्यांनी नुकताच एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केला असल्याने त्यांना अयाराम गयाराम घायकुते असे लोक म्हणत असत, ज्या पक्षात ते गेली दहा बारा वर्षे होते, त्या पक्षाने त्यांना यावेळी लोकसभेचे तिकीट दिले नाही व म्हणून ' तात्त्विक मतभेदा 'च्या नावाखाली ते दुसऱ्या पक्षाला मिळाले होते. आपल्याला तिकीट मिळणे हे तत्त्व आणि ते तत्त्व जो पक्ष पाळणार नाही तो पक्ष तत्त्वशून्य अशी त्यांची धारणा होती. व्यासपीठावर त्यांच्या नव्या पक्षाची चिन्हे सजवून लावलेली होती. अयाराम गयाराम भाषण करीत होते, ' मी एका पक्षाचा राजिनामा दिला. कारण त्या पक्षाची धोरणे मला मान्य नाहीत. त्या पक्षाचा समाजवादावर विश्वास नाही. गेली पाच वर्षे मी लोकसभेत राहून रात्रंदिवस गरीबी हटवण्याचे काम करीत होतो. बँकांचे राष्ट्रियीकरण माझ्यामुळेच झाले. पण पुढे पुढे निवडणुकी जवळ आल्या, तेव्हा मला तिकीट मिळू नये असे कट शिजत असल्याचे माझ्या कानी आले. मी असा जाहीर सवाल विचारतो. की देशातील बेकारी नष्ट करण्याची जर तुमची योजना आहे, तर मला तिकीट नाकारून तुम्ही मला बेकार का करता ? पक्षातील एकाही पुढाऱ्याची या सवालाला उत्तर देण्याची छाती झाली नाही. म्हणून तो पक्ष प्रतिगामी आहे, देशहित विरोधी आहे, भांडवलवाल्यांचा पक्ष आहे–'

त्यांचे बोलणे चालू असतानाच एक कार्यकर्ता घाईघाईने त्यांच्याजवळ आला आणि कानात काहीतरी कुजबुजला. त्याबरोबर आयाराम गयाराम यांनी त्याला विचारले, ' पण राज्यसभेत मला पाठवायचं आश्वान नक्की आहे ना ?' कार्यकर्त्याने ' हाय ' म्हणून सांगताच अयाराम गयाराम जाहीर भाषण पुढे चालू करून म्हणाले, ' माफ करा. लोकहो, मी पुन: पूर्वीच्याच पक्षात प्रवेश केला आहे. कारण तोच पक्ष पुरोगामी आहे असा साक्षात्कार मला नुकताच झाला आहे '

हे साक्षात्कारी भाषण ऐकून मी प्रभूच्या अगाध करणीची प्रशंसा करीत निघालो. देवाची करणी आणि नारळात पाणी अशी म्हण आहे. नारळ न फोडता त्यात पाणी भरण्याची किमया देवाला कशी साधते याचा आपण अचंबा करतो. पण अयाराम गयारामसारख्या राजकीय नेत्यांच्या तोंडी परमेश्वर तत्त्व, निष्ठा

प्रगती असे शब्द कसे घालतो याचा मला त्याहून अधिक चमत्कार वाटू लागला.

तिसरी सभाही मला चुकवणे अशक्य झाले. एक बडे पुढारी सांगत होते, 'आपला लढा राजाविरुद्ध प्रजा असा आहे. राजा म्हणजे श्रीमंत. आपण प्रजेच्या म्हणजे गरीबांच्या बाजूनं मतं द्यायची आहेत. या भागातले आमचे उमेदवार. धोंडीराम शाळिग्राम हे अतिशय गरीब आहेत आणि त्यांना विरोध करणारे उमेदवार हे एक बडे भांडवलदार राजे आहेत.'

एका वक्त्याने प्रश्न केला, 'पण पलीकडच्या मतदार संघात तुमचा उमेदवार राजा आहे. तिथे तुम्ही राजा विरुद्ध प्रजा अशी भूमिका का घेत नाही?'

'ते राजे आमच्या पक्षात आल्याबरोबर गरीब झाले आहेत. म्हणून आम्ही त्या मतदारसंघात वेगळा न्याय लागू केला आहे,' पुढाऱ्यानी उत्तर दिले.

ही प्रचार सभा सोडून मी घरच्या रस्त्याला लागलो. वाटेत आणखी एक सभा चालली होती. इतक्या सभा पाहिल्या, मग ही तरी का पाहू नये म्हणून त्याही गर्दीत घुसलो. पण आतापर्यंत पाहिलेल्या सभेहून ही जरा वेगळी दिसत होती. कारण या सभेत भाषण करणारा उमेदवार काही मंत्र वगैरे पुटपुटत होता. त्याच्या समोरे दहाबारा वर्षांचा एक मुलगा उभा होता. उमेदवाराने त्या मुलाच्या हातावर रुपयाचे एक नाणे ठेवले आणि विचारले, 'हे काय आहे?'

'एक रुपया.' मुलाने उत्तर दिले.



'प्रथम मला वाटले की या सभेला हजर राहणाऱ्यांसाठी हा मेहनताना असावा. पण तसे नव्हते. कारण उमेदवाराने सांगितले, 'हा आता तो रुपया मुठीत घट्ट धरून ठेव.' मुलाने रुपयाभोवती बोटे आवळली. मग उमेदवाराने काही मंत्र म्हटले आणि मूठ उघडण्यास सांगितले. काय चमत्कार! तो रुपया नाहीसा झाला होता! सर्व लोकांनी टाळ्या वाजवल्या. मग त्या उमेदवाराने मेस्मेरीझमचे प्रयोग केले. प्रेक्षकांपैकी एका माणसाला बोलावून त्याने त्याच्यावर मोहिनीअस्त्र सोडले आणि विचारले, 'आता तुला काय दिसते?'

डोळे मिटून पडलेल्या त्या माणसाने सांगितले, 'मला गरीबी पूर्णपणे नाहीशी झालेली दिसते. भारतातल्या प्रत्येक माणसाला तीन खोल्यांचा ब्लॉक, दरमहा हजार रुबलांची नोकरी, एक छोटी मोटार, आणि हाताखाली चार नोकर दिसताहेत. सगळीकडे समाजवाद आलेला दिसतो आहे.'

हे ऐकल्यावर पुनः सर्व प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. इतर सर्व राजकीय पुढाऱ्यापेक्षा या उमेदवाराचा प्रचार फारच परिणामकारक झाल्याचे दिसत होते. दुसरे असे, की 'मला मते द्या' किंवा 'माझ्या पक्षाला मते द्या' असे मुळीच सांगितले नव्हते. तरीही लोकांनी त्याला भरपूर पाठिंबा दिला होता हे उघड होते. या प्रसिद्धि पराङ्मुख उमेदवाराला मत द्यायचे मीही ठरवून टाकले. मी जोमाने ओरडलो, 'माझे मत तुम्हालाच!'

माझे हे अनपेक्षित उद्‌गार ऐकून त्या उमेदवारासकट प्रत्येकजण माझ्याकडे पाहू लागला. फार काय, पण मोहिनी अस्त्राने मूर्छित झालेला तो प्रेक्षकही पडल्या-पडल्या डोळे किलकिले करून मला निरखू लागला. माझ्याजवळच्या माणसाने मला बावळट ठरवून हळू आवाजात सांगितले, 'अहो मिस्टर ही निवडणूक सभा नाही, हे जादूचे खेळ चालले आहेत.' ते ऐकून मी किंचित ओशाळलो आणि त्या गर्दीतून काढता पाय घेतला.

त्या सभेला जादूचे खेळ असं नाव ज्याला द्यायचं असेल तो देऊ दे. पण मला तरी त्यात आणि राजकीय प्रचार सभेत काही फरक दिसला नाही. जनतेच्या मुठीतला रुपया नाहीसा करण्याची कला राजकीय नेत्यांइतकी दुसरा कोणीतरी बेमालूमपणे दाखवू शकेल काय? मेस्मेरिझमचे प्रयोग निवडणुकीच्या काळात होतात तसे कोणता जादूगार करू शकेल? लोकांना जे हवे आहे ते त्यांना थोड्याच काळात मिळणार आहे असे मृगजळ राजकीय पुढाऱ्यासारखा दुसरा कोण निर्माण करू शकेल? कोणत्याही जादूगाराला मागे हटवील असे हातचलाखीचे प्रयोग आमचे पुढारी करीत असतात. मी आता कुणाचेही मानणार नाही. मी पाहिलेली ती सभा म्हणजे जादूचे खेळ नसून निवडणूक प्रचार सभाच होती आणि पैसे नाहीसे करणाऱ्या उमेदवारालाच मी मत देणार हेही मी तेव्हाच ठरवून टाकले!

□ □ □




**माणूस प्रतिनिधी शरद कृष्णन यांजकडून**

---

देशाच्या राजकीय नकाशामध्ये मुंबईला स्वतःचे असे महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळे मुंबईतील लोकसभेच्या जागांचे निकाल काय लागतात यासंबंधी देशभर उत्सुकता आढळते. त्यातच आघाडीचे तीन तेरा वाजल्याने आणि लोकसभेच्या निवडणूक प्रांगणामध्ये शिवसेना प्रथमच उतरत असल्याने या उत्सुकतेची तीव्रता वाढली आहे. शिवसेनेने स्वतःचे असे जे दोन उमेदवार उभे केले आहेत, त्यापैकी सेनेचे एक नेते मनोहर जोशी ज्या मध्यमुंबई मतदार संघातून उभे आहेत, त्या मतदारसंघाशीं मी सतत ४–५ दिवस संपर्क ठेऊन होतो, आणि तोही प्रचार आघाडीवर अखेरच्या तोफा डागल्या जात असताना मध्यमुंबई मतदार संघातील प्रा. आर. डी. भंडारे (नव कांग्रेस) व मनोहर जोशी (शिवसेना) या लढतीबाबत लोकांना उत्सुकता आहे ती एकच– शिवसेनेचे काय होईल ? मतदारसंघामध्येही कित्येक मतदारांनीच मला प्रश्न विचारला, काय हो शिवसेना जिंकेल ही निवडणूक ?– दोन्ही बाजूचे सामर्थ्य, प्रचार आघाडी, मतविभागणीचे अंदाज आणि सतत संपर्कामुळे जाणवलेले वातावरण, यामुळे माझे स्वतःचे असे मत झाले, की निवडणूक चुरशीची होईल. आणि सरशी शिवसेनेची होईल. एकंदर वातावरण पाहता कोणाला आवडो न आवडो सेना या मतदारसंघातुन दिल्लीत पोचणार असे दिसते.

या मतदार संघामध्ये प्रामुख्याने श्रमजीवी, मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय मंडळींची वस्ती असून लव्हग्रोव्ह, नायगाव, वरळी, दादर, माटूंगा, माहीम हा भाग या मतदार संघामध्ये येतो. १९६२ पासून नवकांग्रेसचे प्रा. भंडारे या

# शिवसेनेला अनुकूल असलेला मतदारसंघ

## सेनाप्रमुखांची रोज बदलणारी भूमिका

## माहिम-माटुंगा येथील दाक्षिणात्य मते, हे कच्चे दुवे

मतदार संघातून निवडून जात आहेत. १९६७ च्या निवडणुकीमध्ये त्यांनी केवळ ७ हजार मतांनी आचार्य अत्रे यांचा पराभव केला होता. त्यावेळी प्रा. भंडारे यांना सुमारे १ लक्ष ५८ हजार, आचार्य अत्रे यांना सुमारे १ लक्ष ५१ हजार, आणि बी. सी. कांबळे यांना सुमारे ३८ हजार मते पडली होती. अर्थात ६७ सालच्या निवडणुकींच्या संदर्भात या निवडणुकांचा विचार करणे शक्यच नाही. एक-दोन महत्वाचे बदल नमूद करतो. ६७ साली असलेले काँग्रेसचे एकमुखी पाठबळ आज भंडारे यांचे मागे नाही. आणि त्यावेळी अत्र्यांची २०-२२ हजार मते आपल्या 'मार्मिक' प्रचाराने भंडारे यांच्या पदरात टाकणारी शिवसेना एक प्रखर शक्ती होऊन त्यांच्या विरोधामध्ये आज उभी आहे. इतकेच नव्हे तर मुंबईत शक्तीशाली असलेली संघटना काँग्रेस शिवसेनेच्या हातात हात घालून भंडारे यांना अस्मान दाखवू पहात आहे. म्हणजेच एका बाजूला शिवसेना व संघटना काँग्रेस व दुसऱ्या बाजूला सत्ताधारी काँग्रेस, कम्युनिस्ट व मुस्लीम लीग, या आघाड्यांमध्ये ही निवडणूक खेळली जाणार आहे. बी. सी. कांबळे हे या मतदार संघातील तिसरे महत्वाचे उमेदवार. विजय वेदीवर पोचण्याची संधी त्यांना मिळणार नसली, तरी त्यांच्या स्वतःच्या रिपब्लिकन रयत पक्षाची मते आणि संसोपा व जनसंघाने त्यांना दिलेल्या पाठिंब्याचा थोडाबहूत परिणाम लक्षात घेता, 'त्रासदायक उमेदवार म्हणून त्यांना या लढतीमध्ये महत्व आहे. श्री. बी. सी. कांबळे यांच्या खेरीज जो. डी. घोक्षे, वाय. टी. प्रधान व कमला रामस्वामी हे अन्य तीन उमेदवार आहेत. पैकी जी. डी. घोक्षे यांना थोडीफार मते पडतील,



बी. सी. कांबळे
उमेदवारी दुर्लक्षून चालणार नाही.

अन्य मंडळींची अनामत रक्कम सरकार जमा होईल. या मतदारसंघामध्ये भंडारे-जोशी अशीच लढत होणार असून त्याच दृष्टिकोनातून या निवडणुकीकडे पहावे लागेल.

नव कॉंग्रेसचे आर. डी. भंडारे, मूळचे रिपब्लिकन. पण गायकवाड गटाप्रमाणे बाहेर राहून तडजोडी करत बसण्यापेक्षा त्यांनी १९६६ साली सत्ताधारी पक्षामध्ये सामील होणे पसंत केले. आणि आपल्या या निर्णयाचा त्यांनी आपल्या अनुयायांना फायदा झाल्याचे सांगितले. संसदीय कामगिरीचा प्रदीर्घ अनुभव श्री. भंडारे यांच्या मागे आहे. १९५७ मध्ये ते संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तिकीटावर निवडून गेले होते, आणि विधानसभेतील विरोधी पक्षाचे नेते म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. मुंबई महानगरपालिकेमध्येही त्यांनी दहा वर्षे नगरपिता या नात्याने काम केले आहे. ६२ सालापासून ते लोकसभेमध्ये आहे. विसर्जित लोकसभेच्या कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाचे ते उपाध्यक्ष होते. डॉ. आंबेडकर सोसायटीचे ते संस्थापक-अध्यक्ष असून अन्य अनेक शैक्षणिक संस्थांशी त्यांचे जवळचे संबंध आहेत. भारतीय बुद्धमहासभेचे अध्यक्षपद सध्या त्यांच्याकडेच आहे. इंटकला मिळालेल्या भारतीय मजदूर महासभा व मिल मजदूर सभा या दोन्ही कामगार संघटनामध्ये व बनारस हिन्दू विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, या संस्थामध्ये त्यांनी महत्वपूर्ण



आर. डी भंडारे
जमेची बाजू :
शिक्षणक्षेत्रातील भरघोस कामगिरी

कामगिरी बजावली आहे. १९६७ साली युनोमध्ये गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाचे ते सदस्य होते. अन्य शिष्टमंडळाबरोबरही विदेश दौरा करण्याची संधी श्री. भंडारे यांना मिळाली आहे: अशी ही निवडणुकीच्या राजकारणामध्ये मुरलेली आणि विविध आघाड्यांवर काम करणारी शिक्षण तज्ज्ञ व्यक्ती वैयक्तिक प्रभाव, शिव-सेनेतील फूट, नवकाँग्रेसची सुधारलेली प्रतिमा यांचा फायदा घेऊन प्रचाराचा धुमधडाका उडवून व छोटया-मोठया सभांचा भडिमार करून निवडणूक जिंकण्याची मनिषा बाळगून आहे.

शिवसेनेचे उमेदवार प्रा. मनोहर जोशी लोकसभेसाठी प्रथमच उभे रहात आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय कारकिर्दीची सुरुवात, शिवसेनेबरोबर झाली असली तरी शिवसेनेशी त्यांचा संबंध स्थापनेपासून नाही. सेनापतींची एक सभा त्यांनी ऐकली आणि विलक्षण प्रभावित होऊन ते सेनेमध्ये दाखल झाले. आणि बघता बघता सेनेतील श्रेष्ठीमंडळींमध्ये जाऊन बसले. आज सेनाप्रमुखांचे ते उजवे हात समजले जातात. नगरपालिकेमध्ये निवडून गेल्यावर पालिकेतील शिवसेदा-गटाचे नेतेपद त्यांच्याकडे आले. सध्या ते महापालिकेच्या स्टँडीग कमेटीचे चेअरमन आहेत. त्यांचे वय ३४ वर्षाचे असून मतदार संघातील सर्व उमेदवारांमध्ये ते तरुण

आहेत. आपले एम. ए. एल. एल. बी. पर्यंतचे शिक्षण त्यांना ज्या महापालिकेमध्ये आज ते लोकप्रतिनिधी म्हणून बसत आहेत, त्या मुंबई महापालिकेमध्ये नोकरी करत शिक्षण पूर्ण करावे लागले. शैक्षणिक क्षेत्रात श्री. जोशी खाजगीरित्या काम करीत असून तांत्रिक प्रशिक्षण संस्था, मोटार शिक्षण संस्था, व कोचींग क्लासेस, अशा तीन संस्था ते सध्या चालवतात.

आपल्या खाजगी वर्गामधील विद्यार्थ्यांपैकी २८ विद्यार्थ्यांना खोटी सर्टिफिकीटस् देऊन शाळान्त परिक्षेस बसवले. असा जो आरोप केला जातो. त्या संदर्भात मी प्रश्न विचारला असता हा आरोप धादान्त खोटा असून राजकीय अपप्रचाराचा भाग आहे असे त्यांनी सांगितले. तथापि यात काही तथ्य आहे असे कुणाला वाटत असेल तर त्याने खुशाल न्यायालयात जावे, आम्ही आमची बाजू मांडून आमचे निरपराधित्व सिद्ध करू असेही ते म्हणाले.

प्रश्न : लोकसभेची निवडणूक लढवण्यात शिवसेनेचा उद्देश काय ?

उत्तर : राजकीय क्षेत्रामध्ये प्रवेश केल्यावर मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा फायदा घेतलाच पाहिजे या दृष्टीने आम्ही ही निवडणूक लढवतो आहोत. या खेरीज आमचे अन्य तीन उद्देश आहे. मुंबईचे असे अनेक प्रश्न आहेत की ज्यांचे पडसाद लोकसभेमध्ये उटणे आवश्यक आहेत. आम्ही ते काम निश्चितपणे करू. देशाच्या एकूण कर उत्पन्नापैकी १।१० कर मुंबई देते. तथापी त्या प्रमाणात मुंबईवर खर्च मात्र होत नाही. त्याबाबत आवाज उठवून झोपडपट्टी, पाणीपुरवठा याबाबत काही करण्याचा आम्ही प्रयत्न करू आम्ही मतदारांनाही प्रयत्न करू असेच सांगतो. यशाची हामी देत नाही. मुंबईमध्ये केंद्र सरकारच्या मालकीच्या जागेवरील झोपडपट्टया, कोणतीही पर्यायी सोय न करता उखडण्यात येतात. याला आळा घालता येण्या सारखा आहे. निदान पर्यायी जागा देण्याबाबत दडपण आणणे शक्य आहे.


–जागतिक बँकेकडून १ टक्का व्याजाने मिळणारे कर्ज केंद्र सरकार सहा टक्के व्याज घेऊन आम्हाला देते. या संदर्भात काम करता येण्यासारखे आहे.

–सीमा प्रश्नाबाबत पोटतिडीकीने व अभ्यासपूर्व बोलणारी मंडळी आज नाहीत. विशेषत: नाथ पै यांच्या दुर्दैवी निधनानंतर ही आघाडी उघडी पडेल. आम्ही या प्रश्नाबाबत यथाशक्ती काम करू.

लोकसभेमध्ये या ना त्या कारणाने शिवसेना गाजत असते. पण शिवसेनेची बाजू समोर येत नाही. त्यासाठी आम्हाला लोकसभेचे व्यासपीठ मिळविणे आवश्यक आहे.

–कॉंग्रेस-कम्युनिस्ट-लीग यांच्या युतीला पायबंद घालण्यासाठी प्रत्येक राष्ट्रनिष्ठ शक्तीने पुढे येणे आवश्यक आहे. काळाची ही गरज ओळखून सेना लोकसभा निवडणूक लढवत आहे.

प्रश्न : आपला या निवडणूकी संबंधीचा अंदाज ?



प्रा. मनोहर जोशी
सेना प्रमुखांचे उजवे हात

उत्तर : आम्ही ही निवडणूक निश्चितपणे जिंकू.

मुंबईत आघाडीचे राजकारण फिसकटल्यावर ज्या दोन छोटया आघाडया तयार झाल्या त्या मध्ये शिवसेना-संघटना काँग्रेस यांची जवळीक निर्माण झाली. संसोपा-जनसंघ या उरलेल्या दोघांना परिस्थितीने एकत्र आणले.

मध्य मुंबई मतदार संघाच्या संदर्भात शिवसेना-संघटना काँग्रेस यांच्या या दिल जमाईला निवडणूक निकाल शक्यतेच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. कारण सेना-संघटना काँग्रेस यांची युती ही या मतदार संघातली सर्वात मोठी राजकीय शक्ती आहे. शिवाय या निवडणुकीतील यशाशी आपले 'राजकीय भवितव्य' जखडले गेले असल्याने आपल्या सर्व शक्तीनिशी सेना निवडणूक लढवत आहे.

लोकसभेच्या या मतदार संघ कक्षेमधील सहा विधानसभा मतदार संघाचे सध्याचे स्वरूप असे आहे.

डॉ. बिरजे (वरळी– संघटना काँग्रेस)

डॉ. मटकर (प्रभादेवी–संघटना काँग्रेस) शिवसेना संघटना काँग्रेसयुतीचा निषेध म्हणून सध्या पक्ष न सोडता, भंडारे यांचा प्रचार करतात– राजकीय निष्ठांचा अजून एक नमूना)

एफ्. एम्. पिन्टो. (माहीम–नवकाँग्रेस)
डॉ. राम महाडीक (नायगाव–प्र. सो. पा.)
बि. पा. शहा (माटुंगा– नव कॉंग्रेस)
पी. जी. पटेल (लव्हग्रोव्ह–संघटना काँग्रेस)

या सहा मंडळींपैकी पटेल व बिरजे श्री. मनोहर जोशी यांचा प्रचार करत आहेत. तर अगदी आतापर्यंत जोशींसाठी प्रचार करणारे डॉ. मटकर साक्षात्कार झाल्याप्रमाणे नवकाँग्रेसचे बाजूने उभे आहेत. 'भंडारी-जोशी' या दोघांपासून दूर असल्याने या निवडणुकीच्या दृष्टीने राम महाडीक यांना महत्व नाही. उरलेली पिन्टो शहा ही जोडी भंडारे यांच्या प्रचार आघाडीबरोबर आहे.

विधानसभा निवडणुकांनंतर झालेल्या महानगरपालिका पोटनिवडणूकीमध्ये. शिवसेनेने ३० पैकी १५ जागा जिकल्या होत्या. काँग्रेसचे एकूण ८ उमेदवार होते. त्यातील निम्मे संघटना काँग्रेसबरोबर राहीले. प्रसोपाचे चार नगरपिते आहेत. परंतु त्यावेळी झालेल्या शिवसेना-प्रसोपा निवडणूक समझोत्याचा या प्रसोपा वाल्यांना निश्चित लाभ झाला आहे. या खेरीज दोन रिपब्लिकन व एक कम्युनिस्ट नगरपिता आहे. तीस नगरपित्यांपैकी वीस नगरपिते मनोहर जोशी निवडून यावेत म्हणून परिश्रम घेत आहेत. परळ-लालबाग विधानसभा मतदार संघ या क्षेत्रात येत नाही, तथापी तेथे झालेल्या पोटनिवडणूकीत शिवसेनेने नवकाँग्रेससह आठ विरोधी पक्षांच्या आघाडीला लोळवलें आहे. आणि तेही मयत आमदार कृष्णा देसाई यांच्या पत्नीच्या उमेदवारी विरुद्ध आत्ता आत्ता झालेल्या या पोटनिवडणुकीतील विजय हा शिवसेना विजय सोपानाचा सर्वोच्च बिंदु म्हणता येईल. मुंबईच्या मराठी मनावर शिवसेनेने घातलेली जादू आजही टिकून असली तरी अखेर ही पण एक जादू आहे. हे अनेकांनी ओळखले आहे. महाराष्ट्र सरकारच्या कर्मचाऱ्यांचे संपाचे वेळी बाळासाहेबांनी कर्मचाऱ्यांचे विरोधी भूमिका घेऊन, संख्येने फार मोठ्या असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा व त्यांच्या कुटुंबियांचा रोष अकारण ओढवून घेतला आहे. लोकशाहीच्या गप्पा मारणारी शिवसेना सेनापती ठाकरे यांच्या इच्छेवर हलते हे मंडळींच्या लक्षात आले आहे. शिवाय सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यापासून तर बाळासाहेबांनी इतक्या कोलांट्या उड्या मारल्या आहेत की त्यांचे चाहतेही अवाक होऊन पहात राहिले आहेत. परिणामी घपटशाली भिक न घालता फूट सुरू झाली आहे या फुटीचे जे अवास्तव वृत्त येते, ते सोडून दिले तरी ह्या चिरेबंद दगडालाही छेद जाऊ लागला आहे ही वस्तुस्थिती आहे. विलेपार्ले येथून निवडुन आलेले एक नगरपिते श्री. मनोहरपंत जोशी यांनीही ही गोष्ट माझ्याजवळ बोलताना कबूल केली आहे. संघटना काँग्रेसची ताकद काहीशी नकारात्मक आहे. कारण मुंबईमध्ये नवकाँग्रेसची ताकद आजही उभी नाही. आजची मुंबईतील नवकाँग्रेस ही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच आहे. मुंबईतील काँग्रेस कोणती? संघटना का सत्ताधारी? या

प्रश्नाला आजही मुंबई कॉंग्रेस म्हणजे संघटना कॉंग्रेसच असे उत्तर द्यावे लागेल. अर्थात बदलते राजकीय वारे लक्षात घेऊन याही कॉंग्रेसला गळती लागली आहे. शिवसेना आणि संघटना कॉंग्रेस उतरणीच्या वरच्या टोकाला उभ्या असल्या तरी त्यांची संयुक्त शक्ती मध्य मुंबई मतदार संघामध्ये ताकदीच्या दृष्टीने आज ही उजवी ठरते. संघटना कॉंग्रेस आणि शिवसेना यांच्यामधील फाटाफूटीचा नवकॉंग्रेस मोठ्या धोरणाने लाभ उठवते. युतीला-प्रतिगामी ठरवण्यात आणि स्वतःला पुरोगामी ठरवण्यात नवकॉंग्रेस काही प्रमाणात यशस्वी झाली आहे. त्याचा लाभ निश्चितपणे मिळेल. शिवाय सेनापतींच्या बदलत्या राजकीय धोरणांचे आणि भरीअप्पा यांच्या उमेदवारीचेही भांडवल नवकॉंग्रेसने केले आहे.

## जनसंघाची मते

या मतदार संघाबाबत विचार करताना जनसंघाचे काय असा एक प्रश्न पुढे आला. आणि संघ शिवसेना विरोधात उभा असल्याने त्याचा कितपत परिणाम होईल. अशी विचारणा अनेक मतदारांकडूनही झाली. मतदारांच्या विशिष्ठ गटांवर या दोन्ही पक्षांचा प्रभाव आहे. या मतदारसंघामध्ये जनसंघाचा स्वतःचा उमेदवार नाही. त्यामुळे पक्षाने आपल्या मतदारांनी बी. सी. कांबळे यांना मते द्यावीत असा आदेश दिला असला, तरी पक्षाचा स्वतःचा उमेदवार नसल्याने व या पक्षाच्या मतदाराला जोशींबद्दल वाटणारी आपुलकी, आणि कांबळे निवडून न येण्याची शक्यता, या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यावर येथील जनसंघाची बहुसंख्य मते पक्ष आदेशाप्रमाणे कांबळे यांच्याकडे न जाता, मनोहर जोशींकडे जातील, असे वाटते.

सुमारे ५॥ लाख मतदार असलेल्या या मतदार संघामध्ये सुमारे ३॥ लाख मतदार मराठी आहेत. मराठी माणसासाठी म्हणून उभ्या राहिलेल्या शिवसेनेला या गोष्टीचा फायदा मिळेल. या ३॥ लाखांपैकी ८० हजार मते नवबौद्धांची आहेत. कामगारांची संख्या जवळजवळ १॥ लाखपर्यंत जाते. या मतांमध्ये फूट पडेल. नवबौद्ध, आणि दलित समाजाची मते मनोहर जोशींच्या वाट्याला येणार नाहीत. पण ती सर्व भंडारे यांच्या पदरातही पडणार नाहीत. त्याचा लाभ शिवसेनेला मिळेल.

निवडणुकीमध्ये शिवसेना असल्याने अमराठी मतांना विशष महत्त्व आहे. एकूण अमराठी मते सुमारे २ लाख आहेत. या मतांवर नवकॉंग्रेसची मुख्य भिस्त आहे. या मतांची सर्वसाधारण प्रमाण खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| दक्षिण भारतीय (तामीळ, तेलगू, कन्नडा, मल्याळम मिळून.) | ४५ हजार |
| मुसलमान | ३० हजार |
| ख्रिश्चन | २५ हजार |
| पार्शी | १० हजार |
| गुजराथी | ७५ हजार |
| अन्य प्रांतीय | २५ हजार |

वरील मतदारांपैकी दक्षिण भारतीय, आणि मुसलमान मतदार, फार मोठ्या-प्रमाणावर नवकाँग्रेसला मतदान करतील, पार्शी आणि ख्रिश्चन मतांमध्ये फाटाफूट होईल. संघटना काँग्रेसने शिवसेनेला दिलेल्या पाठिंब्यामुळे गुजराथी मतदारांपैकी अनेक मतदार शिवसेनेला मतदान करतील. तथापी या अमराठी मतदारांच्या प्रत्यक्ष होणाऱ्या मतदानापैकी सुमारे ६५ ते ७० टक्के मते नवकाँग्रेसच्या पेटीत जातील.

### प्रचार आघाडी

शिवसेनेचे मनोहर जोशी आणि नवकाँग्रेसचे भंडारे, या दोघांचीही प्रचार आघाडी मजबूत आहे. इतरत्र सहसा न आढळणारे झेंड्यांचे युद्ध मुंबईमध्ये पहायास मिळते. आणि जनमानसाचा काहीसा कानोसाही लागतो. शिवसेनेच्या प्रचार आघाडीची जबाबदारी दत्ता नलावडे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. बागवे, सुधाकर नागवेकर, प्रभाकर भुमकर, रमेश मोरे, अशोक प्रधान, मनोहर गोसावी, हे प्रचार आघाडीचे जे विभाग पाडण्यात आले आहेत त्यांचे प्रमुख आहेत. सभा व्यवस्थापन मनोहर जाधव संभाळीत असून प्रचार यंत्रणेची सूत्रे किशोर पाळेकर यांच्याकडे आहेत. शिवसेनेला यश मिळावे म्हणून असंख्य कार्यकर्ते अहोरात्र खपत



आहेत. मनोहर जोशी शिक्षण क्षेत्रातील असल्याने त्यांचे अनेक विद्यार्थी प्रचार आघाडीवर आहेत. सायकल स्वारांची मिरवणूक, महिलांची मिरवणूक आदि बाबीमुळे काहीसे नाविन्य त्यांनी आणले आहे. झेंडयाच्या युद्धामध्येही सेना आघाडीवर आहे. सिनेमा, नाटकांच्या नावाचा उपयोग ही क्लूप्ती आता जुनी झाली आहे. तरी सेनेने भिंतीच्या भिंती या पद्धतीने रंगवल्या आहेत. एखादे खोचक व्यंगचित्र, किंवा आकर्षक राजकीय पदावली लक्ष वेधून घेते आणि पाहिजे तो परिणाम ही साधते. जसे इकडे कम्युनिस्ट तिकडे लिग इंदिरेच्या पापाची भरली शिग ! इत्यादि. दररोज चालू असलेल्या सभामधून सेनापती आपल्या सतत बदल-णाऱ्या भूमिकेचे समर्थन करतात. आणि अन्य मंडळी मम म्हणून साथ देतात.

शिवसेनेचे प्रचार तंत्र लक्षात घेऊन त्याला सुयोग्य पद्धतीने तोंड देऊ शकेल, अशी यंत्रणा, नवकाँग्रेसने उभी केली आहे. भिंती रंगवण्यात, झेंडे लावण्यात आपण कमी नाही हे तर तिने दाखवून दिलेच आहे. प्रचार सभांचाही अक्षरशः धुमधडाका चालवला आहे. सुमारे ४०० लहान मोठ्या सभा आतापर्यंत झाल्या असून आकडा ५०० च्या पुढे सहज जाईल, असे नवकाँग्रेसचे प्रचार प्रमुख श्रीराम लेले माझ्या-जवळ म्हणाले.

नवकाँग्रेसची प्रचार यंत्रणाही मजबूत असून अनेक निष्ठावंत कार्यकर्ते आणि इंदिराजींच्या कार्यक्रमाची मोहिनी पडल्याने आपण होऊन आलेले अनेक तरुण प्रचार आघाडी संभाळत आहेत. प्रमुख कार्यकर्त्यांचे कार्यक्षेत्र विभागवार ठरवण्यात आले आहे. माहीम भागात एफ्. एम्. पिन्टो, अमीन खनवाती, शाम शेट्टी; दादर भागात डॉ. वा. श. मटकर, श्री. म. दीक्षित, अनंत मांडेकर; वरळीमध्ये शरद कोरगावकर, के. एल्. कांबळे, उमाशंकर मिश्रा; लव्हग्रोव्हमध्ये उत्तम भागवत, शामराव पेडणेकर, नायगावमधून बॅरीस्टर माने, दाजीराम तांबे, विलास सावंत; माटुंगा विभागातून आमदार पा. सु. शहा, कमला रामन, गंगाराम जोशी आदि कार्यकर्ते निवडणूक प्रचार यंत्रणा प्रमुख श्री. श्रीराम लेले यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराचा धुमधडाका उडवून देत आहेत. आपण निवडणूक जिंकणारच, अशा आत्मविश्वासाने ज्याप्रमाणे शिवसेना उभी आहे त्याचप्रमाणे आणि तितक्याच आत्मविश्वासाने नवकाँग्रेसही उभी आहे.

## जनमत चाचपणी

मतदार संघामधून हिंडत असताना मी सुमारे ६०-७० विविध स्थरातील अपरिचित मतदारांना—मते कुणाला ? आणि का ? असे दोन प्रश्न विचारले. अनेक मनोरंजक उत्तरे ऐकावयास मिळाली. विशेषतः माटुंगा विभागातील दाक्षि-णात्य मतदारांनी उत्तर देण्याचे टाळले. मतदान गुप्त असते हे त्यांचे उत्तर. पक्षीय अनुयायी नसलेला असा जो मोठा समाज आहे तो सध्या मजेने प्रचाराची गंमत लुटतो आहे. या मतदारांपैकी मी ज्यांच्याशी बोललो त्यापैकी अनेकांनी शिवसेनेलाच

मत देणार असे सांगितले. नवकाँग्रेसला मत देणार म्हणणाऱ्यांपैकी बहुतेक बाईंच्या धोरणावर आणि धडाडीवर खूष दिसले. म्हणजें त्यांचे मत आहे ते बाईंना उमेदवाराला अथवा स्थानिक काँग्रेसला नव्हे.

विधानसभेचे चे मतदार संघ आहेत, त्यामध्ये सर्वात जास्त मतदार वरळी भागामध्ये आहेत. येथील ९७,१०७ मतांपैकी बरीच मते निवडून येण्याची शक्यता नसलेले. कांबळे खातील. भंडारे–जोशी या जोडीमध्ये भंडारे यांची थोडी सरशी राहील. दादर विभागातील मतदारांची संख्या आहे–९३,८४२; दादर म्हणजे शिवसेना. या विभागात सेनेला मोठी आघाडी अपेक्षित आहे. दादरखेरीज नायगाव, लव्हग्रोव्हमध्ये शिवसेनेस अधिक्य मिळावे असे वाटते. ८५,७०८ मते असलेल्या माहीम भागातील मुस्लिम व ख्रिश्चन मते सेनेच्या वाटयास येण्याची शक्यता कमीच. उरलेल्या मतांमध्ये ही चांगलीच झोंबाझोंबी होईल. माटूंगा म्हणजे मुंबई-तील मद्रास. या विभागात ८५,९८७ मतदार आहेत. शिवसेनेच्या जोशींना गोत्यात आणण्याची ताकद या समाजात आहे. माहीम, माटुंगा, हे आपले कच्चे दुवे आहेत हे ओळखून शिवसेना या विभागात काम करते. माटुंग्यातील या मतदारांसाठी सेनेने तमीळ, तेलगू, आदि भाषांमध्ये प्रचार पत्रके काढली आहेत. आपल्या प्रचार सभातून सेनेचे नेते आपल्या ' विशाळ ' भूमिकेचे आणि राष्ट्रीय धोरणाचे गोडवे गात आहेत. करीअप्पांच्या उमेदवारीचे शिवसेना जे समर्थन करत आहे, त्याचा अवर्जून उल्लेख केला जात आहे. पण या सर्वांच्या परिणाम दक्षिणात्य मतावर फारसा होईलसे वाटत नाही. भंडारे या निवडणुकीमध्ये यशस्वी झालेच तर त्यांच्या यशात या मंडळींचा वाटा मोठा असेल.

प्रचार आघाडी जोरात आहे. सामान्य माणसापासून कित्येक मैल दूर असलेली ३५ हजार रुपयांची खर्च मर्यादा, केव्हाच वाऱ्यावर गेली आहे. अर्थात खर्चाच्या या नाजुक बाबतीत कोणीच मोकळेपणे बोलत नाही. एखादा बोललाच, तर off the record अशी पुस्ती जोडण्यास विसरत नाही–

मुंबईच्या सर्वच जागांच्या निवडणुका चुरशीच्या होत आहेत. मध्य मुंबई त्याला अपवाद नाही. महाराष्ट्र शासनाने निवडणूका अगदी तोंडाशी आल्यावर आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ११ ते २२॥ रुपये पर्यंत वाढ केली आहे. इतर ठिकाणाप्रमाणेच मुंबईतही या निर्णयाचा थोडा फार परिणाम होणार आहे. मध्य-मुंबई पुरते बोलायचे तर आज तरी परिस्थिती शिवसेनेला अधिक अनकूल आहे. कल्पना नसताना ६७ सालच्या निवडणुकीमध्ये स. का. पाटलांसारख्यांना ' धोबी पछाड ' मारणारे हे मुंबईकर या वेळी कोणता चमत्कार दाखवतात ते आता पहायचे–आहे घोडे मैदान जवळच आहे.

□ □ □

# फाऊंटनजवळ एक तास

— श्याम जोशी




काय म्हणता साखर आदा देणार? मग मी एकाचे ऐवजी दोन मतं तुम्हाला देणार!. पण तेवढं साखरेचं पहा बरं!!


ये लोकालीटी मंधे मलाच्च सांदे मत मिळेल. कारण मी मराठीच्या लै भगत आहे!!


या देशाचं काय होणार ?
माझ्या एकट्याच्या मतानं
काय मोठं भलं होणार आहे ?


मम्मी तू तुझं
मत मलाच दे !
आम्हा मुलांना या पेक्षा
चांगला राज्यकारभार
करता येईल !!

■ ■

रविबालाची मोटार स्टुडिओच्या आवारात शिरली व सेटवर असलेल्या दिग्दर्शक पी. माधवच्या कानात जाऊन असिस्टंट डायरेक्टर गोपाळने सांगितले, "बया आली आहे."

बया आली आहे, एवढे ऐकल्यावर पी. माधव दोन फूट आनंदानं उडाले अन् तेवढ्याच घाईत कॅमेरामन नारायणदत्तला म्हणाले, "अरे, लौकर लायटिंग करून घे. हिरोवरचा एक शॉट संपवून घेतो तेवढ्यात बाई येतील. बाई आल्यावर त्या दोघांचा एक लाँग शॉट आहे तो घेऊया; म्हणजे लंचच्या आधी एक-दोन बाईंचे क्लोजअप्ससुद्धा घेता येतील." नारायणदत्तने पी. माधवकडे न बघता मान हलविली व तो कॅमेऱ्याचा अँगल लावू लागला. पी. माधवनी हातातील स्क्रिप्ट एकवार चाळले व ते लगबगीने मेकअप्रूमकडे वळले.

मेकअपरूमच्या दारातच रविबालाचे जोरजोरात बोलणे पी. माधवच्या कानांवर आले, म्हणून ते थबकले व ऐकू लागले.

रविबाला म्हणत होती, "हे बघ, आज मेकअप्चा डबल कोटिंग दे. कालचा मेकअप् फारच डल होता. शुटिंग संपवून घरी गेले तेव्हा आई म्हणाली, की हा ग कसला मेकअप्. कुणीतरी नवीन दिसतोय मेकअप्मन!"

---

# नटी

**अभय नाडकर्णी**

---

शंकर फिदकन हसला व म्हणाला, "मला काय! पण डायरेक्टरसाहेबांनी सांगितलंय्."

"त्याला काय कळतंय डोंबल? तरी मी रतनशेठला सांगितलं होतं, माझ्या पिक्चरला हा खडूस डायरेक्टर नको म्हणून! पण माझं ऐकतं कोण?" स्वतःशीच पुटपुटत रविबाला उद्गारली, "आमचा भाव ती नटवी चित्रा आल्यापासून कमी झालाय् ना!"

तिच्या चेहऱ्यावरच्या आठीकडे पाहत शंकर हळूच म्हणाला, "बाईसाहेब, तुम्ही मेकअप्शिवायही सुंदर दिसता." एवढे बोलून त्याने हळूच मान फिरवली. त्याचे लक्ष दाराकडे गेले व तो मोठ्याने म्हणाला, "बाई, डायरेक्टरसाहेब येत आहेत."



खरं म्हणजे रविबाला काय म्हणाली हे पी. माधवनं ऐकले होते. पण चेहऱ्यावर तसला कुठलाच भाव न दर्शविता ते आत आले व कोचावर बसत म्हणाले, "आज फारच उशीर केला बाईसाहेब!"

रविबालाच्या कपाळावर पसरलेल्या आठीत हळूच आणखी एका आठीची भर पडली. जरा रागातच ती म्हणाली, "हो, झाला खरा उशीर! पण करणार काय? रात्री शूटिंग १०॥ वाजता आटोपले अन् झोपायला दोन वाजले मला."

पी. माधवना वाटले, पटकन् तिला विचारावे की, इतक्या वेळ काय करीत होतीस. पण त्यांनी काही सांगण्यापूर्वीच रविबाला उद्गारली, "रात्री रतनशेठ घरी आले होते माझ्या. पुढच्या चित्रपटासाठी करार करणार आहेत माझ्याशी!"

पी. माधवनी थंडपणे खिशातून सिगारेटचे पाकीट काढले. सिगारेट शिलगावता शिलगावता ते म्हणाले, " बाई, एक काम होतं तुमच्याकडं."

" माझ्याकडं ? कसलं ?"

" काम जरा नाजूक आहे. तुम्ही मनावर घेतलंत तर होण्यासारखं आहे."

शंकरने एवढयात मेकअप्‌चा हात मारावयास सुरुवात केली होती. त्याच्याकडे पाहत रविबाला उद्‌गारली, "अरे, हळू, माझा गाल म्हणजे काय वाटला तुला?"

शंकर एकवार ओशाळल्यासारखा हसला व हळूच कलत्या नजरेने त्याने पी. माधवकडे पाहून घेतले. पी. माधव आपल्याच तंद्रीत सिगारेट ओढीत होते. विषयाला कशी सुरुवात करावी याचा विचार करीत संथपणाने त्यांनी एक झुरका घेतला व ते शंकरला म्हणाले, " शंकर, आज मेकअप् डबल कोटिंग दे. आजचा सीन वेगळा आहे." तेवढयाच तत्परतेनं ते उठून उभे राहत मेकअप् टेबलाच्या जवळ गेले व रविबालाला त्यांनी विचारले, "माझ्याबद्दल काय म्हणत होते रतनशेठ ?"

" तुमच्याबद्दल ?" आश्चर्याने रविबाला म्हणाली, " तेवढा वेळच नव्हता त्यांच्याकडे. फक्त दोनच तास ते माझ्याबरोबर होते आणि तेसुद्धा नवीन चित्रपटाबद्दल बोलत होते."

पी. माधव विषण्ण मनःस्थितीत मेकअप्‌रूमच्या बाहेर पडता पडता म्हणाले, " आणखी अर्ध्या तासानी तुम्ही सेटवर या."

सेटवर आले तरी पी. माधव तंद्रीतच होते. त्यांच्या मनाला कुठेतरी बोचणी लागली होती. हा चित्रपट जवळजवळ पुरा होत आला होता अन् अजून दुसऱ्या कुठल्याच निर्मात्याने त्यांच्याशी करार केला नव्हता. पी. माधवना क्षणभर वाटले की हाच आपला शेवटचा चित्रपट. किती उमेदीने ते या क्षेत्राकडे वळले होते. त्यांच्याबरोबरच एम्. ए. झालेला त्यांचा एक मित्र आता कुठल्याशा फर्मचा मॅनेजर होता. अन् ते स्वतः या क्षेत्रात येऊन फसले होते. प्रथम त्यांना वाटले होते की, आपल्यासारखा एक पदवीधर चित्रपटक्षेत्रात शिरल्याने अनेक निर्माते आपल्यामागे धावतील. आपण हा हा म्हणता हे क्षेत्र व्यापून टाकू. काहीतरी नाव मिळवू. स्वतःची चित्रसंस्था उघडू. पण स्वप्न ही स्वप्नंच राहतात. मोठ्या उमेदीने चित्रपटक्षेत्रात शिरलेले पी. माधव दहा वर्षांत या क्षेत्राला कंटाळले होते. उंच उडणाऱ्या घारीच्या पंखाला अचानक गोळीने इजा व्हावी व तिचे उडणे संपुष्टात यावे तसे काहीसे पी. माधवचे झाले होते. त्यांनी कल्पनेत उभा केलेला उमेदीचा महाल वास्तव्यात एक पडका वाडा ठरला होता.

त्या दिवशीचे शुटिंग कसेबसे संपले अन् शेवटचा प्रयत्न म्हणून पी. माधव रविबालाच्या मोटारीकडे जाऊन उभे राहिले. रविबाला येऊन मोटारीत बसणार एवढयात तिचे लक्ष जवळच उभ्या असलेल्या पी. माधवकडे गेले.

" काय डायरेक्टरसाहेब ! आज झालं ना शूटिंग समाप्त ! का काही बाकी आहे ?"

" नाही. तुमचं काम संपले. आता फक्त काही किरकोळ शॉटस् बाकी आहेत." एवढे म्हणून पी. माधव उगाचच ओढून ताणून हसले व त्याच स्वरात उद्‌गारले " माझं एक काम कराल का ?"

" कसलं ?" रविबालाने मोटारीचे दार उघडता उघडता विचारले.

" त्या पुढच्या चित्रपटाबद्दल रतनशेठना सांगा ना माझ्यासाठी."

" तुमच्याबद्दल ? अहो, ते लाख म्हणतील, पण मलाच तुम्ही डायरेक्टर नको असाल म्हणजे !"

उगाचच पी. माधव म्हणाले, " माझं डायरेक्शन एवढं का वाईट आहे ?"

पण उत्तर द्यायला रविबाला तेथे होतीच कुठे ? तिने केव्हाच आपली मोटार स्टार्ट केली होती. मोटार सुरू झाल्याने उडणारा धुरळा पी. माधवच्या चेहऱ्यावर पसरला अन् त्यांना वाटले आपण एका मोठ्या वादळात सापडलो आहोत.

चित्रपट पुरा झाला; व पी. माधवनी निःश्वास सोडला. चित्रपटाची एक ट्रायल त्यांनीं आयोजित केली. प्रसिद्ध निर्माते खंडूभाई हे देखील या ट्रायलसाठीं आले होते. सकाळपासून पी. माधव याच कामात गुंतले होते. बरोबर दोन वाजता रतनशेठ खंडूभाईंना घेऊन आले. त्यांच्याबरोबर चित्रादेखील होती. ट्रायलच्या वेळी पी. माधव अस्वस्थपणे चुळबुळत बसले होतें. त्यांचे सारे लक्ष रतनशेठ व खंडूभाई-वर होते. आज जर हा चित्रपट पाहून खंडूभाई खुष झाले तर त्यांचे भाग्य उजळणार होतं. खंडूभाई मधून मधून चांगल्या शॉट्सच्या वेळी 'वा ऽऽ' म्हणून दाद देत होते.

ट्रायल शो पाहून खंडूभाई एकदम खुष झाले व रतनशेठला म्हणाले, " कुठं आहे तुमचा डायरेक्टर ? अरे, हा तर हिरा आहे हिरा !"

रतनशेठने पी. माधवची खंडूभाईबरोबर ओळख करून दिली.

" हे बघ " खंडूभाई रतन शेठला म्हणाले, " आज रात्री तू याला घेऊन माझ्याकडं ये, माझ्याकडं एक चांगली स्टोरी आहे. त्यावर एखादा मस्त रंगीत चित्रपट काढता येईल. तू व मी मिळून तो चित्रपट काढूया. चित्रा नायिका व पी. माधवचे डायरेक्शन ! अरे, गाजवून टाकूया फिल्म इंडस्ट्री, तू आहेस कुठं ?

थोड्याच दिवसांत रतनशेठ व खंडूभाई यांच्या भव्य चित्रपटाचे शुटींग प्रसिद्ध रंगतारा स्टुडिओत धुमधडाक्याने सुरू झाले. आता पी. माधव यशाच्या शिखरावर होते. आता त्यांच्याकडे अनेक निर्माते करार करण्यासाठी धावून येत होते. साऱ्या फिल्म इंडस्ट्रीला जणू काही पी. माधव यांचे वेड लागले होते.

रतनशेठच्या रंगीत चित्रपटाचे शूटिंग संपवून पी. माधव जेव्हा घरी परतले तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. घरी जाऊन कधी एकदा बिछान्यावर अंग टाकतो

असे त्यांना झाले होते. घराची बेल त्यांनी जरा जोरातच वाजवली.

त्यांच्या सौ. ने लगबगीने येऊन दार उघडले व ते पुरते आंत येण्याच्या आतच ती म्हणाली, "अहो, रविबाला येऊन बसल्या आहेत. केव्हापासून आपली वाट पाहत आहेत."

जरा त्रासिक चेहऱ्यानेच पी. माधवनी हॉलमध्ये प्रवेश केला. रविबाला कोचाच्या एका कोपऱ्यात बसली होती. एखादी बाहुली रंग उडाल्यावर जशी दिसते तशी रविबालाची अवस्था दिसत होती.

"वा, अलभ्य लाभ! आज गरिबाच्या घरी कसं येणे केलेत?" पी. माधवने जरा चेष्टेच्या स्वरूपात म्हटले.

रविबाला जरा सावरून बसली व म्हणाली, "एक काम होतं तुमच्याकडे!"

"माझ्याकडं?"

"होय, काल मला अजयनाथ भेटले होते. ते एक नवीन चित्रपट सुरू करणार आहेत. दिग्दर्शक म्हणून ते तुमच्याशी बोलणी करण्यास येणार आहेत."

"मग?"

"तुम्ही जर मला नायिकेच्या भूमिकेसाठी पसंत केलंत तर ते मला ती भूमिका देणार आहेत. प्लीज एवढं कराच तुम्ही माझ्यासाठी!"

पी. माधवच्या नजरेसमोर त्या दिवशीचा प्रसंग उभा राहिला. आता रवि-बालाच्या चेहऱ्यावर दिसणारी लाचारी त्या दिवशी त्यांच्या चेहऱ्यावर अशीच दिसत होती. रविबालाला काय उत्तर द्यावे हे त्यांना समजत नव्हते. त्यांना माहीत होते की आजकाल निर्माते आपल्या चित्रपटासाठी 'मार्केट' नसलेल्या रविबालाला घ्यावयास घाबरतात. तिला घेणे म्हणजे थोडक्यात निर्मात्यांचे मरण!

तरी सुद्धा त्यांनी 'बघुया' असे म्हटले. त्या तेवढयाश्या उत्तराने रविबाला इतकी मोहरली की बघता बघता तिच्या वयात पाच वर्षांचा फरक पडला. अन् उत्साहाने उभी राहत ती म्हणाली, 'थँक्स हं!"

खरे म्हणजे तिला काहीतरी चांगले उत्तर द्यावे असे पी. माधवना वाटत होते पण आपणसुद्धा ह्या परिस्थितीतून गेलो आहोत हे आठवून ते गप्प राहिले.

एके दिवशी विनोद रॉय यांच्या चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. रविबालाचे नाव नायिकेच्या जागी बघून सर्वजण एकदम आश्चर्यचकीत झाले. विनोद रॉय हे स्वतः रविबालाला नायिका बनविण्याच्याविरुद्ध होते. पण सर्व जबाबदारी पी. माधवनी आपल्यावर घेतली.

ते म्हणाले, "अहो, हिच्याकडे पण चांगले अभिनयगुण आहेत. पण चित्रसृष्टीच्या खोटया प्रतिष्ठा व उगाचच सौंदर्याचा बाऊ करताना ह्या गुणी नटीचा अंत झाला आहे. हा चित्रपट तयार होऊदे अन पाहा एका रात्रीत ही रविबाला परत एक आघाडीची नायिका बनेल!"

रविबाला मेकअपरूममध्ये केव्हाची येऊन बसली होती. पी. माधव बरोबर नऊ वाजता स्टुडिओत आले तेव्हा त्यांचा असिस्टंट गोपाळ हळूच येऊन म्हणाला,

" साहेब, रविबाला आली आहे. "

" बरं " असे म्हणून पी. माधव मेकअपरूमकडे वळले. शंकर मेकअपची तयारी करीत होता. त्याच्याकडे पाहून पी. माधव म्हणाले, " अरे, माईल्ड कोटिंग दे. बाई, तुम्ही हलकी साडी नेसा. हा रोल एका गरीब मुलीचा आहे व याच फाटक्या कपड्यात तुम्हांला संपूर्ण चित्रपटात काम करावं लागेल.

एवढे बोलून पी. माधव बाहेर पडले. रविबाला हळूच हसत शंकरला म्हणाली, " पाहिलंस किती चांगले आहेत पी. माधवराव ! मला ते एक अभिनयकुशल नटी बनवू पाहत आहेत. पण लक्षात ठेव, ह्याच माधवला माझ्या पायाशी मी पुन्हा उभा करीन. "

शंकरने जरा रागातच रविबालाकडे पाहिले अन् म्हटले, " बाई, सर्वांनी नेहमी आपली पायरी ओळखून असावं. तुमच्याकडं एकही चित्राचा करार नसताना व फिल्म इंडस्ट्रीनं तुम्हाला बाहेर टाकलं असताना फक्त पी. माधव हे एकटेच उभे राहिले व तुम्ही त्यांच्याबद्दल वाटेल ते मनात आणता ? तुम्ही एवढ्या कोत्या मनाच्या असाल अशी माझी कल्पना नव्हती. "

पण त्याच्या बोलण्याकडे रविबालाचे लक्ष नव्हते. ती आरशात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाकडे पाहून स्वतःशीच म्हणाली, " माझ्या रूपाचं पण तुला आता वेड नाही ना शंकर ? त्या वेळेस तू माझी काय तारीफ करावयाचा. "

" त्यावेळी तुम्ही गाजलेल्या अभिनेत्री होत्या बाईसाहेब. तुम्ही हे विसरू नका ही फिल्मइंडस्ट्री आहे. इथं नमस्कार फक्त प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या व्यक्तीलाच करावयाचा असतो. देवळातल्या कळसाकडे पाहून हात जोडणारे येथे खूप भेटतील पण आतल्या मूर्तीला हात जोडणारे अगदी कमी ! आमची स्थिती तशीच आहे बघा. काल ज्याच्याकडे आम्ही पाहतसुद्धा नसतो त्याला आज नमस्कार करावा लागतो, त्याची तारीफ करावी लागते आणि ज्याला काल आम्ही नमस्कार करीत होतो तो आज आमच्या पायाशी असतो. आज पंचवीस वर्षे मी या लायनीत आहे. तुमच्यासारख्या अनेक नट्या माझ्या हाताखालून मेकअप करून गेल्या. कुठे गेल्या हे कुणालाच कळलं नाही. एक-दोन, फार तर पंधरा चित्रपट अन् पुढे शून्य ! तुम्ही तरी निदान बाहेर जाता जाता वाचलात आणि तेसुद्धा पी. माधवमुळं !"

रविबालाने दचकून समोरच्या आरशात पाहिले. आरशातले स्वतःचे प्रतिबिंब तिला भयानक वाटू लागले. बघता बघता तो आरसा अंधाराने भरला व रविबालाला वाटले ही काळोखी आपणाला पूर्ण गिळणार; अन् ती जोरात किंचाळली. मेकअप-रूमच्या बाहेर उभ्या असलेल्या पी. माधवच्या कानात तो किंचाळी पोहोचली.

पी. माधव वेड्यासारखे धावत मेकअपरूममध्ये शिरले. रविबाला जोरजोरात किंचाळत होती व आरशावर हात मारीत होती आणि जवळच उभा असलेला शंकर थंडपणे रविबालाच्या आत कुठेतरी लपलेल्या त्या नटीला पाहत उभा होता.

□ □ □




**विजय वैद्य**

# गणाचार्य X प्रधान सामना

## भायखळा, लालबाग-परळ ज्याला हात देतील त्याचे पारडे जड राहणार....

---

मुंबापुरीच्या औद्योगिक परिसरातील जे दोन महत्त्वाचे कामगारप्रधान मतदार-संघ आहेत त्यांपैकी दक्षिण–मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघ प्रमुख आहे. मतदारसंघात एकूण ५३७,३९० एवढे मतदार असून राजकीयदृष्टया हा मतदार-संघ अत्यंत जागरूक समजला जातो. मध्यमवर्गीयांपेक्षाही येथील कामगारवर्ग या-बाबत अधिक आस्था दाखवितो, त्यामुळे येथील निवडणूक निश्चितपणे चुरशीची होईल. तसे पाहता आतापर्यंत थोडाफार डल वाटणारा हा मतदारसंघ रंगू लागला आहे. मावळत्या लोकसभेत या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व साम्यवादी पक्षाध्यक्ष भाई श्री. अ. डांगे यांनी केले. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी संसदीय मतदारसंघांची पुनर्रचना करण्यापूर्वी ह्या भागासाठी एक सर्वसाधारण व एक राखीव अशा दोन जागा होत्या. ५२ सालच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ही सर्वसाधारण जागा काँग्रेसच्या श्री. व्ही. बी. गांधी यांनी, भाई डांगे व श्री. अशोक मेहता (समाजवादी) यांचा पराभव करून जिंकली होती. त्यानंतर १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोक्याच्या वेळी ही जागा श्री. व्ही. बी. गांधींचा पराभव करून भाई डांगे यांनी जिंकली. १९६२ सालच्या निवडणुकीत पुन्हा डांगे पराभूत झाले आणि श्री. गांधी हे काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले तर १९६७




सालेभॉय अब्दुल कादर
लीगचा पाठिंबा नाही तरीही....

साली पुनश्च भाई डांगे यांनी कॉंग्रेसचे उमेदवार उद्योगपती श्री. हरिश महिंद्र यांचा थोड्या (७००४) मतांनी पराभव केला. यावेळी प्रकृतीच्या कारणास्तव कॉ. डांगे निवडणूक लढवित नाहीत. म्हणूनच साम्यवादी पक्षाची उमेदवारी भाई गणाचार्य यांच्याकडे आली आहे. कॉंग्रेसतर्फे सालेभॉय अब्दुल कादर, शिवसेनेचे श्री. दत्ता प्रधान, जनसंघाचे श्री. वामनराव परब, रिपब्लिकन पक्षाचे (खोब्रागडे गट) श्री. राम औरंगाबादकर आणि श्री. जव्हेरी व श्री. शेख हे दोघे अपक्ष असे एकूण सात उमेदवार रिंगणात आहेत.

कॉंग्रेसवर ठाम निष्ठा असलेले श्री. सालेभॉय अब्दुल कादर यांचे संघटन-कौशल्य दांडगे आहे. नगरपिते आणि मंत्री म्हणून असलेला चांगला अनुभवही त्यांच्या गाठी आहे. मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक असताना अनेक समित्यांवर त्यांनी जबाबदारीच्या जागांवर कामे केली होती. ते कॉंग्रेस पक्षाचे पालिकेतील पक्षनेतेही होते आणि १९५६ साली मुंबईचे महापौर म्हणूनही त्यांची निवड झाली होती.

विधानसभेत असताना ते कॉंग्रेसचे मुख्य प्रतोद होते. त्याचप्रमाणे दारूबंदी मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. दारूबंदीच्या कार्यक्रमावर त्यांचा ठाम विश्वास असून 'पुरेसे अधिकार हाती असते तर एका महिन्यात सबंध देशातील दारूबंदी यशस्वी करुन दाखविली असती' असे ते मला मुलाखत देताना म्हणाले. कामराज योजनेनुसार त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला.



भाई गुलाबराव गणाचार्य
कामगारातून वर आलेले, कामगार भागातच उभे

सहकार चळवळ आणि कामगार चळवळींशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. भारत युवक समाजाचे ते अध्यक्ष होते आणि निरनिराळया शिष्टमंडळांतुन ते अनेक देशांचे दौरे करून आले आहेत.

भाई गुलाबराव गणाचार्य — साम्यवादी पक्षाचे भाई गणाचार्य हे लोकसभेच्या दक्षिण-मध्य मुंबई मतदारसंघातच असलेल्या भायखळा मतदारसंघातून त्या पक्षातर्फे महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेले असून ह्या गोष्टीचा फायदा त्यांना जरूर मिळेल कारण. तेथील मतदारांशी असलेला त्यांचा संपर्क.

राष्ट्रीय चळवळीत सामील होण्याकरिता त्यांनी तलाठ्याची नोकरी सोडली आणि कै. साने गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली खानदेशात त्यांनी त्या कार्याला सुरुवात केली. 'छोडो भारत' चळवळीत त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते म्हणून सक्रीय भाग घेतला. सातारच्या पत्री सरकारशीही त्यांचे संबंध होते. मुंबईत येताच त्यांनी गिरणीत नोकरी धरली व नोकरी करीत असतानाच कामगारांचे संघटन करायला सुरुवात केली. १२ वर्षे ते मुंबई नगरपालिकेचे सदस्य व दोन वर्षांच्या काळासाठी विरोधी पक्षाचे नेते होते. त्यांचा अजूनही कामगार चळवळ व विशेषत: गिरणी कामगारांशी जवळचा संबंध आहे आणि हा मतदारसंघ व विशेषत: कामगारांचा बालेकिल्ला असल्याने 'आपण विजयी होऊ' अशी त्यांना खात्री वाटते. काँग्रेस, काँग्रेस सोशालिस्ट ब्लॉक, समाजवादी पक्ष आणि साम्यवादी पक्ष असा त्यांनी राजकीय प्रवास केला आहे. कामगारवर्गाची गाऱ्हाणी लोकसभेत मांडण्यासाठी निवडणूक लढवीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मुस्लिम लीगने त्यांना पाठिंबा दिला आहेच. सुमारे ४० हजार मुस्लिम गिरणी कामगार 'आपल्यालाच मते देतील, असा त्यांना विश्वास वाटतो.

शिवसेनेतर्फे निवडणूक लढविणारे श्री. प्रधान हे शिवसेनेचे प्रमुख संघटक आहेत आणि त्यांचे संघटनाकौशल्य जबरदस्त आहे. परळच्या निवडणुकीची सर्व सूत्रे त्यांच्या हाती होती. आणि सूत्रबद्धपणे प्रचंड मिरवणुका आयोजित करणे, आदी



दत्ता प्रधान
अखेर सारी भिस्त यांच्यावर....

गोष्टींत त्यांचा हातखंडा आहे. परळ निवडणुकीच्या वेळी अशीच एक जंगी मिरवणूक त्यांनी आयोजित केली होती. त्या मिरवणूकीतील पहिला माणूस ठरलेल्या जागेवरून केव्हा निघेल, येथून ते मिरवणुकीतील सर्वात शेवटचा माणूस सभेच्या ठरलेल्या जागी किती वाजता पोहोचेल याच्या वेळा पोलीस आयुक्तांना दिल्या होत्या आणि हे सर्व त्यांनी ठरल्याप्रमाणे शिस्तबद्धरीतीने करून दाखविले. 'छोडो भारत' चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी अभ्यासाला सुट्टी दिली. मुंबईतील नौसेना बंडाच्या वेळी सामुदायिक उठावात भाग घेतल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली होती.

गोवा विमोचन व संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या चळवळींशी त्यांचा संबंध होता. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखालील सत्याग्रहींच्या तुकडीत ते होते. दादरा-नगर हवेलीच्या मुक्ती लढ्यातही त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. साम्यवादी पक्षाचे उमेदवार व आपण यातच खरी लढत होईल असे त्यांना वाटते.

मुंबई महानगरपालिकेत कामाठीपुरा मतदार संघातून वामनराव परब नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. ईशान्य मुंबई मतदारसंघात शिवसेनेने जनसंघ उमेदवार डॉ. मुकुंदराव आगासकर यांना विरोध केल्यामुळे जनसंघाने श्री. परब यांना येथून उभे केले आहे. 'सामान्य माणसाचा व विशेषतः झोपडपट्टीतील लोकांचा प्रतिनिधी' असे त्यांचे वर्णन केले जाते. झोपडपट्टीसंघाचे ते अध्यक्ष आहेत. उपेक्षित वस्ती परिषदेचेही ते अध्यक्ष आहेत.

शाळेत असल्यापासूनच त्यांचा राजकारणाशी संबंध आहे. 'छोडो भारत', संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ आदी चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. कोकणातून आलेल्या श्री. परब यांना कोकण विकासाबद्दलही खरी आस्था आहे.

रिपब्लिकन पक्षातर्फे (खोब्रागडे गट) श्री. राम औरंगाबादकर उभे आहेत. तरुणपणीच कै. बाबासाहेब आंबेडकरांशी त्यांचा संबंध आला आणि तेव्हापासून आजपर्यंत ते बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी आहेत. सामाजिक कार्यकर्ते, सिनेसमीक्षक व 'इंडिया इंटरनॅशनल' या संस्थेचे संस्थापक सदस्य म्हणून ते काम मुंबईकरांना परिचित आहेत. बहुढंगी, बहुरंगी व्यक्तिमत्त्व असलेल्या श्री. औरंगाबादकर यांनी त्यांच्या कार्याचा श्रीगणेशा श्री. शंकरराव साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली केला. परदेशांत भरलेल्या काही चित्रपट-महोत्सवांना व परिषदांनाही ते उपस्थित राहिलेले आहेत.

पूर्वी अभंग काँग्रेसचे सदस्य असलेले श्री. जव्हेरी हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवीत आहेत. त्यांचे जवाहिऱ्याचे दुकान असून काही उपहारगृहेही आहेत. ४७ वर्षांचे जव्हेरी फक्त मॅट्रिक्युलेट आहेत पण त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. 'लोकसेवेकरिता आपण निवडणूक लढवीत आहोत' असे ते म्हणतात.



वामनराव परब

जर टाटा, करिअप्पा मराठी तर मग आगासकर कोण ?

श्री. शेख शमिम अहमद–फक्त २९ वर्षांचे असलेले शेख मूळचे उत्तर प्रदेशातील. त्यांच्यापेक्षा त्यांचे मित्र-हितचिंतकच त्यांच्या निवडणुकीत अधिक रस घेत आहेत. सहा वर्षांपूर्वी मुंबईत आलेले शेख वाहतूक व्यवसायात आहेत. मित्रांनी आग्रह केल्यामुळे ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांना विजयाबद्दल खोटया आशा नाहीत त्यामुळे ते प्रचार करीत नाहीत. मात्र प्रत्यक्ष मतदारांशी संपर्क ठेवून ते प्रचार करतात. त्यांचे ३० मित्र त्यांच्यासाठी खूप कष्ट घेत आहेत.

इंदिराबाईंनी निवडणुकीचा निर्णय जाहीर करताच मुंबईतील प्रचाराला रंगत चढली खरी, पण त्यानंतर हे सर्व वातावरण लुप्त झाले. आघाडया, युत्या, उमेदवारांची निवड या घोळात प्रचाराचा टेम्पो कमी झाला पण त्यानंतर आता पुन्हा प्रचाराला रंग चढू लागला आहे. तसे पाहता दक्षिण मुंबईत हे प्रमाण जोरात आहे पण त्याखालोखाल ते कदाचित दक्षिण-मध्य मुंबईतच आहे.

काँग्रेस, साम्यवादी, शिवसेना व जनसंघ हे निवडणुकीतील तसे महत्त्वाचे पक्ष. रिपब्लिकन पक्ष आणि इतर दोन अपक्ष उमेदवार यांचा प्रचार तितकासा जोरदार नाही. श्री. औरंगाबादकर यांच्या प्रचाराची पोस्टर्स व बॅनर्स काही ठिकाणी दिसतात तर इतर दोघा अपक्षांचा प्रचार तसा अगदीच कमी आहे.

श्री. कादर यांची मुख्य निवडणूक कचेरी नायर हॉस्पिटलजवळ असून गल्ली मोहल्ल्यातून १ हजार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रचाराचे कार्य सुमारे ५ हजार कार्यकर्ते करीत आहेत. मुंबई प्रदेश काँग्रेस समिती रस्त्यारस्त्यावर गल्ली बोळांत सभा घेते. स्वतः कादर पदयात्रा करतात आणि मतदारांना भेटतात. केंद्रीय अर्थमंत्री चव्हाण यांनी त्यांच्यासाठी काही सभा घेतल्या. मुख्यमंत्री नाईकही सभेतून बोलतात. पोस्टर्स, बॅनर्स व भितींवरील घोषणा यांचाही उपयोग केला जात आहे.

'लोकांनी इंदिरा गांधींचे हात बळकट करणे आवश्यक आहे' हे प्रचाराचे सूत्र आहे. कादर यांना असे वाटते की पंतप्रधानांनी समाजवादाची जी पावले टाकली आहेत त्यामुळे सामान्य जन काँग्रेसकडे आकर्षित झाले आहेत. मराठी लोकांचा 'प्रचंड पाठिंबा' मिळावा या दृष्टिकोनातून त्यांचा प्रचार करण्याचा प्रयत्न असतो.

भायखळ्याची लव्ह लेन येथे व इतर काही ठिकाणी काँग्रेसने वातावरण निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. लालबाग येथील एका गल्लीत एका इमारतीच्या भिंतीवर (ही इमारत काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याचे मला सांगण्यात

---

■ मतदारांची संख्या ५,३७,३९० (ही संख्या १९६७ साली ५,०८,२०३ इतकी होती) असून त्यापैकी ३५,००० हजार मराठी मतदार आहेत. १ लाखापेक्षा अधिक एवढे मुस्लिम मतदार आहेत. ४० हजार उत्तर प्रदेशीय तर सुमारे १८ हजार पारशी, १० हजार गुजराती व उरलेले मतदार ख्रिश्चन, ज्यू आदी आहेत. मतदानासाठी एकूण ५७२ मतदान केंद्रे असतील.

■ या लोकसभा मतदारसंघात एकूण ६ विधान सभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी शिवडी व भायखळा मतदारसंघातून अनुक्रमे भाई सावळाराम पाटकर व भाई गणाचार्य हे साम्यवादी पक्षातर्फे निवडून आलेले आहेत. तर या दोन्ही मतदारसंघामधोमध असलेल्या लालबाग मतदारसंघातून नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत शिवसेनेचे श्री. वामनराव महाडिक अवघ्या १६०० मतांनी निवडून आले. (तेथे पूर्वी साम्यवादी पक्षाचे भाई कृष्णा देसाई हे निवडून आले होते.)

लालबाग, भायखळा मतदारसंघांच्या पूर्वेला असलेल्या माजगाव मतदार संघाचे आमदार आहेत नवकाँग्रेसचे डॉ. कृ. वि. तोरसकर तर नागपाड्यातून श्री. आदम आदिल निवडून आले होते. (पूर्वी ते संघटना काँग्रेसमध्ये होते.) उरलेल्या वाळकेश्वर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व नवकाँग्रेसचे श्री. होमी तल्यारखान करतात.

---

आले) मोठी चित्रे रंगविण्यात आली आहेत. त्यापैकी, एक असे आहे-एक वाघ काढला असून त्यावर ठाकरे अशी अक्षरे आहेत त्यावर टाटांना बसविण्यात आले असून जनरल करिअप्पा बाजूला उभे असल्याचे चित्र आहे व वर लिहिले आहे. 'चलरे बिल्ली टक टक टक.'

शिवसेनाही प्रचार मोहिमेत मागे नाही. नेहमीच्या तडाखेबंद रीतीने श्री. प्रधान यांचा प्रचार चालू आहे. परळ, लालबाग, शिवडी, भायखळा येथे सर्वत्र भगवे ध्वज लावण्यात आले आहेत. सर्वत्र मजेदार घोषणा लिहिलेल्या आहेत. मात्र परळ पोटनिवडणुकीसारखे जबरदस्त शिवसेनामय वातावरण या वेळी सेनेला निर्माण करता आलेले दिसत नाही. प्रचार सभांच्या सुरुवातीला 'अरुण खोपकर आणि मंडळी' हे नायगाव शाखेचे कलापथक गीते, भारुडे, पोवाडे सादर करते. येथे त्यांची कल्पकता जरूर दिसून येते. 'आली आली ग भागा बाई' या चालीवर 'आली आली ग इंदूताई' व इतर तशाच प्रकारच्या जुन्या भारुडांना नवे स्वरूप

---

■ शिवडी, लालबाग व काही प्रमाणात भायखळा मतदारसंघात प्रामुख्याने मराठी मतदार आहेत. तर भायखळा, नागपाडा भागात प्रामुख्याने मुसलमान मतदारांची संख्या अधिक आहे. माजगाव, भायखळा मतदारसंघात ख्रिश्चन व ज्यू लोक अधिक प्रमाणात आहेत आणि वाळकेश्वर मतदारसंघात सर्वच जाती जमातींचे लोक जवळजवळ सारख्याच प्रमाणात रहातात. हा भाग श्रीमंतांचा बालेकिल्ला मानला जातो आणि मतदानाऐवजी त्या दिवशीची सुट्टी घरीच, किंवा सहल, वा क्लबमध्ये घालविण्यासाठी तेथील मतदार प्रसिद्ध आहेत असे म्हणतात. या मतदारसंघात संघटना काँग्रेस, जनसंघ व स्वतंत्र पक्षांकडे झुकणारे मतदार आहेत. शिवडी, लालबाग, माजगाव, भायखळा येथे कामगारांची वस्ती अधिक आहे.

■ १९६७ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या मतदार संघात

| | |
|---|---|
| एकूण मतदारांची संख्या होती | ५,०८,२०३ |
| एकूण झालेले मतदान | ४,८३,१४६ |
| ग्राह्य मते | ३,४२,५४२ |
| बाद मते | ८,१३७ |
| गेल्या निवडणुकीतील मतदानाची विभागणी | |
| भाई श्री. अ. डांगे यांना मिळालेली मते | १,४२,७१८ |
| काँग्रेसचे श्री. हरीष महेंद्र यांची मते | १,३५,७१४ |
| स्वतंत्र उमेदवार श्री. पी. जे. श्रॉफ | ०,४६,५६१ |
| आणि जनसघाचे श्री. एम्. एल्. अमिन | ०,१९,४१२ |

---

देऊन ते पथक मतदारांची करमणक करते. नेते सभेसाठी सभास्थानी येईपर्यंत ते हे कार्य करतात. सुमारे २ ते २॥ तास असे मनोरंजन करण्याइतकी अशी (नव) भारुडे त्यांच्याकडे आहेत. श्री. प्रमोद नवलकर–'शिवसेनेची ब्रेनगन'–त्यांच्या वक्तव्याने मतदारांना मोहून टाकतात तर शिवसेनेच्या कामगारसेनेचे नेते श्री. दादी गोवाडिया हे वृद्ध पारशी गृहस्थ त्यांच्या मजेदार पारशीप्रचुर मराठीत अत्यंत विनोदी भाषणे करून लोकांची करमणूक करतात. संघटना कांग्रेसचे नेतेही त्यांच्या सभांतून बोलतात.

जिजामाता उद्यानाजवळ श्री. प्रधान यांची मुख्य कचेरी आहे. इतर ६ उप-कार्यालये आणि महापालिका वॉर्डस्प्रमाणे २५ इतर कार्यालये आहेत. सुमारे ६ हजार शिवसैनिक प्रचाराचे कार्य धूमधडाक्याने करीत आहेत. सुमारे २ हजार शिवसैनिकांनी या कार्याकरिता त्यांच्या कचेऱ्या, कारखाने यातून रजा घेतली आहे. रात्रंदिवस त्यांचे काम चालू असते. पदयात्रा निघतात. या वेळी सुहासिनी श्री. प्रधान यांना आरत्या ओवाळतात. आतापर्यंत त्यांनी घरोघरी जाऊन सुमारे ४ लक्ष मतदारांशी संपर्क साधला आहे. आतापर्यंत त्यांनी नगरपालिकेच्या ३० वॉर्डस पैकी २३ वॉर्डसमधील मतदारांची भेट घेतली. आणि ३१ मेळावे आयोजित केले. सेनेची महिला आघाडी व चित्रपट शाखाही प्रचारासाठी झटत आहे. कामाठीपुरा व इतर मराठी भागात सेना व संघ यांचा जोर दिसतो.

श्री. गणाचार्य यांची मुख्य निवडणूक कचेरी दळवी बिल्डिंग परळ येथे आहे. आमदार सा. गो. पाटकर हे त्यांच्या प्रचार मोहिमेचे सूत्रधार आहेत. साम्यवादी पक्षाचे सुमारे ५ हजार कार्यकर्ते व त्यांच्या पक्षांशी संलग्न असलेल्या कामगार संघटनेचे कार्यकर्ते या प्रचार आघाडीवर काम करीत आहेत.

विधानसभेच्या प्रत्येक मतदारसंघात रोज सभा घेण्यात येतात. निवडणूक होईपर्यंत एकूण साठ एक सभा घेण्यात येणार आहेत. मुस्लिम लीगचा पाठिंबा हा आणखी महत्त्वाचा असा भाग. सुमारे ४० हजार मुस्लिम गिरणी कामगारांवर त्यांची भिस्त आहे.

परळ, भायखळा, शिवडी, आंबेवाडी, नागपाडा, मदनपुरा येथे या पक्षाने वातावरण तयार केले आहे. डिलाईल रोड हा प्रामुख्याने कामगार वस्तीचा भाग. तेथेही काही प्रमाणात त्यांचा प्रचार जास्त आहे.

मदनपुरा, नागपाडा, टॅमकर स्ट्रीट, हजारिया स्ट्रीट हा मुस्लिम लीगचा बालेकिल्ला आणि लीगचा गणाचार्यांना पाठींबा. तेथे उर्दू बॅनर्स, पोस्टर्सद्वारा त्यांचा प्रचार चालू असून साम्यवाद्यांचा 'लाल बावटा' व लीगचा हिरवा 'झेंडा' एकत्र फडकताना दिसतात. लीगचे नगरसेवक जनाब बनातवाला हे प्रचारसभांतून बोलतात. १४ फेब्रुवारी रोजी मस्तान तलाव तेथे झालेल्या जाहीर सभेत ते म्हणाले, 'आम्ही इतर चार मतदारसंघात इंडिकेट कांग्रेसला पाठींबा दिला असला तरी

े गणाचार्य साम्यवादी पक्षाप्रमाणेच लीगचेही उमेदवार आहेत. म्हणूनच त्यांना
वडून आणण्याची जबाबदारी आम्ही स्विकारली आहे. "त्यांना निवडून आणून
ापल्या निधार्मिक व पुरोगामी स्वरूपाची ग्वाही द्या व मुस्लीमलीगची ' शान '
ठवा अशी मतदारांनो तुम्हाला विनंती करतो– सालेभॉयसारख्या मुसलमानाला
ाम्ही विरोध करतो कारण येथे प्रश्न धर्माचा नसून राजकारणाचा आहे " ह्या
ीमुळे व प्रचारामुळे तेथे गुलाबरावांना बरीच मते पडतील असे दिसते.

जनसंघाच्याही सभा चालू असतात. सभांतून त्यांच्या ' स्वदेशी योजने 'वर भर
ला जातो. देशाला असलेले १४ हजार कोटी रुपयांचे कर्ज व त्यापैकी ७००
ोटींचे परकीय कर्ज फेडायचे आहे व यातून देश वाचविण्यासाठी इंदिरा नव्हे तर
नसंघच हवा व स्वदेशी योजनाच आपले प्रश्न सोडवील ' असा प्रचार केला
ातो. सभा होतात, कार्यकर्ते व श्री. परब मतदारांना भेटतात. पण सर्वात वैशिष्ट्य-
र्ण प्रचार त्यांनी ' Her master 's voice ' ' इंदिरा का मायाजाल ' आदी
ोस्टर्सद्वारे चालविला आहे.

विधानसभेचा वाळकेश्वर मतदारसंघ याबाबत संघाला चांगलीच साथ देत आहे.

ह्या मतदार संघाबद्दलची माहिती गोळा करतानाच थोडा वेळ व संधी साधून
ार महत्त्वाच्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

ी. कादर—

प्रश्न : आपण ही निवडणुक का लढवीत आहात ?

उत्तर : मी दारुबंदी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर राजकारणात वितकासा

---

■ मतदारांना पैसे देणे आपल्या निवडणुकींचा एक भाग बनून राहिला आहे. विशेषत: गरीब वस्त्या, झोपडपट्टी आदी भागात हे प्रमाण अधिक असते. झोपडपट्टीतील ' दादां 'ना पैसे देण्याचा उद्योगही अनेक पक्ष करीत असतात. नुकत्याच मिळालेल्या एका खात्रीलायक बातमीनुसार, साम्यवादी पक्षाकडून नवकाँग्रेसकडे गेलेल्या एका ' बडचा कार्यकर्त्या 'ने माजगाव विभागातील ' फॉर्टी ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका दादाला २ हजार रुपये दिले. पण यापुढे अशा गोष्टींना आळा बसेल अशी शक्यता आहे. कारण मुख्य निवडणूक आयुक्त श्री. सेनवर्मा यांनी मतमोजणीची जुनी पद्धत बदलली आहे. त्यानुसार आता विभागानुसार मतमोजणी न होता सर्व विभागातील मते एकत्र करून मिसळवली जाणार असून मगच मत-मोजणी होईल. त्यामुळे पैसे घेऊनही मते न देणारे कोण आहेत हे पैसे देणाऱ्या पक्षाला कळणे शक्य नसल्याने असे प्रकार थांबण्याची शक्यता आहे.

'ॲक्टीव्ह' नव्हतो आणि तसा निवडणुकीला उभा रहायला राजी नव्हतो. पण नंतर मी उभा रहायला तयार झालो कारण श्रीमती गांधींनी समाजवादाची जी वाटचाल सुरू केली आहे त्यात त्यांचा पाठपुरावा करणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रश्न : नवकाँग्रेस बहुमतात येईल काय ?

उत्तर : इंदिराजींचे हात बळकट होणे अत्यावश्यक आहे. त्यांना नुसते काम चलावू बहुमत मिळून चालणार नाही तर निरनिराळी बिले पास करायला, नवे कायदे करायला लागणारे ⅔ बहुमत मिळणे अत्यावश्यक आहे. आपल्या घटनेचे पुनर्घटन करणे आवश्यक आहे.

प्रश्न : अलिकडेच इतर पक्षांतून फुटलेले लोक नवकाँग्रेसकडे येतात व त्यांचे काँग्रेसतर्फे चांगलेच स्वागत होते यात काही वावगे नाही वाटत. हा निव्वळ संधी-साधूपणा नव्हे काय ?

उत्तर : ज्यांचा गांधींच्या समाजवादावर विश्वास आहे असे कार्यकर्ते त्यांच्या या कार्यात सक्रिय भाग घेण्यासाठी जेव्हा येतात आणि असे लोक मोठ्या प्रमाणात कार्यकर्तेच असतात, तेव्हा यात वावगे वाटत नाही. मात्र एखादा आमदार, नगर-सेवक जर पक्षांतर करणार असेल तर त्याने श्री. भाई शेटयेंप्रमाणे राजीनामा देऊन लोकशाही परंपरांना जपले पाहिजे.

प्रश्न : जातीयवादी लीग, परकीय देशाकडे निष्ठा असलेला साम्यवादी पक्ष असे ज्याचे वर्णन केले जाते त्या पक्षांसाठी इंडिकेटने जागा सोडणे कितपत योग्य आहे ?

उत्तर : ही फक्त ॲडजेस्टमेंट आहे आणि प्रत्येक पक्ष तशी ती इतर पक्षांशी करीत आहे व हे पक्ष आमच्या प्रागतिक धोरणांना पाठींबा देत आहेत हे दृष्टी-आड करून कसे चालेल ?

प्रश्न : इतरत्र चालू ठिकाणी तुमच्या पक्षाला पाठींबा देणाऱ्या लीगने येथे तुमच्या सारख्या नवकाँग्रेसच्या मुस्लिम उमेदवाराला पाठींबा न देण्याचे काय कारण असावे असे तुम्हांला वाटते ?

उत्तर : केरळमध्ये लीग व साम्यवादी पक्षांची आघाडी आहे. त्यांच्यात समझौता आहे कदाचित त्या धोरणानुसार त्यांनी साम्यवादी पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला असल्याची शक्यता आहे.

इतर चार ठिकाणी साम्यवादी पक्षाचे उमेदवार नसल्याने त्यांनी आमच्या पक्षाला पाठींबा दिला. शिवाय मौलाना आझाद यांच्याप्रमाणेच माझीही उमेद-वारी काही लीगवाल्यांना पसंत नसावी असे दिसते. असे असले तरी मला मुस्लीम मते चांगल्या प्रमाणात मिळतीलच पण मी मते मिळविण्याबाबतचा या दृष्टीने विचारच करीत नाही.

श्री. गणाचार्य

**प्रश्न** : भाई डांगे यांच्यानंतर उमेदवारी आपल्याकडे येण्याचे कारण काय ?

**उत्तर** : माझा विधानसभा मतदार संघ याच लोकसभा मतदार संघात आहे. हा गिरणी कामगारांचा विभाग आहे आणि मी त्यांच्या निरनिराळ्या युनियन्सचा पदाधिकारी आहे. गेली २५ वर्षे येथे माझे कार्य आहे. मुंबईतील एकून २ लाख

---

ऑक्टोबरमध्ये झालेल्या परळ येथील पोटनिवडणूकीपासून मुंबईत भिंती-वरील घोषणा रंगविण्याबाबत एक नवीन ट्रेन्ड निर्माण झाला आहे. पूर्वीच्या रटाळ घोषणा जाऊन नाटकांची नावे, सिनेमांची नावे यांचा उपयोग मजेदार आणि आकर्षक घोषणा तयार करण्यासाठी करण्यात आल्याचे दृष्य मुंबईत दिसते त्यातल्या काही घोषणा–

१. आटक मे फाटक
फाटक मे तोता
इंडिकेटको ठोका
तो तू क्यो रोता ?

२. बापाने नही जाना गरीबोंका राज
बेटी क्या लायेगी समाजवाद !

३. गुलके गुलाब खिलते रहेंगे
शिवसेना आई तो मिलते रहेंगे।

४. कटी पतंग कटी पतंग
इंडिकेटकी हवा तंग.

५. Imposes Communism.
Neglects Discipline.
Destroys Freedom and Democracy.
Inspires Naxalites.
Runs Dictatorship.
Abolishes Constitution.


६. नानक नामका जहाज है. देशमे इंदिराका आवाज है।

७. पुढच्यास ठेच मागचा शहाणा
इंदिरा विरोधकाला पाडा उताणा.

८. इस दियेमे तेल नही है, सरकार बदलना बच्चोंका खेल नही है।

९. सुनकर इंदिराका संदेश, जाग उठा है सारा देश।

---




*Stockists :*

**M/s. Prabhu Hosiery,** 106 Chakla Street, Bombay-3.
**M/s. K. T. Karnani,** Picket Road, Bombay-2.
**M/s. T. Kishinchand,** Silk Bazar, Bombay-2.
**M/s. Prakash Traders,** 99, Chakla Street, Bombay-3.

२० हजार गिरणी कामगारांपैकी १॥ लाख कामगार या मतदारसंघात आहेत. त्यापैकी ७५-८० कामगारांचा मला पाठिंबा मिळेल. शिवाय काही मतदारांचा साम्यवादी पक्षाला विरोध आहे. माझ्या कार्यामुळे मला व्यक्ती म्हणून अशी मते मिळू शकतील.

प्रश्न : इंदिराकाँग्रेसला तुमच्या पक्षाचा पाठींबा का देता ?

उत्तर : या देशातील कष्टकरी जनतेचे कल्याण होण्याकरिता समाजवाद येणे आवश्यक आहे. आमच्या पक्षाचे राज्य येण्याइतकी आज आमची ताकद नाही. इंदिरा गांधी समाजवादाच्या दृष्टीने योग्य पाऊल टाकीत आहेत म्हणून पाठिंबा, पण आम्ही इशूज व मेरीटवर हा पाठिंबा देत आहोत. रेल्वे बजेटला आम्ही पाठींबा दिला पण रेल्वेकर वाढीला आम्ही कडाडून विरोध केला.

प्रश्न : इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले नाही तर सरकार स्थापन करण्यासाठी तुमचा पक्ष मंत्रिमंडळात जाईल का ?

उत्तर : आम्ही सरकारात जाणार नाही. समाजवादाच्या नावावर निवडणुका घ्यायच्या व निवडून आल्यावर ७०० कोटींचे कर बसवायचे हे आम्हाला मान्य नाही.

प्रश्न : तुमच्या पक्षाची नवकाँग्रेसबरोबर 'अॅडजेस्टमेंट' असतानाही या मतदारसंघात तुमच्याविरुद्ध काँग्रेस उमेदवार कसा ?

उत्तर : दिल्लीतील काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या ज्येष्ठ नेत्यांचे म्हणणे ती सीट आमच्यासाठी सोडावी असेच होते पण हे महाराष्ट्र काँग्रेसचे राजकारण. बाईंच्या मागे ठामपणे उभे राहणाऱ्या जाधव, धारिया, खाडिलकर यांना जागा देताना महाराष्ट्र काँग्रेसचे नेते खळखळ करतात तेथे आमचे काय? महाराष्ट्रात अशी अॅडजेस्टमेंट झाली तर म्हणे टीका होईल असे यशवंतराव चव्हाण म्हणतात मग आसाम, केरळात कशाला केलीत अॅडजेस्टमेंट ?

प्रश्न : जनसंघ–शिवसेना या निवडणुकीत उतरल्याने तुमच्यावर काही परिणाम होईल का ?

उत्तर : उलट त्यांची मते विभागली गेल्यामुळे मला त्याचा फायदाच मिळेल.

## दत्ता प्रधान

प्रश्न : श्री. प्रधान, आपल्याला उमेदवारी मिळण्यामागची कारणे ?

उत्तर : माझे मागचे कार्य, संघटना प्रमुखत्व, कोकणसाठी केलेले काम, कामगार संघटनासाठी केलेले काम आणि महत्त्वाचे म्हणजे परळची निवडणूक लढविताना मी बांधलेली संघटना यामुळे मला उमेदवारी मिळाली.

प्रश्न : लोकसभेची निवडणूक लढविण्यामागची शिवसेनेची भूमिका कोणती ?

उत्तर : मुंबई, महाराष्ट्र, कोकण व सीमा प्रश्नावर पोटतिडिकीने बोलणारा

पक्ष फक्त शिवसेनाच आहे. हे सर्व प्रश्न धडाडीने मांडण्यासाठी आम्ही ही निवड-णूक लढविण्याचा निर्णय घेतला. शिवाय शिवसेनेवर अनेक बेजबाबदार आरोप केले जातात ते संसदेत खोडून काढणे अत्यंत आवश्यक आहे. विधानसभेत आमचा एक आमदार बसताच विरोधकांची तोंडे गप्प झाली.

प्रश्न : उमेदवार निवडताना पक्षात चिकार मतभेद झाले असे म्हणतात. यात किती तथ्य आहे ?

उत्तर : थोड्या प्रमाणात तसे झाले पण तसे ते प्रत्येक पक्षात होतात किंबहुना यामुळे आम्ही लोकशाहीवादी असल्याचे सिद्ध नाही का होत ?

प्रश्न : अनेक मंडळी सेनेतून गेल्याच्या बातम्या आहेत व श्री. साळवी नव-कॉंग्रेसमध्ये जाणार असेही म्हटले जाते. हे कितपत खरे आहे व या सर्वांचा निवड-णुकीवर काय परिणाम होईल ?

उत्तर : फुटून निघालेल्यांची जी आकडेवारी देण्यात आली आहे ती तितकी नाहीच मुळी. हा सर्व प्रचार आहे आणि श्री. साळवी फुटन जाणार नाहीत या-बद्दल मला ठाम विश्वास आहे.

प्रश्न : राज्य सरकारी नोकराच्या संपाबावत जी भूमिका सेनेने घेतली त्यामुळे मतदानावर काही परिणाम होईल काय ?

उत्तर : प्रथम तसे वाटले होते पण लोकांनी आमची भूमिका समजावून घेतली. ती त्यांना पटली आहे. आमची भूमिका त्यांच्या विरोधी नव्हतीच. त्यांचे प्रश्न फक्त शिवसेनाच सोडवील हे आम्ही सभेतून सांगतो.

प्रश्न : जनसंघाबरोबर बोलणी फिसकटली त्याचा परिणाम मतदानावर होईल का ?

उत्तर : ईशान्य मुंबईबाबत जनसंघाने हट्टी भूमिका घेतली. त्यामुळेच बोलणी फिसकटली. तसे व्हायला नको होते. पण झाले. आम्हाला जनसंघाशी युती हवी होती. बड्या आघाडीशी नाही. ही जागा जनसंघाला देऊ केली होती पण त्यांना बड्या आघाडीशीही युती हवी होती. बड्या युतीतर्फे जनसंघ बोलू लागला त्यामुळे हे फिसकटले. सर्वमान्य होणारी राष्ट्रीय फिगर तोडगा म्हणून मान्य करावी असे ठरले व त्यानुसार जनसंघानेच करिअप्पाचे नाव सुचविले. या मतदार-संघात श्री. परबांना उभे करून संघ अप्रत्यक्षरीत्या देशद्रोह्यांनाच मदत करीत आहे.

## वामनराव परब

प्रश्न : आपल्याला पक्षाने येथे उभे राहण्याचा आदेश दिला त्याचे कारण डॉ. आगासकरांना शिवसेनेने पाठिंबा दिला नाही हे आहे. पण जनसंघ शिवसेना बोलणी कोणत्या कारणांनी फिसकटली ?

उत्तर : ठाकरे यांना युती फक्त जनसंघ शिवसेनेपुरती पाहिजे होती. पण आमच्या नेत्यांचे म्हणणे होते की इंडिकेटला पाडणे सोपे काम नाही. त्यासाठी सर्वच विरोधी पक्षांची युती होणे आवश्यक आहे. तर श्री. ठाकरे यांचा त्याला व विशेषत: जॉर्ज फर्नांडिस यांना प्रखर विरोध होता त्यामुळे ४ जानेवारीला होणारी बैठकच त्यांनी रद्द केली. म्हणूनच मला येथून उभे राहवे लागले.

प्रश्न : शिवसेनेचे असे म्हणणे आहे की श्री. मुकुंदराव आगासकर तेथून दोन वेळा पराभूत झाले आहेत शिवाय तो मतदारसंघ सेनेचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे जनसंघाची भूमिका त्यांना आडमुठेपणाची वाटली, याला आपले उत्तर काय ?

उत्तर : आगासकर हे लोकसभेच्या निवडणुकीत फक्त एकदाच पराभूत झाले व एकदा त्यांना विधानसभेच्या निवडणुकीत अपयश आहे. पण त्यांनी लढत दिली तो मेनन बर्वे यांच्यासारख्या बलाढ्यांशी. एवढे करूनही त्यांनी ८७ हजार मते मिळविली. शिवाय आमचे अडवानी तेथून विधानसभेवर निवडून आले आहेत. ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातील, कुर्ला, कल्याण, ठाणे, मुलुंड आदि विधानसभा मतदारसंघात आमचे जे उमेदवार होते त्यांना ५७ हजारावर मते मिळविली याचा सरळ सरळ अर्थ तेथे शिवसेनेचा बालेकिल्ला नाही असाच होतो.

शिवाय डोंबिवली, कल्याण, ठाणे येथील नगर पालिकेतील आमचे बळ व त्यांचे बळ याचा विचार केला पाहिजे. डोंबिवली नगर पालिका गेली १५ वर्षे आमच्या हाती आहे. गेल्या तीन वर्षांत शिवसेनेने तेथे आपली शक्ती गमावली आहे.

प्रश्न : मुंबईतील पाच जागांबाबत प्रथम योग्य तो समझौता झाला होता काय ?

उत्तर : होय असे काहीसे ठरले होते, दक्षिण मुंबईतून श्री. फर्नांडिस ईशान्य मुंबई. डॉ. आगासकर, वायव्य मुंबईतून. डॉ. शांती पटेल तर मध्य मुंबईतून श्री. बी. के. देसाई व दक्षिण मध्य मुंबईतून श्री. एस्. आर. कुळकर्णी हे शिवसेनेचे उमेदवार पण माझी खात्री लायक बातमी आहे की शिवसेनेने श्री. कुळकर्णी व श्री. देसाई यांच्या नावाचा विचार करताच शिवसेनेच्या बड्या नेत्यांत 'लाथाळी'ला सुरुवात झाली व शेवटी श्री. प्रधान आणि श्री. जोशी यावर ही तडजोड करावी लागली तरीही शिसेनेच्या एका बड्या ब्राह्मणेत्तर नेत्याने श्री. ठाकरे यांना 'बाळासाहेब बामणांचे राज्य आणायचा विचार आहे काय ?' असा प्रश्न विचारला.

प्रश्न : समझौता न झाल्यामुळे काय होणार आहे ?

उत्तर : यांचा फायदा ज्यांची देशावर निष्ठा नाही अशा उमेदवाराला किंवा काँग्रेसला मिळेल. समझौता होणे फार आवश्यक होते. पण दुर्दैवाने तसे झाले नाही. मराठी मराठी म्हणायचे, मग टाटा, करिअप्पा काय मराठी आहेत आणि

डॉ. आगसकर मराठी नाहीत की काय? महापालिकेच्या कारभाराची भाषा मराठी असावी असा मी ठराव आणला. त्याला विरोध करणाऱ्या डॉ. शांती पटेलना पाठिंबा द्यायला शिवसेना तयार आहे. पण डॉ. आगासकरांना नव्हे. हें त्यांचे मराठी प्रेम.

या मतदार संघातून फिरत असताना एक गोष्ट लक्षात आली की मतदारांचा, यावेळी खूपच गोंधळ उडालेला आहे. अनेकांना कोणाला मत द्यावे हे ठरविताना अडचण पडणार असल्याचे त्यांच्या बोलण्यात आले. ' इंदिरा गांधींचे हात, बळकट करावेत असे अनेकांना वाटते कारण बँकेचे राष्ट्रीयकरण, तनखे विधेयक आदि महत्त्वाची पाउले कोणाचाही मुलाहिजा न राखता मोठ्या धीराने त्यांनी टाकली. वाळकेश्वर भाग म्हणजे श्रीमंताचा विभाग. संघटना काँग्रेस, जनसंघ, स्वतंत्र पक्ष यांची तेथे अधिक पकड, तेथील एका पारशी तरुणीला मत कोणाला देणार असे विचारले असता ' निश्चितपणेच इंदिरेच्या उमेदवाराला. श्री. कादर यांना ' असे तिने उत्तर दिले कारण काय तर गांधींशिवाय या देशाला चांगले नेतृत्व कोणीच देऊ शकणार नाही यावर तिचा ' ठाम विश्वास आहे. ' तेव्हा त्यांच्या प्रागतिक धोरणाचा लोकांनी जोरदार पुरस्कार करण्याकरिता त्यांनाच मते दिली पाहिजेत असे तिला वाटते. त्याउलट तिच्या कुटुंबातील इतर मतदार जुन्या काँग्रेसबद्दल आस्था बाळगणारे असल्याने शिवसेनेला मते देण्याची शक्यता तिने बोलून दाखविली, त्यांचे मन वळविण्याचा ती प्रयत्न करीत आहे. जनसंघाला या विभागात बरीच मते मिळतील अशी शक्यता आहे. ताडदेव येथील एका कॉलनीत चक्कर मारली. घोळक्याने उभ्या असलेल्या काही तरुणांशी बोललो. एकतर ते जनसंघ किंवा शिवसेना यांना मते देणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्यातील तिशीतील एक तरुण म्हणाला ' गांधींच्या उमेदावाराला पाठिंबा द्यायचा म्हणजे त्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीला पाठिंबा देण्यासारखे आहे. तर ' देशद्रोही ' कम्युनिस्ट उमेदवाराला जीव गेला तरी मत देणार नाही. रहाता राहिले जनसंघ व शिवसेना. पण दुर्दैवाने हे दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकमेकांविरुद्ध उभे ठाकले आहेत. त्यांची मतं विभागली गेली तर नको असलेले उमेदवार निवडून येतील. आमच्या कॉलनीत सर्वचजण एकतर जनसंघ किंवा शिवसेना यांच्यापैकी कोणाला तरी मते देतील. येथील एकही मत कम्युनिस्ट वा काँग्रेसला जाणार नाही. याचे कारण काय असे विचारताच दुसरा एक तरुण म्हणाला—

' या दोन्ही पक्षांवर विचार करणाऱ्या सुबुद्ध माणसाचा विश्वास कसा बसावा आणि दुसरे म्हणजे शिवसेना नगरसेवक श्री. प्रभाकर निखळणकर यांनी हे सिद्ध करून दाखविले आहे की त्यांनी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी निवडून येण्यासाठी निवडणूका लढविल्या नव्हत्या तर लोकसेवेसाठी. सदा लोकांची कामे करायला तयार असणाऱ्या पक्षाचा खासदारही तसाच असेल याचा विश्वास वाटतो, तर

जनसंघाने दिल्लीचे प्रशासनही उत्तम प्रकारे सांभाळले आहे. याउलट तेवीस वर्षे सत्ता असूनही बाप-लेकीने देशाला काय दिले ? श्रीमती गांधी स्वतःचे हात बळकट करून नंतर संजय गांधींचे हात बळकट करणार याबद्दल मला तरी शंका नाही.'

चौपाटी–वाळकेश्वर रोड येथील एका गुजराती माणसाला गाठले. हे तरुण गृहस्थ मुंबई उच्च न्यायालयात वकिली करतात आणि एका नावाजलेल्या लॉ कॉलेजमध्ये शिकवतात. काही काळ अमेरिकेत वास्तव्य केलेल्या या तरुणाचे विचार अत्यंत प्रागतिक वाटले. निधर्मी धोरणाचाही त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला पण गांधींची वाटचाल 'हुकूमशाही'कडे चालू आहे त्याचप्रमाणे 'नवकाँग्रेस, साम्यवादी पक्ष व लीग एकमेकांच्या संगनमताने काय करतील सांगता येत नाही, म्हणून मत देताना प्रथम विचार जनसंघाचा नंतर शिवसेने'चा असे त्यांनी सांगितले. एकूण काय तर तेथील अनेक मतदारांशी बोलल्यावर असे दिसले की काँग्रेस व साम्यवादी पक्षाला तेथे मते मिळविणे जड जाईल.

नागपाडा, मनदपुरा येथे वस्ती आहे ती मुसलमानांची. तिथल्या प्रतिक्रिया :

तेथे कोणीतरी मला सांगितले, 'सालेभॉय अपना जानभाई है। चुनावमे वोही जितना चाहिये उसकोही हमारा व्होट रहेगा।' म्हणून मी विचारले, 'लेकिन लीगका सपोर्ट तो कम्युनिस्ट पार्टीके गणाचार्यको है।' यावर त्याचे उत्तर, 'हॉ ठीक है, लेकीन वो अपना जातभाई कैसा हो सकता है भाई ?'

एका सलूनवाल्याने सांगितले, 'आपून तो शेखसाहब को व्होट देनेवाला है। अपने मोहल्लेका आदमी है।' –'शेखसाहेब' आहेत अपक्ष उमेदवार आणि निवडून येण्याची खोटी आशा त्यांना वाटत नाही.

तर काही मंडळी, लीगचा श्री. गणाचार्य यांना पाठिंबा, म्हणून त्यांना मते देणार आहेत. कारण लीगचा शब्द म्हणजे 'कुराणातील' पवित्र शब्दाप्रमाणे त्यांना वाटतो. अगदी चक्क या भाषेत मला एका मुसलमानाने उत्तर दिले–

रहाता राहिले 'मराठी लोकांचे बालेकिल्ले' असलेले, शिवडी, लालबाग, परळ व भायखळा मतदारसंघ. येथेही बहुसंख्य कामगार वस्ती आहे. पूर्वी साम्यवादी पक्षाच्या पकडीखाली असलेले हे कामगार व विशेषतः तरुण कामगार वा या भागातील तरुण मुले शिवसेनेच्या उदयानंतर तिथे झुकली त्यामुळे कदाचित ही मते निर्णायक ठरू शकतील आणि अलिकडच्या लालबाग–परळ मतदारसंघातून शिवसेनेचे श्री. महाडीक निवडून आल्यामुळे तर तेथील मतदारांना भेटण्याची खूपच उत्सुकता होती.

डिलाईल रोड, भायखळा, शिवडी भागात जेथे कम्युनिस्टांचे कार्य पूर्वीपासूनच जोरात आहे तेथील मतदार श्री. गणाचार्य यांनाच पाठिंबा देतील यात शंकाच नाही. तेथील काही मतदार निवडणुकीबद्दल विचारताच 'वर्ग लढे', 'भांडवलदारी

पद्धती ' आदींवर बोलू लागले. हे त्यांची मते गणाचार्य यांनाच जाणार याचे निदर्शक वाटले.

लालबाग–हिंदमाता लेन येथील मतदारांनी ' मते फक्त शिवसेने 'लाच असे ठामपणे सांगितले.

डॉ. एस्. एस्. राव रोड येथील वेस्ट कॉलनीत शिरलो, तिथे निरनिराळे मत-प्रवाह आढळले. मात्र एका शिवसैनिकाची उत्तरे बोलकी वाटली. तो म्हणाला, ' मी अजूनही शिवसैनिक आहे पण बाळासाहेब व आमच्या इतर नेत्यांनी काही चुका केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य कर्मचारी संपाच्या वेळी नको तेव्हा त्यांनी वक्तव्ये केली. त्यांची भूमिका अगदी योग्यच होती याबद्दल मला ठाम विश्वास आहे. पण नको तेव्हा ती भूमिका मांडून त्यांनी संघटनेला जबर हानी पोहचविली आहे. पूर्वीचे अनेक कार्यकर्ते आता शिवसेनेच्या कामासाठी यायला नाराज आहेत. टाटा, करिअप्पांनाही आमच्या शिवसेनेने पाठिंबा द्यायला नको होता. अर्थातच शिवसेनेने किती दिवस दाक्षिणात्य विरोधी रहायचे ? त्यामुळे करिअप्पा दाक्षिणात्य म्हणून त्यांना पाठिंबा द्यायला माझा विरोध नाही, पण आगासकरांविरुद्ध पाठिंबा दिल्यामुळे त्याचा परिणाम आमच्या दत्ताजी प्रधानांवर होईल. या सर्व घोळात आगासकर निवडून आले आणि प्रधान पडले तर ती आमच्या संघटनेची जबरदस्त हानी असेल. म्हणूनच या चुका टाळता आल्या असत्या तर बरे झाले असते असे वाटते. हाच विचार मला अस्वस्थ करीत आहे. तसे आम्ही श्री. प्रधान यांच्या विजयाबद्दल आशावादी आहोत. '

सबंध मतदारसंघात फिरून, उमेदवार–मतदार–कार्यकर्ते यांच्याशी बोलून त्याचप्रमाणें एकूण सर्व वातावरण पाहून कोण विजयी होण्याची अधिक शक्यता आहे याचा काहीसा अंदाज बांधता येणे शक्य आहे.

श्री. डांगे उभे रहाते तर या निवडणुकीला अधिक रंग चढला असता तसा तो आज तरी नाही. पण थोडी फार रंगत आता येत चालली आहे. एके काळी ' देश-द्रोह्याबरोबर आम्ही कदापी बसणार नाही अशी ' ठाम ' भूमिका घेऊन समितीतून बाहेर पडलेला प्रजासमाजवादी पक्ष या निवडणुकीत साम्यवादी पक्षाच्या उमेद-वाराला पाठिंबा देत आहे. त्यांचे कार्यकर्ते त्यासाठी काम करीत आहेत. सदासर्वदा साम्यवादी पक्षाला शिव्यांची लाखोली वहाणारा मार्क्सवादी पक्षही नाक मुरडत, शिव्या देत श्री. गणाचार्य यांना पाठिंबा देत आहे. तर इतरत्र चार मतदारसंघात नवकाँग्रेसला पाठिंबा देणारी मुस्लिम लीग येथे मात्र नवकाँग्रेसच्या मुस्लिम उमेद-वाराऐवजी श्री. गणाचार्य यांना पाठिंबा देत आहे. याचे मुख्य कारण या दोन्ही पक्षांच्या केरळ शाखा केरळ सरकारात मांडीला मांडी लावून बसलेल्या आहेत हे होय. रिपब्लिकन पक्षाच्या कांबळे गटानेही त्यांनाच पाठिंबा दिला आहे.

परळच्या पोट निवडणुकीत ज्यांनी एकमेकाला मदत करून कॉम्रेड सरोजिनी


देसाई यांचा पराजय केला ते जनसंघ व शिवसेना येथे एकमेकाविरुद्ध ठाकले आहेत. त्याचा परिणाम त्यांची मते फुटून तो फायदा श्री. गणाचार्य यांनाच मिळण्याची अधिक शक्यता आहे. ईशान्य मुंबईत तडजोड झाली असती आणि डॉ. आगासकर यांना सेनेने पाठिंबा दिला असता तर श्री. प्रधान यांचा मार्ग मोकळा झाला असता. कदाचित त्यांचा विजय निश्चित झाला असता कारण जेथे जनसंघाचा उमेदवार नाही तेथे ही मते ठामपणे शिवसेनेलाच जाणार. त्याचा परिणाम मध्यमुंबईतील शिवसेनेचे उमेदवार श्री. जोशी यांच्यावरही थोडा होईल कारण तेथे जनसंघाने श्री. बी. सी. कांबळे यांना पाठींबा दिला आहे. पण आता मात्र तसे होणार नाही. जनसंघाचे उमेदवार श्री. परब यांना सुमारे ३० हजारावर मते मिळतील असा माहितगारांचा अंदाज आहे. या सर्व मतांना शिवसेना मुकणार आहे. तर साम्यवादी पक्षाला जाणारी झोपडपट्टीतील सुमारे ५० ते ६० हजार मते शिवसेनेच्या नगरसेवकांनी गेल्या दोन तीन वर्षात तेथे चांगले कार्य करून फोडलेली आहेत. तो फायदा शिवसेनेला मिळणार आहे.

लीगने जरी गणाचार्य यांना पाठिंबा दिला असला तरी 'अपना जानभाई' ओळखणारे मुसलमान त्यांनाच सर्व मते देतील अशी शक्यता नाही. ती मतें श्री. गणाचार्य, श्री. कादर व श्री. शेख यांच्यात विभागली जातील. पारशी, ख्रिश्चन्स, ज्यू आदी अल्पसंख्याक नवकाँग्रेसलाच मते देतील. शिवाय श्री. सालेभॉय कादर यांच्या चांगल्या स्वभावामुळे त्यांच्या समाजकार्यामुळे त्यांची म्हणून काही व्यक्तीगत मतेही त्यांना मिळतील. शिवसेना प्रमुखांची अलिकडच्या काळातील काही भूमिका, काही शिवसैनिकांचा काँग्रेस प्रवेश यामुळे ही निवडणूक सेनेला जरा जडच जाईल.

तेव्हा एकूण मिळणारा पाठिंबा, प्रचार, आदि गोष्टी पाहता सध्यातरी श्री. गणाचार्य यांची बाजू इतर उमेदवारांपेक्षा थोडी अधिक भक्कम वाटते. पण गणाचार्य आणि श्री. कादर यांच्यात खरा सामना होईल की गणाचार्य आणि श्री. प्रधान यांच्यात खरा सामना होईल याचा अंदाज बांधणे जरा कठीण आहे. माझ्या मते हा सामना गणाचार्य-प्रधान यांच्यातच होण्याची शक्यता अधिक. भायखळा लालबाग-परळ व शिवडी हे तीन मतदारसंघ या दोघांपैकी ज्या उमेदवाराला हात देतील त्याचे पारडे विजयाकडे झुकणारे ठरेल असा माझा अंदाज आहे. सहा मार्च जवळ आली आहेच. येत्या १० दिवसात प्रत्यक्ष निकालच आपल्याला याबाबतचे चित्र स्पष्ट करून सांगेल.

# कानावर आलं, ऐकलं....
# डोळयांना दिसलं, पाहिलं....


वसंत सरवटे



" लोकशाही टिकवण्यासाठी आपली मते टाटा...च्...आपलं...या शब्दानी इत
पक्षांचं स्वागत करून, जॉर्ज फर्नांडीस यांनाच द्या ! "




" मेरा नाम बद्रीप्रसाद..."




"टाटा ऽऽ टाटा ऽऽऽ टा ऽऽ टा ऽऽऽ टा ऽऽऽऽ टा ऽऽऽ"





" हां हां ! तुला अजून मतदानाचा अधिकार आलेला नाहीय् हं..."




"ते पहा, ते पहा, खोटं वाटत असलं तर प्रत्यक्ष पहा! आता जास्ती वेळ वाट नाही पहायला लागणार. पंधरा मिनिटात इथं येतील..."



"साहेब, हा प्रतिस्पर्धी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा वॉर्ड.
आपल्या कार्यकर्त्यांचा पलिकडे आहे."



1

“ आम्ही आपले मध्यममार्गी आहोत,
डावा हात मोडला डाव्यांच्या प्रचारसभेत
आणि उजवा उजव्यांच्या...”



“मला पुन्हा निवडून द्याल तर मी हमी देतो
की, प्रत्येकाला नोकरी, रहायला घर, भरपूर
पाणी पुरवठा, ह्या खेपेला नक्की मिळवून
देईन.”



"मी म्हटलं 'मला अजून मतदानाचा अधिकार मिळालेला नाही' तर म्हणतो कसा '२१ वर्षांवरील सर्वांनाच तो आपोआप मिळतो; त्याच्याशी बुद्धीचा काही संबंध नाही.'"




**अरुण गोसावी**

---

अखिल भारतात मतदारांच्या संख्येच्या दृष्टीने सर्वात मोठा असणाऱ्या ईशान्य मुंबई या मतदारसंघातील निवडणुकीकडे सर्व देशाचे लक्ष याही वेळी वेधले आहे, याचे कारण भारताचे माजी सरसेनापती जनरल के. एम. करिअप्पा यांची उमेदवारी. गेल्या दोन निवडणुकीतही हा मतदारसंघ आंतरराष्ट्रीय लक्ष वेधण्याइतका गाजला होता. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कृष्णमेनन विरुद्ध आचार्य कृपलानी यांचे द्वंद्व येथे गाजले होतें. पण त्यावेळचे या मतदारसंघाचे स्वरूपच वेगळे होते. १९६७ साली झालेल्या निकराच्या कुस्तीत कै. स. गो. बर्वे यांनी मेनन यांना १३ हजार मतांची धूळ चारली होती. बर्वे यांच्या मृत्यूनंतर श्रीमती ताराबाई सप्रे यांनी पुन्हा मेननना दहा हजार मतांनी हरविले होते.

मेनन यांच्या जिंकण्यामुळे आणि हरण्यामुळ गाजलेला हा सुमारे ८–५८ लाखांचा मतदारसंघ. आता जनरल करिअप्पा उभे आहेत. पण गमतीची गोष्ट अशी की जनरल करिअप्पा हे या निवडणुकीतले फारसे जबरदस्त उमेदवार नाहीत. या मतदारसंघातून जनसंघाचे प्रा. मुकुंदराव आगासकर, नव्या कांग्रेसचे राजा कुलकर्णी, प्रजासमाजवाद्यांचे मनोहर कोतवाल, अपक्ष दत्ता सामंत आणि इतर आठ उमेदवार आहेत. त्यातलेच करिअप्पा एक. ही अनेकरंगी लढत आहे. त्यामुळे मेनन–कृपलानी, बर्वे–मेनन यांच्या लढाईसारखी बहारदार रंगत यावेळी येणार नाही. पण जनरल करिअप्पांची उमेदवारी, शिवसेना आणि जनसंघ यांच्या-

# आज चित्र....

## करिअप्पांच्या घोड्याने कच खाल्ली

## आगासकर-कुलकर्णी शेवटच्या रिंगणात....

तील मतभेद, कुलकर्णी, कोतवाल, सामत यांच्यासारख्या तीन मोठ्या कामगार नेत्यांचा संघर्ष आणि आगासकरांना निवडून देण्यासाठी इरेस पडलेले जनसंघ कार्यकर्ते यांच्यामुळे या निवडणुकीत जोपाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या जागेच्या वाटपाच्या प्रश्नावरूनही हा मतदारसंघ गाजला. ही जागा खरे म्हणजे जुन्या कॉंग्रेसची. ताराबाई सप्रे त्याच पक्षाच्या. शिवाय या मतदारसंघात येतात कुर्ला, चेंबूर, घाटकोपर, मुलुंड, ठाणे आणि कल्याण हे सहा विधानसभा मतदारसंघ. त्यापैकी मुलुंड आणि कुर्ला येथून जुन्या कॉंग्रेसचे, ठाणे नव्या कॉंग्रेसचे, चेंबूरमधून जनसंघ, घाटकोपरमधून अपक्ष सामंत व कल्याणमधून शेतकरी कामकरी पक्षाचे असे उमेदवार निवडून आलेले. यावरून या मतदारसंघाची रचना किती विचित्र आहे हे ध्यानी येईल. ठाणे जिल्ह्याचा बराचसा ग्रामीण भाग यात जोडल्यामुळे ग्रामीण आणि शहरी मतदारांचे मिश्रणही यात झाले आहे.

प्रा. आगासकरांना जनसंघाने अगदी सुरुवातीपासून या मतदारसंघासाठी नर्स केले. १९६२ मध्ये ते ठाण्यातून विधानसभेसाठी उभे राहिले. पण पडले. १९६७ मध्ये यांना १·७१ लाख, मेननना १·५८ लाख मते पडली तर श्री. आगासकरांनी ७९ हजार मते मिळविली. नंतरच्या पोटनिवडणुकीतही आगासकर उभे होते. पण सप्रेबाईंसाठी त्यांनी माघार घेतली.

त्यामुळे जनसंघाने साहजिकच आगासकरांसाठी या मतदारसंघाची मागणी



डॉ. मुकुंद सुंदर आगासकर
जनसंघ व्यवहारी पक्ष आहे, तो केवळ स्वप्ने बघत नाही...

केली. परंतु कुठल्यातरी रहस्यमय कारणासाठी शिवसेनेने जनसंघाला सतत विरोध केला. वास्तविक पाहता शिवसेना आणि जनसंघ एक झाले असते तर त्यांना मुंबईत कितीतरी करता आले असते. त्याप्रमाणे परळच्या विधानसभा पोटनिवडणुकीत शिवसेनेचे वामनराव महाडिक निवडून आले. महाडिकांना मते देताना ईशान्य मुंबईसाठी शिवसेना आपणास मदत करील अशी जनसंघाची अपेक्षा होती. तसा अलिखित करारही झाला होता म्हणे. पण नंतर कुठे माशी शिकली कुणास ठाऊक.

या मतदारसंघातून जनसंघाने उमेदवार उभा करू नये म्हणून शिवसेनेने जंग जंग पछाडले आणि शेवटी करिअप्पांना आणले. जनसंघाचा उमेदवार निवडून येईल असा हा मुंबईतील एकमेव मतदारसंघ. तेव्हा तिथे जनसंघाचा पराभव



जनरल करिअप्पा
हिशब चुकले...मासा अडकला...

झालाच पाहिजे अशा म्हणे शिवसेना प्रमुखांना त्यांच्या सरकार दरबारातील प्रेमळ मित्रांच्या सूचना होत्या. खरे खोटे कुणास ठाऊक. पण मग मध्य आणि दक्षिण-मध्य मुंबईतील आपल्या उमेदवाराला जनसंघ मतांची सहानुभूती गमावून ईशान्य मुंबईसाठी शिवसेनेने एवढा आटापिटा कशाला केला असता? या मतदारसंघासाठी सेनाप्रमुख जे राजकारण खेळले त्यामुळे बरेच शिवसैनिक नाराज झाले म्हणतात. मधु मेहता आणि बाळ ठाकरे यांनी जनरल करिअप्पा यांना निमंत्रण दिले. आणि वर्षभरापूर्वीच शिवसेनेला शिव्या देणारे पण आता निवडणुकीत उतरण्यासाठी उतावीळ झालेले ७२ वर्षांचे जनरलसाहेब, 'ऑफ्टर ऑल, दे आर गुड पेट्रियाटिक बॉईज' असे म्हणत घोड्यावर स्वार होऊन आले. लगोलग स्वतंत्र

आणि जुन्या काँग्रेसने त्यांना पाठिंबा जाहीर करून मुंबईपुरती आघाडी मोडून काढली. संयुक्त समाजवादी मात्र अलग राहिले. ते अजून श्री. आगासकरांनाच पाठिंबा देतात. आता हे मुंडावळा लावलेले निवृत्त सेनापती आणि 'सेल्फ मेड' सरसेनापती मते मागत हिंडत आहेत. निवडणूक आहे. एवढा मोठा सेनापती आपल्या दारी मत मागायला येतो आहे हे बघूनही लोक गहिवरतात. ते कदाचित पटकन मतही देऊन टाकायचे. लोकांचे काय सांगणार !

या साडेआठ लाखावरील मतदार संघामध्ये अर्थातच बहुसंख्या आहे चार लाखावरील महाराष्ट्रीयांची. उरलेल्यात गुजराती आहेत. ७७,०००, दक्षिण भारतीय आहेत ७६,०००, उत्तर प्रदेशी ५६,०००, मुस्लीम ६३,०००, ख्रिश्चन्स् ३२,००० आणि सिंधी २३,००० .

## कठीण परिस्थिती

करिअप्पांना उभे करताना या भागातील दक्षिण भारतीयांची आणि ख्रिश्चनांची मते मिळतील असा हिशेब केला जात होता. दोन वर्षापूर्वीच शिवसेनेमुळे आमचे मुंबईतील जीवन धोक्यात आले आहे' अशा तक्रारी करणारे दक्षिण भारतीय करिअप्पांना मते देतील अशी कल्पना करणे कठीण आहे. करिअप्पा आहेत म्हैसूर राज्यातील कूर्ग या लष्करी जमातीचे. दक्षिण भारतीय असे त्यांच्यात काही नाही. या भागात द्रविड मुन्नेत्र कळघमच्या ज्या दोन तीन शाखा आहेत त्यांनी तर काँग्रेसच्या राजा कुलकर्णीसाठीच कार्य सुरू केले आहे

आणि महाराष्ट्रीयांची मते करिअप्पांना मिळणार ? करिअप्पा शिवसेनेच्या पाठिंब्यावर उभे न राहते तर 'असा माणूस लोकसभेत हवा' म्हणून अनेकांनी त्यांना मते दिली असती. पण केवळ शिवसेनेच्या विटाळामुळे अनेकांसाठी करिअप्पा आता अस्पृश्य ठरले आहेत. खुद्द शिवसेनेतही करिअप्पांच्या उमेदवारीबाबतीत कमी असंतोष आहे असे म्हणता येणार नाही. आठ–दहा शिवसैनिकांसाठी खाजगीत बोलले तर कुणालाही हे कळून चुकेल.

शिवसेनेतली मुलं सगळी भाबडी. कशावरही चटकन विश्वास ठेवणारी. बाळासाहेबांवर प्रेम बसलं म्हणून त्यांच्यासाठी जान कुर्बान करणारी. पण आता ती गोंधळलेली आहेत. 'बाळासाहेब सकाळी एक सांगतात, संध्याकाळी कोणीतरी येऊन सांगतो, छे, छे – असं नाही तसं – दुसरे दिवशी आणखी कुणी येऊन भलतंच काही सांगतो. मग करायचं तरी काय ? आणि करून उभं केलं तर कुणाला ? बाळासाहेबांनी स्वतःतरी उभं रहायचं. जान दिली असती त्यांना निवडून आणण्यासाठी ! पण आता आणला कुठला कोण–' हे एका कट्टर शिवसैनिकाचे उद्गार.

या परिस्थितीत जनरलसाहेबांची परिस्थिती फारशी भक्कम राहिलेली नाही. त्यात भर पडली आहे. त्यांच्या मतांची. जनरलसाहेब स्पष्टवक्ते आहेत. ते आपली मते कधीच लपवून ठेवीत नाहीत. त्यासाठीच त्यांना रिटायर व्हावे लागले. प्रौढ

मतदानाच्या अधिकाराबद्दलचा त्यांचा विरोध, राष्ट्रपती व सैनिकी राजवटीला त्यांचा पाठिंबा, त्यांचा अण्वस्त्र विरोध, पाकीस्तानसंबंधी मिळमिळीत धोरण पत्करण्याचा त्यांचा पुरस्कार – हे सारे जगजाहीर आहे.

एवढे असूनही अनेकांनी त्यांना मते दिली असती. जनरल करीअप्पा भारताचे पहिले भारतीय सरसेनापती. ब्रिटीश सैन्यातही ते सीनिअर-मोस्ट हिंदी अधिकारी होते आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल ब्रिटीशांनाही आदर होता. सेवानिवृत्त झाल्यानंतर घरी स्वस्थ न बसता जनरल करिअप्पा सतत कार्यमग्न राहिले. ते स्वतः खिलाडू वृत्तीचे आहेत. अनेक खेळांमध्ये त्यांना गती आहे. त्यामुळे त्याक्षेत्रात त्यांचे चांगले संबंध आहेत. लष्करातील निवृत्त झालेल्या सैनिकांसाठी त्यांनी अनेक वेळ आवाज उठविला आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी प्रचार करण्याकरता अखिल भारतातून सुमारे तीनशे सेवा-निवृत्त लष्करी माणसे आलेली आहेत.

एखाद्या लष्करी मोहिमेप्रमाणे त्यांचा प्रचाराचा शिस्तबद्ध कार्यक्रम आहे. सकाळी सातपासून ते प्रचार मोहिमेला सुरुवात करतात. पायी हिंडतात. मुलांना खाऊ वाटतात. आणि हिंदीत भाषणे करतात.

परंतु ही केवळ दुहेरी लढाई नाही. तसे असते तर जनरलसाहेबांना चांगले चान्सेस् होते पण इथे उजव्या बाजूच्या आणि डाव्या बाजूच्या दोन्ही शक्ती विभागल्या गेल्या आहेत. शिवसेनेच्या नावामुळे नाहीतरी त्यांच्या प्रतिमेवर थोडा डाग लागला आहे. आणि शिवसेनेची मतें म्हणजे कोणती मते ? हे अजून नक्की झालेले नाही.

एक मात्र अगदी शंभर टक्के पक्के आहे. परवा परवापर्यंत शिवसेनेच्या नावाने शंख करणारे मुंबईतील तमाम गुजराती मतदार शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी मतदान केंद्रासमोर लांब लांब रांगा लावतील !

जनरल करिअप्पा यांनी १९१९ पासून १९५३ पर्यंत भारतीय लष्करात अनेक मानाची पदे भूषविली आहेत. १९२३ पासून १९३० पर्यंत भारताच्या वायव्य सरहद्दीवर मेसोपोटेमियात आणि १९४० नंतर दुसऱ्या महायुद्धात मध्य-पूर्वेत, भारताच्या पूर्व सरहद्दीवर व आग्नेय आशियात त्यांनी अनेक लढायांचे नेतृत्व केले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४७ साली त्यांना प्रथम पूर्व विभागाचे सेनापती नेमण्यात आले. पाकीस्तानने काश्मीरवर आक्रमण केल्यावर ते १९४७ च्या जानेवारीत पश्चिमविभागाचे सेनाप्रमुख झाले. त्यांच्याच अधिपत्याखाली भारतीय सेनेने काश्मीरात पाकीस्तानी आक्रमकांना पाणी पाजले. यानंतर १९४९ साली भारताचे सरसेनानी म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली.

१९५३ साली ते सैन्यातून निवृत्त झाल्यावर त्यांची भारताचे ऑस्ट्रेलियातील राजदूत म्हणून नेमणूक झाली. १९५६ साली ते निवृत्त झाले.

नखशिखांत पाश्चात्य धर्तीचा पोशाख करणारे जनरल करिअप्पा दिसण्यात

आणि वागण्यातही पाश्चात्य वाटतात. त्यांचे इंग्रजी उच्चार थेट राणीच्या भाषेतले. इतकेच नव्हे तर हिंदीही त्याच प्रकारचे. फौजी हिंदी. कूर्गमधल्या गर्भश्रीमंत घराण्यात जन्मलेले. सँडहर्स्टच्या लष्करी शाळेत जाणारे पहिले भारतीय. पहिले-पणाचे अनेक मान त्यांना मिळाले आहेत. निवडून आले तर – हा तर मोठा आहे लोकसभा सदस्य झालेले पहिले माजी सरसेनापती ते होतील.

भारतीय घटनेचे रक्षण करण्यासाठी आपण लोकसभेत जात आहोत असे त्यांचे म्हणणे. (राष्ट्रपती आणि सैनिकी राजवट देशात आणावी अशी सूचना त्यांनी केली होती ही गोष्ट अलाहिदा) मतदारांना आपण कोणतेही फालतू आश्वासन देणार नाही असे म्हणतात. सेवानिवृत्त लष्करी सैनिकांचे प्रश्न ते लोकसभेत मांडणार आहेत. त्यांच्या प्रचाराच्या एका पोस्टरवर मात्र आपण बेहद्द खूष. भारताच्या संरक्षण व्यवस्थेची स्थिती या मथळ्याखाली आपले संरक्षण मंत्री जगजीवनराम यांचे कार्टून आहे (अर्थात बाळ ठाकरे यांचे.) भेदरलले आपले जगजीवनरामजी डोळे तिरळे करीत, थरथरत्या हाताने बंदूक उलटी धरीत केंकाटत आहेत, 'कोन हाय ? कोन हाय ! –'(हू इज दॅट–हू इज दॅट.) एकदम मजा.

## शिस्तबद्ध प्रचार

निवडून येणाचा आत्मविश्वास सारेच दाखवितात. पण आगासकरांविषयी जो आत्मविश्वास जनसंघकार्यकर्ते दाखवितात तो वेगळाच. आगासकरांचा प्रचार १९६७ च्या निवडणुकीपासूनच पद्धतशीरपणे सुरू झाला होता. तेव्हा त्यांना मेनन-बर्व्यांसारखे जबरदस्त उमेदवार लढत असतानाही केवळ पक्षाची म्हणून ७९ हजार मते पडली. जनसंघाला सहानुभूती असणारी कितीतरी मते मेनन विरोधात बर्व्यांना पडली होती. त्यावेळसारखी सहानुभूतीदारांची मते आगासकरांना पडणार असे कार्यकर्त्यांचे म्हणणे.

'मतदारसंघाची संख्या ६·४४ लाखावरून ८·५८ लाखावर गेली. त्याप्रमाणात जनसंघाच्या खास मतदारांचीही संख्या ७९ हजारावरून सुमारे १-२ लाखावर गेली आहे ही आमची पक्की मते. शिवाय मागच्यावेळी बर्व्यांकडे गेलेले आमचे हजारो सहानुभूतीदार. आम्ही सुमारे ५० हजार नवीन मतदार नोंदविले आहेत. त्यातले वीस–पंचवीस हजार तर आमचे असतील ? अशी आमची मते दीड लाखाच्या वर जातात ही जवळजवळ खात्रीची मते. पाच–सहा लाखाचे जरी मतदान झाले तरी उरलेले चार लाख इतर सर्व उमेदवारात वाटले जाणार. आता बोला ! –' एक जनसंघ कार्यकर्ता.

आणि जनसंघाच्या प्रचाराविषयी सांगायलाच नको. निष्ठावान कार्यकर्त्यांची जोरदार शिस्तबद्ध असलेला एकमेव पक्ष म्हणून त्यांचे शत्रू कम्युनिस्ट देखील जनसंघाची प्रशंसा करतात. सर्वात जास्त नवे मतदार बहुतकरून जनसंघीयांनीच नोंदविले असले पाहिजेत. त्यांचा घरोघर प्रचार तर लोकसभा विसर्जित झाल्या-पासूनच सुरू झाला आहे. प्रत्येक घरी दोनदा कार्यकर्ते पोचले पाहिजेत हे जन-

संघाच्या प्रचाराचे सूत्र आहे.

डॉ. मुकुंद सुंदर आगासकर (५०) हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिस्तीतून वर आलेले. अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून ते शाळा-कॉलेजात गाजले. पहिला वर्ग त्यांनी कधी सोडला नाही. मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड सोशालॉजीमधून त्यांनी १९४४ साली इतिहास व समाजशास्त्र यांत एम्. ए. केले. तेव्हापासून ते मुंबईच्याच रुईया महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. १९६५ साली त्यांनी महादजी शिंदे या विषयावर प्रबंध लिहून मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट मिळविली. जनसंघाच्या कच्छ सत्याग्रहात भाग घेऊन त्यांनी तुरुंगवासही भोगला. निवडणूक प्रचाराच्या धकाधकीत त्यांचे कॉलेज सुटलेले नाही. परीक्षा जवळ आल्याने त्यांना रजा मिळत नाही. त्यामुळे सकाळी १० ते दुपारी २ त्यांना कॉलेजला जावे लागते.

डॉ. आगासकरांची भाषणे अभ्यासपूर्ण असतात. जनसंघाचे राष्ट्रीय आणि परराष्ट्रीय धोरण ते आपल्या भाषणातून उत्तम रीतीने समजावून सांगतात. त्यांच्या वक्तृत्वापेक्षा विद्वत्तेचाच श्रोत्यांच्या मनावर अधिक प्रभाव पडतो. प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रम त्यांचा आवडीचा. निवडणुकीच्या काळात प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमांना तोंड देणे उमेदवारांना अवघड असते असे म्हणतात. पण डॉ. आगासकर यांचे प्रश्नोत्तराचे कार्यक्रम पाहून उलट मत होते.

कार्यकर्त्यांचा दारोदारीचा प्रचार, स्वतः डॉ. आगासकरांच्या पदयात्रा, दिवसातून होणाऱ्या डझनावारी सभा प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम यामुळे जनसंघाचा आत्मविश्वास दुणावला आहे. शिवाय प्रचाराचा सर्व भर आहे पक्षावर. पक्षाला मते द्या. दीपकावर फुली मारा. स्वतः आगासकरही आपल्या भाषणांमध्ये पक्ष धोरणांविषयीच बोलतात. त्यामुळे प्रभाव पडतो.

जनसंघाच्या जाहीरनाम्यातील आर्थिक धोरणांचे स्पष्टीकरणही चांगल्या रीतीने करतात. 'गरिबी विरुद्ध स्वदेशी श्रमयोजनेचा कार्यक्रम आणि विषमता नष्ट करण्यासाठी येथील साधने आणि गरजा यांच्यावर आधारित राबविले जाणारे नियोजन' अशा एका वाक्यात ते आपल्या पक्षाचा आर्थिक कार्यक्रम मांडतात.

'जनसंघाएवढा पुरोगामी कामगार दृष्टिकोण कोणाजवळही नाही. इंडिकेट जवळही नाही आणि कम्युनिस्टांजवळही नाही–' असे त्यांचे म्हणणे आहे. ते स्पष्ट करताना ते म्हणतात की आपल्या पक्षाचा सरकारी आणि खाजगी भांडवलशाहीला विरोध आहे. प्रत्यक्ष कामगाराला उद्योगधंद्यात भागीदारी देऊन व्यवस्थापनात प्रतिनिधित्व दिले पाहिजे आणि नफ्यातही सहभागी केले पाहिजे असे आमचे सूत्र आहे.

जनसंघ हा व्यवहारी पक्ष आहे. तो केवळ स्वप्ने बघत नाही. या नाही तर पुढच्या निवडणुकीत सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास बाळगून आहे आणि त्यासाठी

कार्य चालू आहे. सत्तेवर आल्यानंतर आपली धोरणे प्रभावीपणे कशी अंमलात आणायची हे जनसंघच दाखवून देईल–असे डॉ. आगासकरांचे म्हणणे.

## फुटलेली डावी आघाडी

आगासकर आणि करिअप्पा हे उजव्या बाजूचे 'राष्ट्रवादी' पक्षांचे उमेदवार. डावी बाजू विभागली गेली आहे तिघांमध्ये. नवकाँग्रेसचे राजा कुलकर्णी, प्र. स. प. चे मनोहर कोतवाल आणि अपक्ष दत्ता सामंत. डावी मते तीन भागात फुटणार हे नक्की. कारण तिघेही उमेदवार आपापल्या परीने जबरदस्त. हे डाव्यांच्या दृष्टीने दुर्दैवाचे आणि उजव्यांच्या विशेषत: आगासकरांच्या दृष्टिने सुदैवाचे.

बावन्न वर्षाचे राजा कुलकर्णी हेदेखील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून एम. ए. झालेले, विद्यार्थी चळवळीतून काम केलेले आणि साने गुरुजींचा वारसा सांगणारे. बेचाळीसच्या लढ्यात तुरुंगात गेलेले आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कामगार चळवळीस वाहून घेतलेले.

त्यांचा राजकीय प्रवासदेखील वळणावळणांचा आहे. सुरुवातीस काँग्रेसमधील जहाल साम्यवादी गटात, नंतर भारतीय सोशालिस्ट पार्टीत प्रयाण. तेथून प्र. स. प. मध्ये आणि १९५७ मध्ये काँग्रेसमध्ये पुनरागमन असा. सध्या उद्योगातील कामगारांचे नेतृत्व ते करतात. इंटकचे ते महत्त्वाचे सदस्य.

श्री. कोतवाल आणि डॉ. सामंत जरी वेगळे दावे करीत असले तरी या मतदारसंघातील बहुसंख्य कामगार आपल्याच बाजूचे आहेत असे श्री. कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. गेल्या पाच सात वर्षात या भागातील कारखान्यांचे आणि कामगार वर्गाचे प्रमाण खप वाढले आहे हे खरे आहे. पण हे कामगार कोणाला मत देणार हा खरा प्रश्न आहे.

नव्या काँग्रेसची स्वत:ची अशी किती मते या मतदार संघात आहेत? केवळ ठाण्याची विधानसभा जागा काँग्रेसकडे आहे आणि १९६७ नंतर तर ठाणे शिवसेना आणि जनसंघाने काबीज केले आहे. बव्यांना आणि सप्रे यांना पडलेली सर्व मते काही नव्या काँग्रेसची नव्हती. अविभक्त काँग्रेस, शिवसेना आणि सर्व कम्युनिस्ट विरोधी मते एकत्र येऊन ती त्यांना पडली. त्यामुळे १९६७ किंवा त्यानंतरचा पोटनिवडणुकीच्या मतदानाच्या आधारावर कुलकर्ण्यांचे चान्सेस अजमावणे अगदीच गैरलागू ठरेल.

त्यांचा सगळा भर आहे कामगारांवर, मुस्लीम मतांवर आणि इंदिरा गांधी निर्माण केलेल्या नव्या हवेवर. उजवी मते आगासकर आणि करीअप्पा यांच्यात फुटतील आणि डाव्या बाजूला मोठ्या प्रमाणावर मते खेचणारा मीच एकटा. त्यामुळे मलाच सगळ्यात जास्त संधी आहे असे त्यांचे म्हणणे. शिवाय द्र. मु. क. च्या प्रयत्नांमुळे दक्षिण भारतीय मतांमधील मोठा वाटा आपल्याला मिळेल असाही त्यांचा विश्वास.

प्र. स. प. चे मनोहर कोतवाल (५५) यांचाही भर कामगार आणि मध्यम-

वर्गावर. कामगार चळवळीत श्री. कोतवाल यांना मताचे स्थान आहे हे निश्चित. गोदी कामगारांना त्यांनी संघटित करून अनेक यशस्वी लढे दिले आणि बेकारी भत्यासारख्या सवलती भारतात प्रथमच त्यांना मिळवून दिल्या. ट्रान्स्पोर्ट ऑपरेटर्स-नाही त्यांनी नुकतेच मोठ्या प्रमाणावर संघटित केले आहे. या मतदार संघात सुमारे पन्नास हजारांच्या वर या दोन्ही प्रकारच्या कामगारांची मते आहेत.

## कोतवालांचे आडाखे

श्री. कोतवालही स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचेच विद्यार्थी. विद्यार्थी दशेपासून स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भाग घेतलेला आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतःला कामगार चळवळीत झोकून दिलेले एक जबाबदार आणि दूरदृष्टी असलेला कामगार पुढारी म्हणून त्यांना ओळखले जाते. महाराष्ट्र – सरकार कर्मचाऱ्यांच्या गेल्या संपाच्या वेळी त्यांनी घेतलेली जबाबदार आणि समंजस भूमिका सर्वांनाच अवडली होती, त्यामुळे सरकारी नोकरही मोठ्या प्रमाणावर आपल्या बाजूचे आहेत असे त्यांचे म्हणणे. कामगार चळवळीपासून राजकारण दूर ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

कामगारांची सर्वात जास्त मते आपल्यालाच मिळतील असे सांगताना कोतवाल म्हणतात. श्री. कुलकर्णी एक नंबरचे संपफोडे म्हणून साऱ्या कामगार वर्गात कुप्रसिद्ध आहेत. इंजिनियरिंग उद्योगातील कामगार चळवळी त्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ते कामगार आमच्याच बाजूचे आहेत. पेट्रोलियम–केमिकल्स-मध्ये आपण ज्या संघटना बांधल्याचा दावा कुलकर्णी करतात त्या खरे म्हणजे मालकांच्या संघटना आहेत–वगैरे.

श्री. कोतवाल एवढा आत्मविश्वास दाखवित असले तरी ते ज्या पक्षाच्या तिकीटावर उभे आहेत त्या प्रजा समाजवाद्यांना या भागात फारसे महत्त्व कुणीच देत नाही. त्यांच्यासाठी त्यांचे कामगार जीव तोडून जरी काम करीत असले तरी श्री. कुलकर्णींच्या पक्षासारखी प्रचार संघटना आणि पैसा त्यांच्याकडे नाही. त्यामुळे वैयक्तिक दृष्ट्या ते कितीही योग्य उमेदवार असले तरी ते किती मतदारांपर्यंत पोच् शकतात हा प्रश्न आहे. श्री. कुलकर्णी यांचे 'कामगार–विरोधी करिअर' सर्वांना माहित असल्याने सर्व डावी मते आपल्यालाच मिळतील या त्यांच्या बोलण्यामध्ये तथ्य आहे. नाही असे नाही. पण प्रचाराचा एकुण जोर पाहता जरा शंका वाटते. परंतु शेवटी निवडणूक ती निवडणूकच. काय होईल कुणी सांगावे. शिवाय कल्याणच्या आसपास जोर असलेला शे. का. प. आणि कम्युनिस्टही त्यांना पाठिंबा देत आहेत. मेननना गेलेली सर्व डावी मते आपल्यालाच मिळतील असे त्याना वाटते.

परंतु हाच दावा अपक्ष उमेदवार डॉ. दत्ता सामत देखील करतात. काही डावे कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि शहरातील शे. का. प. कार्यकर्ते त्यांच्यासाठीही काम करताहेत.

एकोणचाळीस वर्षाचे डॉ. सामंत गृहनिर्माण मंडळाच्या भाडेकरूंमध्ये, झोपड-

पट्टयांमध्ये आणि दगडीखाण कामगारांमध्ये चांगलेच लोकप्रिय आहे. १९६७ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर ते निवडून आले घाटकोपरमधुन स्वतःच्या या लोकप्रियतेवर ! त्यामुळे याही निवडणुकीत ते पन्नास ते साठ हजार मते सहजच खातील. पण त्याचा परिणाम श्री. कोतवाल किंवा कुलकर्णी यांची मते कमी करण्यातच होईल. डॉ. सामंत स्वतः जरी आत्मविश्वास दाखवीत असले तरी ते जिंकणारे उमेदवार आहेत असे कोणी फारसे मानीत नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिरंजीव श्री. भैय्यासाहेब आंबेडकर हेही या मतदारसंघातून रिपब्लिकन पार्टीच्या खोब्रागडे गटातर्फे उभे आहेत. काँग्रेसची मते खाण्यात ते सामंत आणि कोतवाल यांना हातभारच लावतील. झोपडपट्टयांमधून विखुरलेल्या सुमारे वीस ते तीस हजार नवबौद्धांची मते ते मिळवितील असा अदाज आहे. झोपडपट्टयांमधील सर्व मते कुलकर्णी, कोतवाल, सामंत आणि आंबेडकर यांच्यात विभागली जाणार आहेत. एका दमात सर्व झोपडपट्टया एकाच निशाणीवर शिक्के मारतील हे यावेळी जरा अवघडच आहे. मेननना मात्र झोपडपट्टयातील झाडून सर्व मते मिळाली होती.

बाकीचे उमेदवार नगण्य आहेत.

डाव्या मतांची ही अशी सर्व दूर होणारी विभागणी उजव्यांना सोयीची आहे. जनसंघाच्या हिशेबाप्रमाणे त्यांच्या पक्षाची पक्की सव्वा लाख मते, त्यांनी नव्याने नोंदविलेल्या मतदारांपैकी पन्नास टक्के म्हणजे वीस ते पंचवीस हजार मते, कम्युनिस्ट-निरोधी म्हणून बर्वे, सप्रे यांना पडलेली सहानुभूतीदारांची दहा-पंधरा हजार मते अशी एकूण दीड लाखाच्यावर मते त्यांची खात्रीची आहेत. हा हिशेब जर बरोबर असला तर आगासकरांना जिंकणारा घोडा म्हणून मानायला काहीच हरकत नाही.

आणखी एक मुद्दा आहे. शिवसेनेतील जुनी कुरबूर, जनसंघाशी केलेल्या भांडणात नव्याने निर्माण झालेली ओढाताण आणि करिअप्पांच्या उमेदवारीने निर्माण झालेला असंतोष यामुळे सेनेतील तीस ते चाळीस हजार मतदारांचा मोठा गट एक तर मतदान तरी करणार नाही किंवा करिअप्पांना पाडण्यासाठी आगासकरांना तरी मते देईल अशी जनसंघाची अपेक्षा आहे. ही अपेक्षा अगदीच स्वप्नाळू आहे असे कुणालाच म्हणता येणार नाही. अगदी विरोधीपक्षांच्या दृष्टीकोनातून जरी पाहिले तरी आगासकरांच्या या संभाव्य विजयाकडे कोणाला डोळेझाक करता येणार नाही.

हां ! मात्र एक आहे ! काही नव्या-जुन्या अफवा आहेत. ऐनवेळी म्हणे शिवसेना नव्या काँग्रेसलाच मते देणार. तो म्हणे चव्हाण-नाईकांचा डाव आहे, आगासकरांना पाडण्यासाठी आता ऐनवेळी एवढी टोपी फिरविण्याची ताकद आणि शिस्त शिवसेनेत आहे की नाही याचा कोण विचार करतो ? शेवटी अफवा त्या अफवाच.

□ □ □

# जनसंघाची सव्वा लाखाची स्ट्रॅटेजी !

लेखक : एक तरुण राज्यशास्त्र विद्यार्थी

काही शहराचे भाग्य वेगळे असते. ग्रह उच्चीत असतात.

नाहीतर काशीला तीर्थ क्षेत्राचा व दिल्लीला राजधानीचा मान का लाभला असता ?

५० सालापासून उत्तर मुंबई वा इशान्य मुंबईला आंतरराष्ट्रीय किर्तीचा लोकसभा मतदार संघ म्हणून मान लाभला आहे.

५२ च्या काँग्रेसी महापूरात समाजवादी पक्षाच्या कमलादेवी चटोपाध्याय वाहून गेल्या.

खरी चकमक सुरू झाली ५७ साली. संयुक्त महाराष्ट्राच्या झंझावातात काँग्रेसला सुरक्षित असा मतदार संघ फक्त स. का. पाटलांचा दक्षिण मुंबई होता. आज जसे मध्य मुंबईच्या दोन जागा महाराष्ट्रीय मतांमुळे शिवसेनेच्या म्हणून ओळखल्या जातात, तशा त्याकाळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या ओळखल्या जात. निदान चवथी जागा तरी जाऊ नये म्हणून स. का. पाटलांनी कृष्ण मेनन यांना बोलावून उभे केले.

मध्य मुंबईच्या डांगे की दोंदे वादात एस. एम्. च्या कोपामुळे ती जागा डांगे यांना मिळाली. तेव्हा स्वार्थत्याग (?) म्हणून कम्युनिस्टांची उत्तर मुंबईची जागा प्रजासमाजवाद्यांना दिली. श्री. पीटर अल्वारिस जरी समितीचे उमेदवार असले तरी प्रत्यक्षात कम्युनिस्टांचे मेननप्रेम उफाळून आले. मराठी कम्युनिस्ट तटस्थ

राहिले, तर अमराठी कम्युनिस्टांनी बंडखोरी करून व ब्लिट्झचे करंजिया, डॉ. बालिगा, के. ए. अब्बास, अॅड. चारी, बॅ. रजनी पटेल आदि सहप्रवाशांनी पुढाकार घेऊन मेननसाठी काम केले. राजकपूर, दिलीपकुमार, बलराज सहानी, निरुपा रॉय-सारख्या नटनट्या प्रचारात उतरल्या. (आज वैजयंतीमाला शिवसेनेच्या व्यास-पीठावर आल्यावर कम्युनिस्टांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या व ' वैजू नाचविली अशी ओरड त्यांनी सुरू केली.)

मराठी व अमराठी लोकात असलेले अंतर, त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे निर्माण झालेले संशयाचे वातावरण, दक्षिणी मेननमुळे दाक्षिणात्य लोकांची मिळा-लेली मते, यामुळे मेनन जरी सहजरित्या निवडून आले तरी अल्वारिस यांनी झुंज चांगली दिली.

१९६२ च्या निवडणुकीसाठी आचार्य कृपलानी ऑगस्ट ६१ ला मेननविरुद्ध आखाड्यात उतरल्यामुळे या मतदारसंघाकडे जगाचे लक्ष वेधले. एका अर्थी राज-कीय ध्रुवीकरणाला सुरुवात झाली. स्वतंत्र, प्रजासमाजवादी, जनसंघ एकिकडे तर कम्युनिस्टांचा काँग्रेसच्या मेननला पाठिंबा. शिवाय सहप्रवाशांची सिटिझन कमिटी ब्लिटझसह मेनन सेवेस हजर होती. आश्चर्य म्हणजे ५७ साली मेननवर कडाडून हल्ला करणाऱ्या ' मराठा 'कार अत्र्यांनी मेननला पाठिंबा दिला, तर दादर मत-दारसंघात अत्र्यांना पाठिंबा देणाऱ्या बाळ ठाकरेंच्या ' मार्मिक 'ने कृपलानी यांना पाठिंबा दिला.

पं. नेहरूसमोर स. का. पाटील जरी विरोध करू शकले नाहीत तरी पाटील शिष्य शांतिलाल शहांनी छुपी बंडखोरी केली व रामकृष्ण बजाज यांनी उघडपणे बंडखोरी केली.

सदोबा जरी असे डावपेच खेळत असले तरी मेननसाठी तोफ डागली पं. नेहरूंनी. विरोधी पक्षावर टीकेचा व रागाचा वर्षाव करताना ' जहन्नमें जाव ' हे प्रसिद्ध (कटू) वाक्य शिवाजीपार्कवर त्यांच्या तोंडून निघाले.

नेहरू आलेले पाहता, ' राष्ट्रापेक्षा नेहरू मोठे ' मानणारे यशवंतराव मेननच्या बाजूनी प्रचारात उतरले. दिलीपकुमार, राजकपूर, देव आनंद, बलराज सहानी, नर्गिस असे चित्रपट तारे रस्त्यावर मतांची भीक मागत चमकू लागले.

या निवडणुकीचे आगळे वैशिष्ठ्य म्हणजे ' टाइम्स ऑफ इंडिया ' व ' इंडियन एक्सप्रेस ' ही पत्रे सरकारभीती बाजूला ठेवून मेननविरोधी उभी राहिली. करंट तर मेननविरोधी होताच.

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे आकर्षक पोस्टर परंपरा तेथून सुरू झाली. ' चीनी तीर अंगोमें, सेना लढती कांगोमे ' या जनसंघी आकर्षक पोस्टरला ' Nehru is an architect, Menon is a builder ' हे उत्तर मिळाले. मेनन हे कम्युनिस्ट-हंगेरी प्रकरण, या टीकेसमोर, साम्राजवाद्यांना मेननची काश्मीर वकीली आवडत नाही,

म्हणून कृपलानी उभे, हा मुद्दा नाचविला गेला. गोवा मुक्तता ही मेनन यांचा शिरेपच ! (मेननची जागा सुरक्षित करण्यासाठी गोवामुक्ती झाली असा काहींचा तर्क आहे )

परिणाम : दाक्षिणात्य, कम्युनिस्ट, मराठी, कोळी व काँग्रेसी मतांमुळे मेनन दणदणीत मताने विजयी.

पुढे वाढत्या लोकसंख्येचा फायदा घेऊन उत्तर मुंबईचे दोन भाग केले. पश्चिम मुंबई हा पाटील बी. पी. सी. सी. चा सुरक्षित मतदार संघ उत्तर पूर्व मुंबई या नावाने बाहेर काढून उरलेल्या उत्तर पूर्वेतील दाक्षिणात्य मतांना शह म्हणून महाराष्ट्रातील ठाणे–कल्याण हा मराठी विभाग जोडण्यात आला.

६७ साली परिस्थितीत खूपच राजकीय बदल झाला होता. चीनी युद्धामुळे मेनन सत्तेवरून हाकलले गेल्याने prestige गेले होते. त्यात त्यांचे 'कुंकवाचे धनी' पंडितजी गेले. काँग्रेसमध्ये सिंडिकेटचे राज्य होते त्यात पाटील–चव्हाण मिलाफ.

मग पाटलांनी स्थानिक उमेदवार या तत्त्वाखाली मेनन यांना टिकिट नाकारून कै. स. गो. बर्वे व शांतीलाल शहा (६२ च्या बंडखोरीचे बक्षिस !) यांना उभे केले. वर्किंग कमिटीत सिंडिकेटी सासुरवासामुळे इंदिराजींना 'गुंगी गुडीया'ची भूमिका वटवावी लागली.

लगेच ब्लिट्झने बोंबाबोंब करून Voter Counsil च्या नावाने कृष्ण मेनन व त्यांचे सहउमेदवार म्हणून, साडेतीन हजार पगार पुरत नाही, म्हणून न्यायमूर्तीपदाचा राजीनामा देणारे समाजवादी (!) व आजचे इंडिकेटचे उमेदवार असलेले श्री. गोखले यांना उभे केले. संपूर्ण महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून उभे राहणार नाही, असे उमटपणे बजावून आंतरराष्ट्रीय राजकारणावर जोर देणाऱ्या मेननना सीमालढावादी समितीने पाठिंबा देऊन आपण फर्नांडिस–डांगे–अत्रे व ते दोघे (मेनन–गोखले) असे पंचायतन पुरे केले.

याचवेळी मराठी माणसांची एक नवी शक्ती मुंबईत उदयास येत होती. ती म्हणजे शिवसेना.

मराठी माणसांना नोकऱ्या मिळण्यास येत असलेल्या अडचणी, त्याला एक कारण असलेले दाक्षिणात्यांचे प्रांतप्रेम व पक्षपाती धोरण हे 'मार्मिक'द्वारे स्पष्ट करून श्री. बाळ ठाकरे यांनी मराठी माणसांचे लक्ष वेधून घेतले होते.

मुख्य म्हणजे बहुसंख्य Trade Unions कम्युनिस्टांच्या हाताखाली होत्या व त्यांचे चिटणीस दाक्षिणात्य. ते याबाबत आवाज उठवायास तयार नव्हते.

परप्रांतीयांच्या वाढत्या लोंढ्यामुळे निर्माण होणाऱ्या झोपडपट्ट्या, त्यातून उद्भवणारे गुन्हेगारीचे प्रश्न, दाक्षिणात्य फेरीवाल्यांची उर्मट व असह्य दादागिरी असे दाक्षिणात्यांचे दोष दाखविताना अत्र्यांचे संस्कार असलेल्या फटकळ प्रबोधनकारपुत्रांनी 'लुंगीवाले', 'यंडुगुंडू' असा भडक व आक्रमक प्रचार केला तर

नवल काय ? बाळ ठाकरेंच्या मागे मराठी तरुण गोळा झाला. या तरुण मराठी मुलांच्या उमेट फेरीवाल्यांबरोबर मारामाऱ्या झाल्या.

लगेच इंग्रजी वृत्तपत्रांच्या दाक्षिणात्य संपादकांनी, कम्युनिस्टांनी व दाक्षिणात्य नेत्यांनी शिवसेनाविरोधी सूर काढला. 'संकुचित', 'राष्ट्रघातकी' म्हणून या राष्ट्रभक्तांनी (?) आरोप लादला. यामुळे साहजिकच शिवसेनेचा दाक्षिणात्य विरोध कडवट झाला. अशा परिस्थितीत ६२ साली मेननना विरोध करणारे ठाकरे ६७ साली त्यांना पाठिंबा देणे शक्य नव्हते.

याचा फायदा स. का. पाटलांनी घेतला. जनसंघकार्य वाढविण्यासाठी निवडणूक ही एक संधी म्हणून प्रा. आगासकर उभे राहिले असता, शिवसेनेने कर्तव्यदक्ष आय. सी. एस. बर्वे यांना पाठिंबा दिला.

## आंतरराष्ट्रीय सामना

आधीच पाटील यांनी मेनन यांना तिकिट नाकारून मोहोळ उठविले होते. चेंबूरचे आचार्य, महाडेश्वर, वरळीकर आदी अनेक कॉंग्रेसजनांनी राजीनामे देऊन मेननसाठी काम सुरू केले होते. त्यात शिवसेनेचा पाठिंबा बर्वे यांना मिळाल्यावर साऱ्या दाक्षिणात्य लोकांनी मेननमागे आपली ताकद उभी केली. मग ही तत्त्व-प्रणालीची लढत न होता मराठी बर्वे विरुद्ध साऊथ इंडियन मेनन असा सामना या सामन्याला म्हटले गेले मात्र आंतरराष्ट्रीय ! (असे म्हणतात आंतरराष्ट्रीय पैसा वाहत होता ! )

धारावी, विक्रोळी, भांडूप येथील दाक्षिणात्य झोपडपट्टी मतावर आघाडी घेणारे मेनन ठाणे–कल्याण विभागातील २२ हजाराची दरी भरून काढू शकले नाहीत. बर्व्यांपुढे मेनन २६ हजार मतांनी हरले.

या साठमारीत न डगमगता ८० हजार मते मिळविणारे जनसंघाचे आगासकर जसे लोकांच्या कौतुकाचे विषय ठरले तसे ते पुढील निवडणुकीचे भावी उमेदवार म्हणून निश्चित झाले.

निवडणुकीच्या दगदगीमुळे बर्वे यांचे दुर्दैवी निधन झाले. डॉ. आगासकरांनी परत अर्ज भरला असे कळता, नव्या आशेने मेनन रणांगणात उतरले. तुल्यबळ उमेदवार निवडणे हा पाटलांपुढे मोठा प्रश्न होता. पाटीलमान्य डॉ. नरवणे बाळ ठाकरेंना मान्य नव्हते. शंकरराव थोरात कोल्हापूरच्या पराभवाच्या धक्क्यामुळे उभे राहण्यास तयार नव्हते. अशा बिकट परिस्थितीत धूर्त पाटलांनी बर्वे यांच्या भगिनी सौ. ताराबाई सप्रे यांना उभे करून मेनन यांची पंचाईत केली. मुळात बाईविरुद्ध लढणे कठीण. बर्व्यांची बहिण या भावनात्मक प्रचारामुळे, शिवसेनेच्या ताकदीमुळे व केंद्रीय आदेशानुसार जनसंघाने ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्यामुळे, अज्ञात सौ. सप्रेबाईंनी मेनन यांचा पराभव केला. यामुळे मेनन हे भारतीय राज-कारणातून कायमचे उठले. पुढे कम्युनिस्ट आघाडीच्या जीवावर पश्चिम बंगालातून

निवडून आले. पण एक साधे खासदार म्हणून टिकले एवढेच.

निवडणुकीतील जनसंघ टीकेमुळे रान तापले होते. त्यात ठाणे पालिका निवडणुकीतील जागा वाटपात शिवसेना–जनसंघ समझोता मोडला (मूळ कारण नौपाडा वाटणी) यात मतभेदाचे बी पडले. ठाणे पालिकेतील गटबाजीमुळ या मतभेदाच्या वृक्षाला द्वेषाची फळे आली.

याच द्वेषामुळे हे दोन भगवे ध्वज मुंबई महापालिका निवडणुकीत परस्पराविरुद्ध लढले. हा कडवट द्वेष दोन कार्यकर्त्यांत शत्रुत्व निर्माण होण्याइतका वाढला. यातून भटवाडी (घाटकोपर), चेंबूर येथे संघस्थानावर हल्ले झाले. चेंबूर-माहूल भागात मारामाऱ्या झाल्या.

६९ च्या कॉंग्रेसच्या फाटाफुटीनंतर देशातील राजकारण बदलले. विभिन्न प्रवाह व पक्ष एकमेकात मिसळले.

कृष्णा देसायांच्या खुनानंतरच्या पोटनिवडणुकीत इंडिकेट, संसोपा, प्रसोपा आदी नऊ राजकीय पक्षांनी कम्युनिस्टांना पाठिंबा दिला. (इंडिकेट-संसोपा यांना अस्तित्व टिकविण्यासाठी शिवसेना पाडणे आवश्यक होते; प्रसोपा-शिवसेना हनीमून मोडला होता व शिवसेना-कम्युनिस्ट वैर उघड होते.)

यावेळी सिंडिकेट तटस्थ राहिली. परळमध्ये स्थान नसलेल्या स्वतंत्रांनी शिवसेनेला पाठिंबा दिला. (मधू मेहता फार काळापासून ठाकरे यांच्या मागे आहेत.) जनसंघाने पाठिंबा दिल्यामुळे शिवसेनेचे श्री. वामनराव महाडिक दोन तीन हजार जनसंघी मतावर परळच्या घनघोर निवडणूकीत विजयी झाले.

## दोन भगव्यांचे डावपेच

परळ विजयामुळें शिवसेनेपेक्षा जनसंघवाले जास्त बेहोष झाले. पुणे-सांगली येथे संयुक्त विजय सभा काय घेतल्या! शिवसेना-जनसंघ यती झाली नाही या ठाकरे यांच्या डोंबिविली येथील इशाऱ्याकडे जनसंघाने दुर्लक्ष केले.

त्यात बाळ ठाकरे – बलराज मधोक दयानंद जयंतीनिमित्त एकाच व्यासपीठावर आले. मधोकांनी तेथे बाळ ठाकरे यांना राष्ट्रीय नेता व शिवसेना यांना राष्ट्रवादी संघटना म्हणून गौरविले. ठाकरे यांनी मात्र राजकीय नेत्याला साजेसे भाषण केले.

बाळ ठाकरे यांचा फटकळ व आत्मकेंद्री स्वभाव, व 'एकचालकानुवर्ती' शिवसेना याच्याशी आपले जमेल की नाही याची सावधगिरी न बाळगता, राष्ट्रवादाच्या मंत्राने बाळासाहेबांना जिंकू या गाफिलपणात महाराष्ट्र प्रदेश जनसंघ अधिवेशनात, श्री. रामभाऊ म्हाळगींनी ठाकरे यांना निवडणूक समझोत्यासाठी भेटणार अशी घोषणा केली.

जनसंघाने सर्व पाने दाखविली, तर ठाकरे यांनी हुकमाची पाने हातात ठेवून 'जमले तर फक्त जनसंघाशी जमेल, सिंडिकेटशी नाही' ही घोषणा करून उतारी भलतीच केली.

१ जानेवारी १९७१ रामभाऊ म्हाळगी बाळ ठाकरे यांना भेटले. त्यात जनसंघाने इशान्य मुंबईची जागा मागितली. तेव्हा बाळ ठाकरे यांनी उरलेल्या चार लोकसभा जागेकरीता जर जनसंघ शिवसेनेला पाठींबा देत असेल तर ठाण्याची जागा जनसंघाला देऊ असे सांगितले.

पण जनसंघ तर बड्या आघाडीत अडकलेला. ठाकरे तर बड्या आघाडीत सामील होण्यास तयार नव्हते. अशा परिस्थितीत कमीत कमी दक्षिण मुंबई जागा शिवसेनेने सोडावी अशी विनंती जनसंघाने केली.

शिवसेना व ठाकरे तर जॉर्जविरोधी. तेव्हा या भूमिकेवर तडजोड शक्य नव्हती. तरी पण जनसंघाने आशा सोडली नव्हती. परत भेटण्याचे ठरले.

नंतरच्या दोन-तीन दिवसात ठाकरे-स. का. पाटील भेट झाली. ६७ प्रमाणे पाटील यांनी ठाकरे यांचे 'मन' जिंकले. ६८च्या मुंबई महापालिकेच्या निवडणूकीपासून शत्रूवत झुंजत असलेल्या शिवसेना-सिंडिकेटमध्ये समझोता झाला व चार जागा लढवू इच्छिणाऱ्या शिवसेनेने सिंडिकेटकरता उत्तर-पश्चिम मुंबई व दक्षिण मुंबई अशा दोन जागा सोडल्या.

जनसंघाने डॉ. आगासकरांच्या नावाने भिंती रंगवल्या, म्हणून ठाकरे यांनी आगासकर नको, त्याऐवजी करिअप्पा-थोरात आदी अपक्ष उमेदवार उभा करू अशी बाहेरून लवचिक पण मुळातून ताठर अशी भूमिका घेतली.

चतुर व संघटक म्हणून नावाजलेले नानाजी देशमुख ठाकरे यांचे मन तर वळवू शकले नाहीत पण करिअप्पा मात्र घोळात अडकून पडले.

## करिअप्पा गळाला आडकले

याचवेळी ठाकरे यांच्या मागे असलेले स्वतंत्र पक्षाचे मधु मेहता पुढे सरसावले व त्यांनी कूर्गला जाऊन कूर्गच्या सुरक्षित मतदार संघातून उभे राहू इच्छिणाऱ्या करिअप्पांचे असुरक्षित अशा उत्तरपूर्व मतदारसंघातून उभे राहण्यासाठी मन वळविले.

सर्व विरोधी पक्षांनी पाठींबा दिला तर उभे राहू असे म्हणणाऱ्या करिअप्पांनीसुद्धा, जनसंघ विरोध करीत असताना, स्वतंत्र सिंडिकेट व विशेषतः शिवसेनेच्या जीवावर उमेदवारी मान्य केली.

याचे कारण-हा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा मतदारसंघ! कुर्गचा साधा खासदार म्हणून निवडून येण्यापेक्षा, बर्वे-मेनन झुंजीमुळे गाजलेल्या आंतरराष्ट्रीय मतदार संघातून, जनसंघ-इंडिकेट विरोधात निवडून आलो तर आंतरराष्ट्रीय किर्ती व त्याचबरोबर लोकसभेत मानाचे पान मिळेल हा जनरल साहेबाचा होरा असावा.

हा मतदार संघ म्हणजे भारताची एक छोटी प्रतिकृती आहे. येथे कोणत्या जमातीला, धर्मियांना, जातीला, भाषेला बहुमत नाही. कुर्ला ते मुलुंड या cosmopolitan विभागात Engineering Industries आहेत तर ठाणे परिसरात केमिकल

कल्याणजवळ केमिकल उद्योगधंदे आहेत. ठाणे, डोंबिविली व कल्याण येथे मराठी मध्यम वर्ग राहतो, तर बेलापूर पट्टी व कळवा, ठाकूर्ली व पश्चिम ठाणे जिल्हा येथे शेतकरी वर्ग नांदतो. तोही आग्री व मराठा, कुर्ला येथे भय्या समाज, मुसलमान वजनदार तर चेंबूर येथे सिंधी व मराठी कोळी तुल्यबळ. घाटकोपर येथे मराठी व गुजराथी मध्यमवर्ग व झोपडपट्टी. शिवाय कुर्ला, घाटकोपकर, विक्रोळी, भांडूप येथील झोपडपट्ट्यात दाक्षिणात्य मतदारदेखील बहुसंख्यने आहेत. मुलुंड येथे गुजराती व मराठी मतदार जवळजवळ सारखे आहेत.

अशा मराठी–गुजराती-सिंधी-दाक्षिणात्य-मतदार विभिन्न राजकीय पक्षात विभागलेले आहेत व आज उमेदवार पण १२ आहेत.

त्यातील महत्त्वाचे तीन– डॉ. आगासकर, जनरल करिअप्पा, व नवकाँग्रेसचे राजा कुळकर्णी. आणखी प्रसोपाचे मनोहर कोतवाल पूर्वाश्रमीचे संसोपाचे घाटकोपरचे आमदार डॉ सामंत व रिपब्लिकन पक्षाचे श्री. भय्यासाहेब आंबेडकर असे तीन सहाय्यक भूमिकेत.

ठाणे येथे १९६७ साली प्रसोपाचे विधानसभेसाठी उभे असलेले श्री. दत्ता ताम्हाणे यांनी जवळजवळ २८,००० मते मिळविली होती. (व ती मेननविरोध व जनसंघ द्वेष यामुळे बर्वे यांना मिळाली), ही मते (टिकली तर) व इतर भागातील प्रसोपाची मते श्री. मनोहर कोतवाल यांना मिळतील. संपकाळातील कामगिरीमुळे सरकारी नोकराच्या मतांची आशा आहे. शिवाय कम्युनिस्ट व शे. का. पक्षाने पाठिंबा जाहीर केला आहे. कम्युनिस्टांमुळे कदाचित धारावीतील झोपडपट्टीतील मते मिळतील. (खात्री नाही, ऐनवेळी इंडिकेटकडे जातील.) पण शे. का. पक्षांच्या कार्यकर्त्यांनी बंड करून डॉ. सामंतांसाठी काम सुरू केल्यामुळे श्री. कोतवाल यांचे डिपॉझिट वाचेल की नाही याची खुद्द प्रसोपा कार्यकर्त्यांना चिंता वाटते.

घाटकोपर हाऊसिंग बोर्ड कॉलनीतील मध्यमवर्ग व झोपडपट्टीतील मते मिळतील ही डॉ. सामंत यांची आशा आहे. ही आशा म्हणजे शंभर संगमरवरी दगड मिळणे शक्य आहे म्हणून ताजमहाल बांधू अशी कल्पना करण्यासारखे आहे.

तीच गोष्ट भय्यासाहेब आंबेडकरांची. हरिजनांची मते बरी असली तरी निवडणूक जिंकण्याइतकी नाहीच नाहीत. निवडणुकीवर प्रभाव करण्याइतकी सुद्धा नाहीत.

अशा परिस्थितीत हे तीन उमेदवार सहाय्यक भूमिकेत डावी मते विभागणार हे नक्की. याचा त्रास इंडिकेट राजा कुळकर्णी यांना होणार.


तसे राजा कुळकर्णी या भागाला नवे. त्यांच्या प्रचारासाठी इंदिराजी चेंबूर येथे आल्या. त्यांनी जनसंघाला शिव्या दिल्यामुळे जनसंघाचा प्रसार झाला. राजाभाऊ महाराष्ट्र काँग्रेसचे असल्यामुळे यशवंतराव त्यांच्यासाठी जीपमधून हिंडत आहेत. सभा झाल्या. पण यशवंतरावांना चिंता आहे महाराष्ट्रातील चाळीस जागांची. त्यात ते

# भारतात पहिल्यानेच!

# नव्या भिंतींसाठी नवा पेण्ट –

# डेकोप्लास्ट

नव्या प्लॅस्टरवरही प्रायमरशिवाय
लावता येतो.
उन्हापावसात
वर्षानुवर्षे
टिकून
राहतो.




सिमेंट पेण्टशी
तुलना केल्यास:

- ☐ मजुरीचा खर्च ४०% कमी!
- ☐ रंगकामाच्या ७ क्रियांऐवजी दोनच पुरेत!
- ☐ पाचपट जास्त भाग रंगविता येतो!

डेकोप्लास्ट बेस व्हाइटमध्ये
मॅजिकटच मिसळून ४० मनपसंत
रंगछटा झटपट तयार करता येतात.
शिवाय ५ पक्के, गर्द रंग
तयारच मिळतात.

जीवनातील रंगसंगती म्हणजेच **एशियन पेण्ट्स**

आजारी. तरी इंदिराजींच्या प्रभावामुळे कुर्ला येथील उत्तरप्रदेशी मते, हमखास अशी मुस्लीम मते. नवकाँग्रेसची निष्ठावंत मते व यशवंतरावामुळे फिरलेली 'देशा'वरची मते अशी शक्ती कुलकर्णींची आहे. यावर तेनिवडून येतील असे वाटत नाही.

वाटाघाटीत जनसंघाला गाफील ठेवून 'बनविले' असले व करिअप्पाचीं उमेदवारी जाहीर करण्यात 'मुत्सदेगिरी' दाखविली असली तरी करिअप्पांच्या निवडणूक प्रचाराचा सर्व भार बाळ ठाकरे यांना वाहावा लागत आहे.

करिअप्पा-आगासकर उमेदवारीमुळे चिक्कार मराठी मते, विशेषतः floating मते बुचकळ्यात पडली आहेत. मराठो आगासकरांचे निर्दोष चारित्र्य व जनसंघ प्रेम का करिअप्पा आदर असे द्वंद चालू आहे.

## जनसघी अंदाज

हे द्वंद कसे सुटेल ते शेवटच्या चार दिवसातील प्रचाराच्या माऱ्यावर व घडामोडीवरअवलंबून आहे. तरीपण मराठी-मराठी करणाऱ्या शिवसेनेने अमराठी करिअप्पा उभा केला ही गोष्ट बहुतेकांना खटकते.

करिअप्पा यांना उभे करण्याचा फायदा शिवसेनेला कानडी मते मिळण्यात होईल. सिंडिकेट स्वतंत्रवादी अशी आंध्र-केरळ-मद्रासी उच्चवर्णीय मते मिळतील. हमखास जनसंघाला मिळणारी पंजाबी–सिंधी व काही गुजराती व्यापारी लोकांची मते काही प्रमाणात शिवसेनेच्या आक्रमक व रोखठोक कम्युनिस्ट विरोध मुळे करिअप्पांना मिळतील हा खरा शिवसेनचा डिविडंट. ठाणे भागातील खेड्यातील मिळणारी मते शिवसेनेची लोकप्रियतेची पावती ठरेल.

जनसंघाची stratagy मात्र 'सव्वा लाखा'ची आहे. पूर्वीची निष्ठावंत ८० हजार मते. त्यात आदर व ब्राह्मण म्हणून बर्वे यांना गेलेली ठाणे–कल्याण–डोंबिविली येथील मते मिळविली तर जवळजवळ सव्वा लाख होतात. ३० हजार नोंदविलेले नवीन मतदार व floating मते, बेलापूर पट्टीतील मते अशी मिळून आगासकर २ लाखापर्यंत पोहचतील असा जनसंघी अंदाज आहे.

पूर्वीची ६,४४,६३८ मतदार संख्या २,१४,०४२ मताने वाढून ८,५८,६८० मतांपर्यंत गेली आहेत.

यातील जनसंघाने नोंदविलेले तीस हजार नवमतदार व इतर पक्षाचे मतदार वगळता, बहुसंख्य मतदार शिवसेनेचे असावेत

या निवडणुकीत विचित्र दृश्य दिसत आहे. 'अलग भाषा, अलग वेष! फिरभी अपना एक देश' म्हणणारे राष्ट्रवादी जनसंघी करिअप्पांना अमराठी म्हणताना दिसतात, तर मराठी माणसाचा आवाज, मराठी हितासाठी उठवू म्हणणारी 'शिवसेना म्हैसूरी करिअप्पांचे समर्थन करताना विशाल राष्ट्रवाद सांगत आहे.

राष्ट्रवादाचे कपडे घालणाऱ्या माणसाचे आतील कपडे संकुचित असतात!

□ □ □

# वायव्य मुंबई




दत्तप्रसाद दाभोळकर

---

**आज बारे पटेलांच्या बाजूने**
**पण गोठ्यातले एक लाख भय्ये**
**हेच बारे फिरवू शकतात.**

## पटेल x गोखले x बागळे

**तिरंगी लढत**

---

धक्का घ्यावयास व धक्के द्यावयास वृत्तपत्रप्रतिनिधीला नेहमीच तयार असावे लागते. त्यातून निवडणुकीच्या मोसमात तर बोलावयासच नको. पण शेवटी या धक्क्यांनाही काही मर्यादा असतात. किमानपक्षी असाव्यात...

वायव्य मुंबईत स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे असलेले डॉ. गुरुबक्स गुडसॉन मला सांगत होते, " मला निवडून आले पाहिजे. नेताजी सुभाषचंद्र बोसांना जनतेसमोर आणण्यासाठी ते आवश्यक आहे. तुम्ही व तुमच्या माणूसने आपली सारी ताकद आज माझ्या मागे उभी केली पाहिजे." डॉ. गुरूबक्स मला पुन: पुन: हे आवर्जून सांगत होते--माजगावकरांना देण्यासाठी सुभाषबाबूंची खाजगी चिठ्ठी त्यांनी

माझ्या हातात देण्याचेच काय ते बाकी उरले होते ! आपण काय सांगतो आहोत ते डॉक्टर साहेबांना कळत नव्हते असे कसे म्हणावे ? ते वकिल आहेत. त्यांनी कला-विभागाची डॉक्टरेट मिळविलेली आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे संशयास्पद अशा शौलीमार आश्रमाचे ते प्रमुख संचालक आहेत. लोकशाहीत भल्याभल्या उमेद-वारांची आश्वासने कोणत्या पातळीवर जाऊ शकतात याचे ते एक जीतेजागते उदाहरण होते. पण माझ्या लेखी आज तरी डॉ. गुरूबक्स यांना फारसे महत्व नव्हते. पुढे मागे निवांतपणे एखादी खळबळजनक मुलाखत घ्यावयास चांगल्या-पैकी 'बकरा' येवढीं एकच नोंद मला त्यांच्याबाबत माझ्या नोंदवहीत करावी लागली. कारण वायव्य मुंबईतील चार दिवसांच्या धावपळीत एक गोष्ट मला स्पष्ट-पणे जाणवली होती. वायव्य मुंबईतील एका अद्भूत, प्रेक्षणीय लढतीत डॉ. गुर-बक्स यांचे स्थान कोठेच नाही. हटयोगी रावांचे पाण्यावरून चालण्याचे प्रयोग पचविलेली या मतदार संघातील जनता चांगलीच बेरकी आहे. आणि या मत-दारांच्या हुषारीची जणू परीक्षा घेण्यासाठीच तोलामोलाचे प्रामाणिक कार्यदक्ष उमेदवार या मतदारसंघात उभे आहेत.

## हुषार पण लहरी मतदार.

दहिसर पासून माहीमपर्यंत पसरलेल्या या मतदार संघात सात लाखाहून थोडे अधिक मतदार आहेत. त्यापैको २·५० लाख मतदार महाराष्ट्रीय आहेत. १·५० लाख मतदार गुजराथी आहेत. दक्षिण भारतीय, उत्तर भारतीय मुसलमान व ख्रिश्चन प्रत्येकी सरासरी साठ हजारापर्यंत आहेत. पण या मतदार संघात मतदारांचे असे विभाग लक्षात घेणेही एका अर्थाने फसवे आहे. कारण महत्वाची गोष्ट म्हणजे या मतदारातील सत्तर टक्याहून अधिक मतदार मध्यमवर्गीय आहेत. मुंबईतला हा वर्ग म्हणजें लोकलगाडी आणि चाळ यांच्या काठावर वाढलेली एक नवी संस्कृती आहे. या वर्गापैकी बहुतेक सारे जण न चुकता मतदान करतात. या लोकांचे थोडे पण नियमित वाचन असते. स्वतःच्या मनाशी एका तंद्रात बनविलेली स्वतःची अशी मते असतात. आकर्षक घोषणांनी व धडाकेबंद प्रचारांनी ही मते बदलली जात नाहीत. सत्तावन्न व बासष्ठ साली या मतदार संघाचा बराच मोठा भाग 'मेनन अल्वारिस' व 'मेनन कृपलानी' या लढतीखाली आला होता. त्यावेळी या मतदार संघातील मतदारांच्या हुषारीचा आणि लहरीचा अनुभव राजकीय निरिक्षकांना घ्यावा लागला होता. या निवडणुकीत राजकीय निरिक्षकांचे अंदाज साफ कोलमडले होते. सदुसष्ठ साली या मतदार संघात मधू मेहता, शांतीलाल शहा व गोखले अशी लढत झाली. मधू मेहता या नावाभोवती एक वलय होते. जागरूक, तडफदार, तरुण नेता म्हणून तो पुढे येत होता. प्रचाराच्या नव्या अभीनव पद्धतीं तो वापरित होता. रेल्वे स्थानकावर होणाऱ्या सभा, लोकलच्या डब्यातून भाषणे छोटया छोटया सुटसुटीत घोषणा सारेच कसे नवे व आकर्षक होते. त्यातून स्वतंत्र पक्षाच्या या नेत्याजवळ पैशाची कमतरता नव्हती. मतदान संपल्यावर मधू

मला म्हणाला होता, " तरुण मतदार व नवी प्रचार पद्धती काय जादू करते हे तुला आता पहावयास मिळेल " गोखले या निवडणूकीत अगदी शेवटच्या क्षणी उतरले होते. त्यांचा अजिबात काहीं प्रचार नव्हता. नाही म्हणावयास शेवटच्या दोन दिवसात मेनन याना त्यांच्यासाठी अनेक सभा घतल्या होत्या या निवडणूकीचा निकालही तसा अनपेक्षित लागला. शांतीलाल शहा निवडून आले हे अपेक्षित होते पण गोखले शांतीलाल शहांच्या अगदी जवळ पोचले होते. फक्त नऊशे मतांनी ते पराभूत झाले. मधू मेहता त्या दोघांच्याहून खूप दूरवर कोपऱ्यात उभा होता. मध्यमवर्गीय गुजराथी मतदारांची कॉंग्रेसनिष्ठा, मेनन यांची या मतदार संघातील व्यक्तीगत लोकप्रियता आणि मध्यमवर्गाचा स्वतंत्रासारख्या उजव्या पक्षांना असलेला विरोध असे काहीसे या निकालाचे विश्लेषण त्यावेळी मला करावे लागले होते.

आज या मतदार संघातील परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची आहे. गेल्यावेळी कॉंग्रेस विरुद्ध उभे असलेले गोखले यावेळी सत्तारूढ कॉंग्रेसतर्फे उभे आहेत. गेल्यावेळी निवडून आलेले शांतीलाल शहा संघटना कॉंग्रेसमध्ये गेले आहेत. या विभागातील सहाही आमदार कॉंग्रेसचे होते. त्यापैकी फक्त दोघे सत्तारूढ कॉंग्रेसमध्ये गेलेले आहेत. या विभागातील बहुतेक सर्व नगरसेवक व कार्यकर्ते संघटना कॉंग्रेसबरोबरच आहेत. त्यांच्यातर्फे शांती पटेल यांच्यासारखा सर्वमान्य उमेदवार उभा आहे. शेवटच्या क्षणी डॉ. वागळे या लढतीत उतरले आहेत त्यांचा रूबाब व आत्मविश्वास गेल्यावेळच्या लढतीतील गोखलेंच्याशी मिळताजुळता आहे.

## तुल्यबल प्रतिस्पर्धी

व्यक्ती व विचारसरणी म्हणून पाहावयाचे तर गोखले, वागळे, पटेल तिघेही वंदनीय आहेत. बालपण बडोद्याला गेलेले गोखले गुजराथी चांगले बोलतात. बेचाळीस सालापासून त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगलेला आहे. हायकोर्टजज्जाची नोकरी सोडून राजकारणात उतरलेले गोखले कट्टर समाजवादी समजले जातात. अखिल भारतीय रेल्वे मजदूर संघटना व हिंद मजदूर संघटनेचे ते एक वेळ आघाडीचे कार्यकर्ते होते. बेस्ट कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी दिलेला ' वेतन मूल्यांकना ' बाबतचा निवाडा हा एक आदर्श निवाडा समजला जातो. कॉंग्रेस विरोधामुळेतर नव्हे तर त्यांच्या समाजवादी निष्ठांबाबत खात्री पटल्यामुळेच गेल्यावेळी संयुक्त समाजवादी पक्षानी त्यांना सक्रीय पाठींबा दिलेला होता. डॉ. शांती पटेल यांच्या बाबत एक सार्वत्रीक आदर आहे. डॉ. पटेल मराठी सफाईने बोलतात. डॉक्टरीचा अभ्यास सोडून बेचाळीसच्या आंदोलनात उतरलेले डॉ. शांती पटेल अजूनही व्रतस्थ आहेत. निवडणूकीच्या प्रचाराला सुरुवात केली त्याच दिवशी मेयरचे निवासस्थान व गाडी प्रचारकार्यासाठी न वापरण्याचे त्यांनी जाहीर केले. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे ते कटाक्षाने या गोष्टी पाळताहेत. महापालिकेच्या निवडणूकीत ब्याऐंशी टक्के मते मिळवणारे शांती पटेल एक निष्ठावान कामगार कार्यकर्ते आहेत. अनेक कामगार संघटनांशी त्यांचा जवळचा संबंध आहे ' बांबे

पोर्ट ट्रस्ट संघटनेचे ' ते सतत पंचवीस वर्षे अध्यक्ष आहेत. विशेष म्हणजे अविभक्त कॉंग्रेसमध्ये असताना ते एक कट्टर समाजवादी म्हणून प्रसिद्ध होते. केवळ संघटनेवर व शिस्तीवर अधिक प्रेम असल्यानेच त्यांनी सत्तारूढ पक्षात प्रवेश केला नाही असा सार्वत्रीक समज आढळला. याबाबत बोलताना मी शांतीपटेल यांना सहजपणे विचारले, ' जनसंघ, विशेषत: स्वतंत्रा सारख्या उजव्या पक्षांशी असलेला संघटना कॉंग्रेसचा घरोबा निवडणूकीनंतर आणखीनच वाढला तरी तुम्ही त्याच पक्षात रहाल काय ?'–एखाद्या कसलेल्या मुत्सद्याप्रमाणे माझ्या प्रश्नाला बगल देत त्यांनी सहजपणे सांगितले, ' पक्ष बदलाचा प्रसंग आलाच तर मी प्रथम खासदार पदाचा राजीनामा देऊन नंतरच पक्ष बदलेन याची खात्री बाळगा ! '

डॉ. वागळे म्हणजे कर्तबगारीचा आणखी एक नवा अविष्कार. पाच वर्षापूर्वी दिल्लीला ' नॅशनल कौन्सील ऑफ अप्लाइड रिसर्च ' या मान्यवर संस्थेत डायरेक्टरच्या हुद्यावर असलेले डॉ. वागळे मी जवळून पाहिले होते. त्यांचे प्रसन्न व्यक्तीमत्व, स्वभावातील विलक्षण गोडवा आणि सफाईदार सुंदर इंग्रजी यांनी मी त्याचवेळी भारावलो होतो. पण ही नोकरी सोडून हा माणूस निवडणूकीच्या रिंगणात उतरेल आणि उमेदवार म्हणून आपण त्याची मुलाखत घेऊ हे मला त्यावेळी स्वप्नातही पटले नसते. हॉर्वर्डहून विज्ञानक्षेत्रातील डॉक्टरेट मिळवून आलेल्या वागळेंनी भारतात आल्यावर मुंबई विद्यापीठाची अर्थशास्त्रातील डॉक्टरेट मिळविली. आज मुंबईतील अनेक छोट्या उद्योगधंद्यांचे तांत्रीक व आर्थीक सल्लागार म्हणून ते काम करतात. मुंबईतील अनेक प्रमुख कामगार व कर्मचारी संघटनांचे आर्थीक सल्लागार म्हणून ते काम बघतात. मुंबई विद्यापीठाचा सिनेट व सिंडिकेटवर कामगार संघटनांचे प्रतिनिधी म्हणून ते निवडून आलेले आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे ते प्रमुख सल्लागार आहेत. कर्णीक, गुब्बी यांच्या बरोबरीने मुंबईतील सरकारी कर्मचाऱ्यांच्यात त्यांच्याबद्दल आदर आहे. – सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या तर गोखलेंच्यासाठी ते आपली उमेदवारी मागे घेतील असा एक समज या विभागात पसरवलेला होता. वसंतराव नाइकांच्याबरोबर होणाऱ्या कर्णिक, गुब्बी यांच्या वाटाघाटीत ते एक आतले कलम असेल असे अगदी उघडपणे बोलले जाई. माझ्याशी बोलताना वागळेंनी हसत हसत हा समज झटकून टाकला ते म्हणाले, ' हा असला प्रकार म्हणजे मते विकण्याचा व विकत घेण्याचा एक भयंकर प्रकार ठरेल. आपले सार्वजनीक जीवन कोणत्या पातळीवर आले आहे याचे हे नवे उदाहरण आहे. हे जीवन सुधारण्यासाठी तर मी लोकसभेत जातो आहे ! '

या मतदार संघातील लढतीला एका वेगळ्या कारणाने खास महत्त्व आहे. मुंबई महानगरपालिका व मुंबईचे बहुसंख्य आमदार हातात असलेल्या संघटना कॉंग्रेसने फक्त एवढी एकच जागा लढतीसाठी मिळवलेली आहे. त्यातूनही त्यांच्यात

व सत्तारूढ पक्षात जवळजवळ सरळ सामना होणार आहे. या निवडणुकीतील यशा-पयश संघटना काँग्रेसचे मनोधैर्य बदलवू शकेल. या मतदार संघात पक्षोपक्षात झालेले निवडणूक समझोतेही आपल्या राजकीय संधीसाधूपणाचे इरसाल नमुने आहेत. मराठी माणसांच्या न्याय्य हक्कासाठी निघालेल्या शिवसेनेने गोखले वा डॉ वागळे सोडून शांती पटेल यांना पाठिंबा दिलेला आहे. त्यातूनही मजेची गोष्ट अशी की महानगरपालिकेचा कारभार मराठीतून करण्यासाठी शांती पटेल यांनी कडवा विरोध केलेला होता. या विभागातील गुजराथी मते बहुतांशी शांती पटेलांना पडतील. गेल्या वेळची स्वतंत्रांची मते त्यांनाच मिळावीत. शिवसेना मराठी माणसांची काही मते त्यांना मिळवून देईल. गोखलेंच्या मते गेल्यावेळी त्यांना पडलेली मते कमी होण्याचे काहीच कारण नाही. गेल्यावेळी काँग्रेसकडे गेलेली मध्यमवर्गीय मराठी मते त्यांना मिळावीत. कामगार वर्गात उसळलेली इंदिरा प्रेमाची लाट हा त्यांचा सर्वात मोठा आधार आहे. डॉ. वागळेंचा अंदाज वेगळा आहे. या विभागात दोन लाख मध्यमवर्गीय कर्मचारी व कामगार राहतात. त्यापैकी वीस हजार तर सरकारी कर्मचारी आहेत. या कर्मचारी संघटनेचे कार्यकर्ते वागळेंच्यासाठी अविश्रांत मेहनत घेत आहेत. जनसंघानी आपला उमेदवार मागे घेऊन आपला सक्रीय पाठिंबा त्यांना दिला आहे. जनसंघाची शिस्तबद्ध यंत्रणा आज त्यांच्या कामाला लागलेली आहे. संयुक्त समाजवादी पक्षानी त्यांना पाठिंबा दिलेला आहे. प्रजासमाजवादी पण त्यांना पाठिंबा देणार हे ठरलेले आहे. या तीन पक्षांचे या विभागातले कार्य नजरेत भरण्याजोगे आहे. तीनीही उमेदवार त्यामुळे यशाचा रास्त दावा करतात. निवडणूक फलक, घोषणांची आतषबाजी, पदयात्रा व चौकाचौकात होणाऱ्या सभा यात तीघेही आज तरी तसे तुल्यबळ वाटतात.

## बाईंचा विलक्षण प्रभाव

पण या मतदार संघातला मतदार अजूनही बराचसा तटस्थ वाटतो. या शेवटच्या क्षणीही तो कुंपणावरच बसलेला आहे असा समज होतो—माझ्या मते इथला चलाख मतदार मुद्दामच तसे भासवतो आणि यावेळी एक फार वेगळी परिस्थिती आहे. यावेळी या लढतीला निर्णायक कलाटणी देण्याचे सामर्थ्य झोपडपट्टीतून व गोठ्यातून राहणाऱ्या या मतदार संघातील एक लाख मतदारात आहे. या विभागातील भय्यांचे गोठे म्हणजे नरकपुरीचे आधुनीक अवतार. म्हशीच्या शेणामुताचा रबडा. त्यात कुजणारी वैरण. घोंगावणारे डासांचे पुंजके आणि या वातावरणात म्हशीच्या डोक्यावर टांगलेल्या खाटेत राहून वर्षोनवर्षे म्हशीची देखभाल करणारा भैय्या आपल्या कल्पनेपलीकडचा आहे कधी नव्हे इतका उत्साह यावेळी इथल्या गोठ्यात व झोपडपट्टीत पसरलेला आहे. इंद्राजी आणि समाजवाद या शब्दांनी हे लोक झपाटलेले आहेत—बाईंनी तयार केलेले वातावरण हा काय प्रकार आहे हे इथे समजते. आपल्यासाठी कोणीतरी आहे ही खरी खोटी भावनाच सारे चित्र

पृष्ठ ११६ वर

मुंबई फेरफटका

# अनेकरंगी सामने... गोंधळाचे चित्र...

प्रतिनिधी

इलेक्शन–इलेक्शन–मिडटर्म इलेक्शन–नारे वाजवा, रात्रो घोषणा द्या, भिती रंगवा, दगड फेका, पैसे खा आणि मारामाऱ्या करा–हे इलेक्शन आहे. भारतात दर पाच वर्षांनी येणारी पर्वणी. आज एक वर्ष आधी आली आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेला मतदानाचा पवित्र आणि ऐतिहासिक हक्क बजवायचा आहे.

इलेक्शन–इलेक्शन–शिवसेना–जनसंघाचे भांडण. त्यात नव्या काँग्रेसची भाजते आहे पोळी. मुंबईची होळी. ठणाणा बोंब मारा–नारे वाजवा, घोषणा द्या, भिंती रंगवा, पत्रक छापा, दगड फेका, पैसे खा–तवा तापला आहे तोवर पोळी भाजून घ्या, खिसे गरम करा, एकमेकांची डोकी फोडा. पुन्हा पाच वर्ष संधी मिळणार नाही. नाही. येईल. एक वर्षानी येईल. पण आता मिळाली आहे. काहितरी पदरात पाडून घ्या.

इलेक्शन–इलेक्शन–बाई वोट कुणाला ? काय की बा येऊ कुनालाबी–शिक्का मारा आगगाडीच्या इंजिनावर–नका बाई. झाडावर द्या फुलं–बैलजोडो नाही ?–कोणत्या निशाण्या कुणाच्या आहेत माहित आहे ?–आता त्ये कसं समजनार ? सांगितलं शिक्का मारा–मारू–इलेक्शन–आतापर्यंत पायदळी तुडविल्या गेलेल्या भारतातल्या पंचावन्न कोटी गरीब जनतेच्या हाती आलेला सरकार बदलण्याचा पवित्र, महान मतदानाचा अधिकार–दादा शिक्का कशावर मारू ?–द्या कशावरही –घोड्यावर द्या. घोड्यावर कोण उभं आहे माहित आहे ?–काय की बा–असू द्या, शिक्का मारा म्हणज झाल–इलेक्शन...

इलेक्शन–इलेक्शन...अरेच्या मुंबईत एकाएकी ही नवी देवळं फूटपाथवर कुठून आलीत ? आणि पुतळे कुणाचे ? गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांचे ! हार, फुले, उदबत्त्या, वर भगवा झेंडा. शिवाजी महाराज की जय...ल्लाच मते द्या...जय इलेक्शन–

इलेक्शन–इलेक्शन–अरेरे इथे कसली एकमेकांची डोकेफोडी चालू आहे? हातात काठ्या आणि त्यावर भगवे झेंडे ! मारामारी व्वा भगव्या झेंड्यांच्या काठीचा काय योग्य उपयोग ! अरेच्च्या. पण ही भगवी मडळी एकमेकांची डोकी फोडताहेत ? एकमेकांची नव्हे, परस्परांची ! शिवसेना आणि जनसंघ, दोघेही राष्ट्रवादाचा गहिवर कधीही न आवरू शकणारे. हा–हा–तरीच ते तिरंगे आणि लाल बावटेवाले दुरून मजेने टाळ्या पिटताहेत–फोडा डोकी–इलेक्शन–

इलेक्शन–इलेक्शन–सामान्य माणसांचे इलेक्शन, झोपडपट्टी वाल्यांचे, नोकरीदारांचे, घरवाल्यांचे बगलेवाल्यांचे मोटरवाल्यांचे इलेक्शन. पैसा-पैसा-पैसा-बाबू–पैसा-पत्रक छापा, हॅंडबिलं वाटा, पोस्टर्स लावा, जीप्स् मागवा, टॅक्सी भाड्यानी घ्या, पेट्रोल टाका, माणसं आणा, मिरवणुका काढा, मारामाऱ्या करा. पैसा-पैसा–पैसा–बाबू–पैसा–कॉमन मॅनचे इलेक्शन. भारतीय राज्यघटनेने दिलेला महान अधिकार. सामान्यातला सामान्य माणूसही राष्ट्राध्यक्ष किंवा प्रधानमंत्री होऊ शकेल. निवडणूक खर्चावर मर्यादा आहे म्हणता ? अरेच्च्या हे माहितच नव्हतं–पैसा–इलेक्शन–

इलेक्शन–इलेक्शन–अरेच्या लांब लांब चकचकीत मोटारीमधून येणारी ही तुकतुकीत चेहऱ्याची उंची कपड्यांमधली मंडळी एकाएकी झोपडपट्ट्यांमध्ये कसली गर्दी करताहेत ? केवढ्या लीन चेहऱ्याने हात जोडीत, मान लवून ते बोलताहेत. एरवी ही मंडळी झोपडपट्ट्यांवरून वेगाने मोटारी जात असताना युडो कोलॉं टाकलेला रुमाल, नाकावर गच्च दाबून त्या झोपड्या उखडण्याची स्वप्ने बघीत सुरॅकन् निघून जातात. महिना पाच-दहा हजार रुपये मिळविणारी मंडळी यांच्या हाताखाली कामे करतात. यांच्यापुढे थरथर कापतात. हीच मंडळी एवढ्या लाचारीने आज इथे लोटांगणे कशी घालताहेत ? काय हे अधःपतन ! छे हे तर हृदयपरिवर्तन. हा खरा समाजवाद, ही खरी लोकशाही. हे इलेक्शन–जय इलेक्शन.

इलेक्शन-इलेक्शन. मिडटर्म इलेक्शन, मुंबईचे इलेक्शन. बड्यांचे इलेक्शन छोट्यांचे इलेक्शन. पोलिसांकडे बंदुकीची नळी, एजंटाच्या तुपाला पोळी, मुंबईची होळी आणि कॉमन मॅनला गोळी–जय इलेक्शन ! अहाहा ! काय सुरेख कापड आहे टाटांच्या या होर्डिंगचे. टाटा मिलचं आहे म्हटलं मिस्टर. सुररफाईन ! पॅंट फस्क्लास होईल. काही टेंपो नाही बुवा या निवडणुकीला. अहो कसला टेंपो घेऊन बसता. काही पातळी तरी उरली आहे का आजच्या राजकारणाला–राजकारणच उरलं आहे, गुंडगरी आणि पैसेवाल्यांची दादागिरी !–चीफ मिनिस्टरचं

बरोबर नाक दाबलं या सरकारी नोकरांनी. ची ऽऽ ची ऽऽ करत सरकारनं तोंड उघडलं–अहो इलेक्शन जवळ आलं. करणार काय ? डोळे पांढरे झाले असते सरकारचे आम्ही संपावर गेलो असतो तर–मेक हे व्हाईल सन शाईन्स्–जय इलेक्शन.

दक्षिण मुंबईचे इलेक्शन ! जॉर्जचे की टाटाचे की कैलासचे ? की सदोबा पाटलांचे ? सदोबांचा राजकीय आत्मा अजून दक्षिण मुंबईवर रेंगाळतो आहे म्हणे. जॉर्जने सदोबांना सदुसष्ट साली हुतात्मा चौकात धारातीर्थी टाकले. जॉर्ज जायंट किलर झाला. पण सदोबा गप्प बसले नाहीत. त्यांनी जॉर्जला सुप्रीम कोर्टापर्यंत नेऊन छळले

गरीब विचारा जॉर्ज ! मी उभा राहणार, राहणारच म्हणून पाटलांनी त्याला शेवटपर्यंत छळले. शेवटी बड्या आघाडीच्या शिस्तीला मान देऊन पाटील बनास-काठाला गेले. जॉर्ज खूष ! पण मग आकाशातून वीज कोसळावी तसे नवल टाटा दक्षिण मुंबईत अवतरले. आपल्या सर्व गोतावळ्यासह. बांबे हाऊस, पब्लिक रिले-शन्सचे सैन्य, पत्रकार, पैसा. नॉमिनेशनच्या दुसऱ्या दिवशी मुंबईभर पोस्टर्स. गरीब बिचारा जॉर्ज !

टाटा एकदम शेवटल्या क्षणी अवतरले ? एकाएकी स्फूर्ती येऊन ? चार फेब्रु-वारीच्या सकाळी ब्रेकफास्ट घेताना त्यांच्या डोक्यात एकदम ट्यूब उजळून हिंदु-स्थानच्या एकूणच परिस्थितीविषयी त्यांना एकाएकी गंभीर चिंता वाटू लागली आणि या परिस्थितीवर एकमेव उपाय म्हणून ते उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक कचेरीकडे धावले – आपल्या गाडीतून ? असं झालं ?

छे ! छे ! एवढं भोळेपण काय कामाचं ? मी उभा राहणार – रहाणारच अशा गर्जना पाटील करीत असताना कांग्रेसहाऊसमध्ये काही हालचाल होती का ? मुळीच नाही. वास्तविक पाहता पाटील उभे राहणार म्हटल्याबरोबर लढाईवर जाणाऱ्या एखाद्या सैन्यासारखी मुंबई कांग्रेसची हालचाल सुरू होते. कांग्रेस हाऊसला वॉर कॅबिनेटच्या हेडक्वार्टरचे रूप येते. पण यावेळी सामसूम. पाटील तिकडे बनासकाठाच्या वाऱ्या करताहेत. स्वतंत्र पक्ष नाही म्हणतो आहे आणि नाना चुडासमा उभे राहतो म्हणताहेत. आणि शेवटच्या क्षणी नवल टाटा विजयी वीरासारखे अवतारताहेत. चुडासमा मान तुकवून बाजूला होताहेत. सर्वत्र आनंदी आनंद. बिचारा जॉर्ज ! जय इलेक्शन !

टाटांनी उमेदवारी भरली ही बातमी कळताच अनेक प्रिंटर्स, एजंट्स् धावले. आम्ही इतके पोस्टर्स प्रिंट करून देऊ, असा प्रचार करू. यंव करू त्यंव करू ! टाटांचे पब्लिक रिलेशन्स ऑफिसर म्हणाले, नथिंग डूइंग, आमचे दोन लाख पोस्टर्स अगोदरच छापून तयार आहेत.' दुसरे दिवशी टाटांचा मुखडा असलेले सुपर-फाईन कापडावरचे होर्डिंग्ज दक्षिण मुंबईत सर्वत्र झळकले. गरीब विचारा जॉर्ज !

दुसरे दिवशी मुंबई कॉंग्रेसचे कार्यकर्ते टाटांच्या निवडणूक कार्यालयात दाखल. निजलिंगप्पा सांगताहेत जॉर्जचे काम करा. मुंबईकॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणताहेत नव्या कॉंग्रेसचे डॉ. कैलास यांना सोडून कुणालाही मते द्या. कार्यकर्ते काम करताहेत टाटांचे. लोक म्हणताहेत ही पाटलांची धोबी पछाड टांग जॉर्जला. १९६७ च्या पराभवाचे उट्टे पाटलांना कसेही करून काढायचे. आपल्यापेक्षा टाटा हे काम अधिक चांगले करू शकतील याची पाटलांना खात्री होती. टाटांजवळ पैसे आहेत, माणसे आहेत, कीर्ती आहे, टाटा घराण्याचे पुण्य आहे. मुंबई कॉंग्रेसची यंत्रणा आहे. आणि स. का पाटलांसारखी दुष्कीर्तीही त्यांच्याकडे नाही. त्यामुळे पाटलांपेक्षा त्यांचे चान्सेस अधिक बरे! टाटा घराण्याची कीर्ती फार चांगली आहे. त्यांनी स्वतःची संपत्ती कशीही कमावली असो. उद्योगधंद्यांमध्ये कामगारांच्या बाबतीत वगैरे ते अतिशय उदारमतवादी आणि प्रगतीशील घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. एवढा मोठा कोट्याधीश माणूस. पण साध्या कापडाचा (सुपरफाईन इजिप्शियन कॉटन) बुशशर्ट घालून आपल्याकडे नमस्कार करायला येतो आहे. याचेच मतदारांना कौतुक. जिकडे तिकडे टाटांचे नाव! वृत्तपत्रांचा प्रचार टाटांचा. कॉंग्रेस खूष हर्षमदाच्या शिखरावर! टाटा आले! आता जॉर्जने रिटायर व्हावे. उगाच फाईट देण्यात काय अर्थ? गरीब बिच्चारा जॉर्ज – वगैरे वगैरे–

पण खरंच जॉर्ज एवढा गरीब बिच्चारा झाला आहे की त्यावर निवडणुकीतून रिटायर होण्याची पाळी यावी? स. का. पाटलांना धूळ चारणाऱ्या जॉर्जची एका उद्योगपतीने एवढी केविलवाणी परिस्थिती करून टाकली? 'तुम्ही पाटलांना पाडू शकता' अशा तऱ्हेची कल्पक पोस्टर्स काढून मतदारांना जिंकणारा आणि 'तुम्ही कोणाबरोबर बद्रीप्रसाद की इंदिरा गांधी' अशी आपल्या या नव्या निवडणूक मोहिमेची आक्रमक सुरुवात करणारा आणि टाटा येताच 'तुम्ही कोणाबरोबर, उद्योगपती की कामगार नेता' असा पाठपुरावा करणारा जॉर्ज खरेच एवढा गर्भगळीत झाला आहे? की हा सर्व प्रचार? टाटांची प्रचार यंत्रणा उत्कृष्ट आहे हे निर्विवाद! बनासकाठांतून पाटील समाधानाचे हसू हसताहेत.

पण शेवटचे हसू कुणाचे असणार हा खरा प्रश्न आहे. जॉर्जने हातपाय गाळले असे म्हणणे चूक आहे. त्याचा प्रचार तेवढ्याच जोमाने चालू आहे. कार्यकर्ते अधिक उत्साहाने काम करताहेत. तो म्हणतो टाटा खूप मते मिळवतील हे खरे आहे पण मतांचा ओघ टाटांसारख्या उद्योगपतींकडे वळेल हे कसे शक्य आहे. असा ओघ कॉंग्रेसकडे एखाद्या लोकप्रिय पक्षाकडे किंवा माझ्यासारख्या कामगार नेत्याकडे वळतो. टाटा मते खातील ती कैलासची. फर्नांडीस जिंकला तर तो सर्वांनाच हसेल. टाटांना. पाटलांना आणि सर्वांनाच.

आणि फर्नांडिस – टाटा या कुस्तीत डॉ. कैलासचा घोडा विनवर यायचा. कुणी सांगावे दोन महिन्यापूर्वी नव्या कॉंग्रेसने मुंबईच्या पाचही जागांची आशा सोडून

दिली होती. आज टाटा-फर्नांडिस फाईटमुळे आणि शिवसेना-जनसंघ मारामारी-मुळे नव्या काँग्रेसची मस्तकावरची रेषा उमटली आहे. कमाल आहे. जय इलेक्शन—

लोक काय वाटेल ते म्हणतात. देशातल्या बड्या उद्योगपती घराण्यांमध्ये टाटांचे संबंध इंदिरा गांधींशी त्यातल्या त्यात बरे आहेत आणि इंदिरा गांधींना जॉर्ज फर्नांडिस पडणे आवश्यक आहे. त्यामुळे टाटा जर जिंकले तर शेवटचे हसू कोणाचे असेल ? इंदिराबाईंचे ! कमाल आहे.

तिकडे ईशान्य मुंबईत आणखी एक त्रांगडे ! नखशिखांत पाश्चात्य पोशाखात हिंडणारा हा म्हातारा पण रुबाबदार असा गोरापान गृहस्थ झोपडपट्ट्यांमधून, कॉलनीमधून का हिंडतो आहे. याच्या जीपमध्ये चारपाच मुले बसली आहेत. हा उतरतो. आजूबाजूला भीत भीत वय वर्षे चार ते बारापर्यंतच्या मुलांचा घोळका जमा होतो आहे. हा त्या मुलांना प्रेमाने कुरवाळतो. त्यांना चॉकलेटस् देतो. आणखी मुले मागे लागतात. हा आणखी खाऊ देतो. पण याची नजर भिरीभिरी काही तरी शोधत असते. कुणी मोठा माणूस येईल. मतदानाचा हक्क असलेला. चार शब्द बोलेल अशी वेडी आशा असते. कुणी येत नाही. कॉलनीतल्या वरच्या मजल्या-वरून काही माणसे कुतूहलाने पाहत असतात. हा केविलवाणेपणे हात उंचावतो. मंडळी गोंधळून हसतात. याची जीप निघते. मागून ट्रक जातो. त्यात दहा—पधरा मुले शिवसेनेच्या घोषणा देत असतात. कीव येते.

हे जनरल करिअप्पा. काही काही ठिकाणी म्हणे त्यांचे चांगले स्वागत होते. पण बऱ्याच ठिकाणी अशीही केविलवाणी परिस्थिती निर्माण होते ही वस्तुस्थिती आहे. अरेरे ! एकेकाळी देशाचा सरसेनानी असलेल्या या शूर शिपायाची ही दशा ! जय इलेक्शन !

शिवसेनेच्या अंतर्गत आणि जनसंघाशी झालेल्या भांडणाने अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कुठून या मतदार संघात आलो असे जनरलसाहेबांना झाले आहे असे म्हणतात. त्यांच्या घोड्याने अशी कच खाल्ल्याने जनसंघाच्या आगास-करांचा दिवा अधिक तेजाने उजळला आहे. शिवसेनेने करिअप्पांना उभे केले नसते तर आगासकरांच्या विजयाची अगदी खात्री होती. जनरलसाहेब आल्यावर जनसंघ जरासा कचरला होता. पण आता त्यांच्या दृष्टीने सगळे आलबेल झाले आहे. शिव-सेनेचीही बरीचशी मते खाण्याची त्यांची तयारी आहे.

शिवसेनेने आगासकरांना पाठिंबा न दिल्याने जनसंघाने चिडून सेनेच्या मुंबईतील दोन्ही उमेदवारांना पाडण्याचा चंग बांधला आहे. मध्य — मुंबईत मनोहर जोशी आणि मध्य—दक्षिण मुंबईत दत्ता प्रधान यांना पाडण्यासाठी जनसंघाचे कार्यकर्ते क्रियाशील आहेत. मध्य—दक्षिण मुंबईत तर जनसघाने वामनराव परबांना आपले उमेदवार म्हणून उभे केले आहे. परळच्या पोट—निवडणुकीत जनसघाच्या पाठिंब्या-वर शिवसेनेचा उमेदवार महाराष्ट्र विधानसभेत निवडून गेला हे काय कुणाला

माहित नाही ?

एवढे असूनही शिवसेनेने ईशान्य–मुंबईत एवढा आत्मघातकी पवित्रा का घेतला ? त्यांच्या या पवित्र्यामुळे मध्य आणि मध्य–दक्षिण मुंबईतील जे उमेदवार निवडून येण्याची शंभर टक्के शक्यता होती ती पार खाली गेली. शिवसेनेला एवढा आत्मविश्वास आला होता का की आपण एकट्याच्या बळावर सर्व निपटून टाकू ? तसे असेल तर कठीण आहे. शिवसेना ही एकामागन एक मिळालेल्या विजयावर जगत आली आहे, वाढत आली आहे. परळ पोट-निवडणुकीत शिवसेनेला पाठिंबा न देता त्यांच्या उमेदवाराला पाडण्याचा जनसंघाने प्रयत्न केला असता तर सेना तेव्हाच खलास झाली असती. यावेळी जनसंघाने पवित्रा घेतला आहे. सेना खलास झाली तर ते आता कम्युनिस्टांनाही हवे आहे आणि जनसंघालाही. नव्या काँग्रेसनेही शिवसेनेविरुद्ध तुफान प्रचार सुरू केला आहे. गळादोस्ती उरली आहे ती फक्त जुनी काँग्रेस आणि स्वतंत्र यांच्याशी.

या निवडणुकीत एक ठरणार आहे. शिवसेनेचे भवितव्य ! सेनेचा एक जरी उमेदवार निवडून आला तरी ती जोमाने पुढे येईल. दोघेही उमेदवार पडले तर सेनेचा काळ कठीण आहे. यावेळच्या निवडणुकीत गुजराती, पारशी आणि इतर भाषिक लोक मोठ्या संख्येने शिवसेनेला मते देणार आहेत हे नक्की. ते जुनी काँग्रेस आणि स्वतंत्र यांच्या दोस्तीमुळे. ईशान्य मुंबईत तर करिअप्पांच्या उमेदवारमुळे दक्षिणभारतीयदेखील शिवसेनेला मते देतील. तेव्हा शिवसेनेचे जे काही बरे वाईट होणार आहे त्याचे श्रेय किंवा पाप लागणार आहे ते या अमहाराष्ट्रीयांनाच. मराठी लोक तर सध्या शिवसेनेपासून दूरच पळताहेत.

ईशान्य मुंबईतील इतर उमेदवारांमध्ये सध्या डॉ. दत्ता सामंत (अपक्ष) जोर धरताहेत असे दिसते त्यांच्या मिरवणुकींना मोठाच जोर आला डॉ. सामंत वैयक्तिक दृष्ट्या खूपच लोकप्रिय आहेत हे निश्चित. पण ते खाऊन खाणार प्र. स. प. चे मनोहर कोतवाल आणि नव्या काँग्रेसचे राजा कुलकर्णी यांची मते. डॉ. सामंत जेवढी मते खाणार तेवढी कुलकर्णी यांची सधी कमी होणार. काहीही झाले तरी चाळीस–पन्नास हजार मतांच्या खाली काही डॉ. सामंत येणार नाहीत. जास्तच. त्यामुळे इकडे आगासकरांचे चान्सेस वाढतात. मतदारसघ साडेआठ लाखांचा आहे. सत्तर टक्के मतदान झाले तर सहालाख मते होतात. करिअप्पा, आगासकर, कुलकर्णी, सामंत आणि कोतवाल हे सारेच उमेदवार मोठे आहेत. मते खूप विभागली जाणार त्यामुळे जो दीड लाखाच्या आसपास पोचेल त्याचे चान्सेस अधिक. या हिशेबात जनसंघ बसतो.

मध्यम-दक्षिण मुंबईत कम्युनिस्ट गुलाबराव गणाचार्य, नवी काँग्रेसचे सालेभॉय कादर, शिवसेनेचे दत्ता प्रधान आणि जनसंघाचे वामनराव परब हे प्रमुख उमेदवार.

परवांना महत्त्व एवढयासाठीच की ते शिवसेनेची चिकार मते खाणार. इतकी प्रधानांनी विजयाची आशा सोडन द्यावी. त्यामुळे खरी लढत आता गणाचार्य आणि कादर यांच्यातच होते आहे की काय असे दिसते. प्रधान म्हणतात खरे की मराठी मते आपल्याला मिळतील म्हणून. पण ते एवढे सोपे नाही. कादर सोडले तर बहुतेक इतर उमेदवार मराठी आहेत. आणि परळ पोटनिवडणुकीत मराठी-अमराठी अशी विभागणी झाली नव्हती. या निवडणुकीत तर संबंध मुंबईतच इतके वेगळे वातावरण तयार झाले आहे की भाषिक गटांना आता फारसे महत्त्व उरले नाही. राजकीय पक्षांना आणि शिवसेनेला वाईट वाटेल. पण लोकशाहीच्या दृष्टीने ही चांगलीच गोष्ट आहे.

उदाहरणार्थ या मध्य-दक्षिण मुंबईतच साडे-पाच लाख मतदारांपैकी लाखाच्या-वर मुस्लीम मतदार आहेत. यांची मते कुणाला जाणार? मुंबईच्या इतर मतदार-संघात मुस्लीम लीगने नव्या कांग्रेसला पाठिंबा दिला आहे. पण इथे मात्र नव्या कांग्रेसचा मुस्लीम उमेदवार असूनही लीगने कम्युनिस्टांना पाठिंबा जाहीर केला आहे. मुस्लीमांमधला एक गट कादर यांनाच मते द्यावी असा आग्रह धरीत होता. कारण कादर मुस्लीम आहेत. परंतु श्री. गणाचार्य यांनी भिवंडी दंगलीत मुस्लीमांसाठी केलेले कार्य बघून लीगने त्यांनाच मते द्यायचे ठरविले. इतके असले तरी लीगमधला एक गट कादरसाठी काम करीतच आहे.

परंतु याच मुस्लीम भागांमध्ये डाव्या कम्युनिस्टांचाही एक मोठा गट आहे. त्यांचा गणाचार्यांना सक्रीय पाठिंबा आहे. त्यामुळे कादर यांच्यापेक्षा गणाचार्यांचे पारडे जड वाटते.

मध्य-मुंबईत शिवसेनेचे मनोहर जोशी आणि नवकांग्रेसचे आर. डी. भंडारे यांच्यात जवळजवळ सरळ सामना आहे. रिपब्लिकन पक्षाच्या एका गटातर्फे श्री. बी. सी. कांबळे उभे आहेत खरे. पण मतदारसंघातील नवबौद्ध आणि हरिजन यांची मते खाऊन भंडारेंना शह देण्याखेरीज त्यांना महत्त्व नाही.

कांबळे यांच्या उमेदवारीमुळे जोशींचे पारडे जड झाल्याचे समजले जाते. हा मतदार संघ मुख्यतः मराठी वस्तीचा आहे. शिवसेनेचे अनेक बालेकिल्ले यात आहेत. त्यामुळे मध्य-दक्षिण मुंबईपेक्षा शिवसेनेचा या मतदारसंघावर जास्त जोर आहे. मनोहर जोशी तर आतापासूनच लोकसभेत गेल्यासारखी भाषणे ठोक-साहेत.

पण शिवसेनेला काही हा मतदारसंघ एवढा सोपा जाणार नाही. त्यांना भंडारेंशी जबरदस्त कुस्ती द्यावी लागेल. जनसंघाचे कार्यकर्ते भंडारे यांच्यासाठी जीव तोडून काम करताहेत. त्यामुळे शिवसेनेला जाऊ शकणारी बरीचशी मते जनसंघ कार्यकर्ते भंडारे यांच्याकडे खेचून नेणार आहेत. कांग्रेसच्या प्रचाराचा जोरही कमी नाही.

रशियन राज्यक्रांतिविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे

आणि सर्व मुंबईभर जी परिस्थिती आहे तीच सध्या याही मतदारसंघात आहे. शिवसेनेने मुंबई महानगरपालिकेत प्रवेश करून आणि परळची पोट निवडणूक जिंकून आता पुष्कळ दिवस झाले आहेत. दरम्यानच्या काळात परळ-लालबागच्या बटारांमधून चिकार पाणी वाहून गेली. दादरच्या चौपाटीवर अनेक वेळा लाटा धडकून परतल्या. परिस्थिती बदलली आहे. मनोहर जोशी जर आत्मविश्वासाने मशगूल राहिले तर त्यांना धोका आहे.

जुन्या कांग्रेसचा बालेकिल्ला म्हणजे मुंबई. पण त्याच कांग्रेसने अख्ख्या मुंबईत आपला एकच उमेदवार उभा करावा या सारखा दैवदुर्विलास नाही. ज्या नव-कांग्रेसला मुंबईत नेता मिळत नव्हता म्हणून तीन चार महिन्यापूर्वी कुणी विचारीत नव्हते तो पक्ष मुंबईतील पाचही जागा आत्मविश्वासाने लढवित आहे. आणि एके-काळचे ज मुंबईतील अनभिषिक्त सम्राट स. का. पाटील यांची जुनी कांग्रेस मात्र वायव्य मुंबईतच फक्त उमेदवार उभा करते आहे हे दृश्य खरोखरच आश्चर्यकारक आहे. या संदर्भात नवकांग्रेसने गेल्या महिनाभरात मुंबई-महानगरपालिकेत जो जोर धरला आहे तो लक्षात घेण्यासारखा आहे.

जुन्या नवकांग्रसचे वायव्य मुंबईतले उमेदवार डॉ. शांती पटेल, मुंबईचे मेयर त्यांच्या विरोधात आहेत नवकांग्रेसचे एच. आर. गोखले. या दोघांत खरी लढत. पण महाराष्ट्र राज्य सरकारी नोकरांना प्रिय असलेले आणि जनसंघाने पाठिंबा दिलेले लोकप्रिय समाज कार्यकर्ते डॉ. एस्. एस्. वागळे देखील या लढतीत आल्याने सामन्याला तिरंगी स्वरूप आले आहे. डॉ. वागळे हे दोघांचीही मते खातील. पटेल आणि गोखल्यांचीही. पण निवडून येण्याइतपत मते खातील को नाही याची शंका आहे.

१९६७ मध्ये कांग्रेसविरुद्ध फर्नांडिस, डांगे, अत्रे, मेनन व गोखले हे जे पाच "पांडव" उभे होते. त्यातलेच हे गोखले, गोखले पडले होते पण जवळ जवळ सव्वा लाख मते मिळवून. त्यामुळे त्यांची उमेदवारी डॉ. पटेलांना धोकादायक समजली जाते.

वास्तविक पाहता वायव्य-मुंबई हा जुन्या कांग्रेसचा आणि डॉ. पटेलांचा प्रांत. गुजरात्यांची चिकार वस्ती या भागात आहेत. पण सबंच गुजराती मते पटेलांना मिळतील असे नाही. कारण स्वत: गोखलेही गुजरात्यांमध्ये बरेच लोकप्रिय आहेत. डॉ. शांती पटेल देखील मराठी लोकांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यांची पत्नी मराठीच आहे.

असे थोडे गोंधळाचे चित्र आहे. पण असंख्य मुंबईतील आपली अशी ही एकच जागा म्हणून जुन्या कांग्रेसचे कार्यकर्ते या मतदारसंघात जोर धरता आहेत. मुंबई-तील ही एकही जागा मिळाली नाही तर जुन्या कांग्रसचे नाक कापल्यासारखे होईल. त्यामुळे त्यांचा जोरदार प्रयत्न आहे.

अशी सर्व मुंबईतच जरा अस्पष्ट धूसर परिस्थिती आहे. काँग्रेसच्या फुटीनंतर जे चित्र बदलले त्यात मुंबईही बदलली आहे. शिवसेनेचा कमी झालेला जोर हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. नवकाँग्रेसच्या म्हणण्याप्रमाणे "इंदिराजींनी निर्माण केलेले नवे वातावरण" हीही गोष्ट लक्षात न घेऊन चालणार नाही.

पण १९६७ सारखा रंग या निवडणुकीत नाही. एक फर्नांडिस-टाटा ही फाईट सोडून दिली तर बर्वे, मेनन, डांगे-महिन्द्र आणि अत्रे-भंडारे यांच्या कुस्त्यांसारख्या रंगणाऱ्या कुस्त्या या निवडणुकीत नाहीत. अनेकरंगी सामने हे मुंबईत तरी या निवडणुकीचे वैशिष्टय आहे. □□□

---

# मुंबईत फेरफटका

पृष्ठ १०६ वरून

बदलून टाकत आहे. दहिसरच्या झोपडपट्टीत मी एक दिवस मुक्काम ठोकला होता. सिंडिकेट व इंडिकेट या दोन्ही पक्षांचे दहिसर विभागाचे प्रमुख त्यावेळी त्याच विभागात मुक्काम ठोकून होते. या झोपडपट्टीत झाडून सारा कनिष्ठ मध्यमवर्ग आहे. या लोकांची मागणी साधी आहे. जवळपास संडास नाहीत. या झोपडपट्टीतील बायकापोरी फक्त रात्री वा पहाटेच बहिर्दशेसाठी हाय वे च्या कडेला जाऊन बसू शकतात. त्यावेळीही त्यांच्या सोबतीला घरच्या बाप्यांना जावे लागते. त्या लोकांची या निर्णायक अखिल भारतीय निवडणुकीतील साधी सरळ मागणी संडास ही आहे! — बहुतेक झोपडपट्ट्या व गोठे अशाच मागण्या घेऊन उभे आहेत. सिंडिकेट व इंडिकेट या दोघांनी आज तरी मनापासून या प्रश्नात लक्ष घातलेले दिसते. शांती पटेल तर म्हणाले आहेत, 'हा तुमचा किमान हक्क आहे. मी निवडून आलो वा न आलो तरीही या गोष्टी तुम्हाला मिळतील याची खात्री बाळगा!'

शांती पटेल काही करोत. माझ्या मते मात्र इंदिरेच्या प्रेमात पडलेली ही मते अखेर गोखलेंना मिळतील. शांती पटेल वा गोखले यापैकी कोणीतरी एकजण पाच दहा हजार मतांच्या फरकाने निवडून येईल. डॉ. वागळेही त्यांच्यापासून फार दूरवर उभे नसतील.—पण अखेर वागळे, गोखले, पटेल या तीन उत्कृष्टांतील कोण निवडून येतो हेही माझ्या मते फारसे महत्त्वाचे नाही. तीघेही उत्कृष्ठ आहेत. एकाच विचाराने भारलेले आहेत. त्या तीघांपैकी कोणीही निवडून येवो. त्या निवडणुकीनंतर त्या विभागाती गोठ्यांची स्थिती सुधारली आणि झोपडपट्टयांना संडास मिळाला तर लोकसभेची ही निवडणूक कारणी लागेल! □□□

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 100 Paise : Regd. No. M–H 649

म्हणाल तेथे फुली मारून पुढच्या उद्योगाला लागणारे आम्ही मतदार हे खरे हाडाचे गरीब. आम्हा गरीबांना गरीबी फार मोलाची वाटते. अन तीच हटवली तर आम्ही

पहावे तरी कोणाकडे?

